
निलेश देसाई
डॉमिनंट

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# डॉमिनंट

(रहस्यकथा)

## लेखक : निलेश देसाई

# डॉमिनंट

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डॉमिनंट

लेखक : निलेश देसाई

पत्ता : २०५/बी, ओंकारेश्वर अपार्टमेंट, वडवली, अपोझिट रायगड बील्ड.

अंबरनाथ (पू). ठाणे – ४२१५०१

मोबाईल नंबर:- 9833471147

ई-मेल : desai.nilesh199@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

निलेश शिवाजी देसाई



माझ्याबद्दल सांगण्यासारखं असं विशेष काहीच नाही. एक व्यक्ती यापलिकडे माझी ओळख नाही.

लहानपणापासून वाचनाचं जबरदस्त वेड. महाभारत, रामायण, शिवचरीत्र, ययाति शाळेत असतानाच वाचले. सुरूवातीपासून हातात भेटत गेले ते पुस्तक अधाश्यासारखे वाचून काढण्याची सवय असल्याने वाचनाचा वेग वाढत गेला. आणि त्यामुळे बरीच पुस्तके वाचता आली. कॉलेजवयात स्वतः लिहावं असं खुपदा मनात आलं, पण जमलं नाही. शेवटी ऑनलाईन पब्लीश प्लॅटफॉर्म भेटला आणि मग तिथं लिहीलेल्या पहील्या कथेने लिखाणाचा हुरूप वाढवला. रोजच्या जीवनातले प्रसंग, काही आठवणी, अनुभव आणि असं जे काही मनात येते ते लिहीण्याचा थोडाफार प्रयत्न. शांत, सौम्य कोणाच्या कटकटीत न पडण्याचा स्वभाव. व्यक्त व्हावसं वाटलं म्हणून हा उपक्रम.

आज जवळपास पंधरा कथा, काही लेख माझ्याकडून लिहीले गेले. काही कथा अद्याप पूर्णत्वास जायच्या बाकी आहेत. पण मी स्वतः काही लिहीलं असं म्हणण्यापेक्षा वाचकांनी माझ्याकडून ते लिहून घेतलं असं म्हणणं रास्त ठरेल.

वाचकांनी ऑनलाईन अथवा ऑफलाईन दिलेले अभिप्राय, त्यांनी केलेलं कौतुक यामुळेच मी लिहीत गेलो. लेखकाला अजून काय हवे असते. कोणताही कलाकार हा पैश्याचा भुकेला नसतो, त्याच्या कामाचं केलेलं कौतुक त्याच्यासाठी लाखमोलाचं असतं.

'डॉमिनंट' हे शीर्षक फक्त डोक्यात ठेवून पहीला भाग एका संकेतस्थळावर लिहीला आणि पुढे आपोआप त्याचे उर्वरीत अकरा भाग पूर्ण होत गेले. अनेकांनी त्यांचे गोड अभिप्राय देऊन त्या बारा भागांचे पुस्तकात रूपांतर करण्याचा सल्ला दिला. नशिब थोर की 'ई साहित्य' चा उपक्रम दिसला. कारण खरे सांगायचे तर रोजचे ऑफिसचे काम, कुटूंब यातून अगोदरच लिखाणाला मिळणारा वेळ कमी. त्यात स्वतः कुठे पुस्तक वगैरे प्रकाशित करण्याच्या भानगडीत पडणार. त्यामुळे माझ्यासारख्या नवख्या व्यक्तीला 'ई साहीत्य' चे बहुमुल्य सहाय्य मिळाले. त्याबद्दल 'ई साहीत्य' चा मनापासून आभारी आहे.

वाचकांच्या मनात उतरू शकलो तर आनंदच आहे. कथा वाचून तुमच्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

निलेश शिवाजी देसाई

जन्म तारीख : १९-०९-१९८८

२०५/बी, ओंकारेश्वर अपार्टमेंट, वडवली, अपोझिट रायगड बील्ड.

अंबरनाथ (पू). ठाणे – ४२१५०१

फ़ोन नंबर : 9833471147

संकेतस्थळ : marathistories.online

Email : nil199@marathistories.online

desai.nilesh199@gmail.com

अर्पण पत्रिका

सर्व प्रथम ज्यांनी हा मानवी जन्म दिला, लिहायला वाचायला शिकवले

त्या आई-वडीलांचे, शिक्षकांचे आभार.

आई-वडील, शिक्षक,

'डॉमिनंट' स्वभावाची बायको,

ज्यांनी लिखाणास पाठबळ दिले ते मित्रपरिवार,

आणि

वाचकमित्र

या सर्वांना अर्पित.

सदर कथा पूर्णपणे काल्पनिक असून कोणत्याही जीवित अथवा मृत व्यक्तीशी तिचा संबंध नाही, असल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# डॉमिनंट भाग १

दुपारी दोन वाजता कल्याणच्या फलाट क्रमांक सहावर येऊन गाडी हळूहळू स्लो होऊ लागली तसं मळकट निळयाशार रंगाची अमेरीकन टुरीस्टर सॅक त्यानं खांद्यावर अडकवली. गर्दीतून रस्ता मोकळा करत तो बाहेर येऊ लागला. एकदोन आडदांड शरीरयष्टीच्या माणसांना बाजूला करत कोल्हापूरी हिसका दाखवत तो गाडीच्या डोअरजवळ येऊन थांबला.

गाडी पूर्णपणे थांबण्याअगोदर दरवाज्यावर आलेल्या मंदारची ओघळती नजर थोडंसं मागे गेलेल्या कॅन्टीनवर पडली, आणि पोटाने भुकेचा सिग्नल दिला.

खाली उतरून मंदारची स्वारी कॅन्टीनकडे वळू लागली. अंगात फिकट हिरव्या रंगाचं शर्ट.. रेल्वेसफरामुळे त्या हिरव्या शर्टच्या हाताच्या बाह्या घामाने थोड्या काळपट झालेल्या.. हलके आकाशी रंगाची काहीशी जुनाट डेनिम.. आणि लोकल ब्रँडचे स्पोर्टस् शूज..

निळया सॅकशिवाय बाकी काहीच सामान त्याच्याकडे नव्हते. तीन वडापाव पाच सहा हिरव्या मिरच्यांसोबत खाल्ल्यानंतर कुठे त्याची पोटातली आग

जरा शांत झाली. खिश्यात नाहीतरी फारसे पैसे नव्हते. जे होते त्यातच त्याला इथे जम बसवायचा होता.

मंदार जाधव.. लहानपणापासूनच एक वेगळंच रसायन. कोल्हापूराजवळच्या गावात मास्तराच्या घरात वाढलेलं. डिटेक्टीव्ह, क्राईम स्टोरीज या विषयांची पुस्तके आणि सिनेमे पाहुन तश्याच मानसिकतेला त्यानं अवलंबलेले. गावात कुठं खुट्ट झाले की त्याची इत्थंभूत खबर काढल्याशिवाय चैन नाही पडायचं पठ्ठ्याला.

चेहऱ्याने दिसायला साधाच पण कमालीचं स्मार्टनेस झळकायचं त्याच्या व्यक्तीमत्त्वातून. कोल्हापूरी पैलवानासारखे कसलेले शरीर.. पण तितकंच चपळ.. भेदक नजर.. आणि अंगात तुफान धाडसं. भय नावाच पाखरू त्याच्या आसपासपण नाही फिरकले कधी.

पंचवीशीच्या आसपासच वय त्याचं.. बी. ए. पास डिग्री गाठीशी.. त्यातूनच गावभर हेरगिरी करत राहायचा. गावच्या दरिद्री लोकांत चोरचमार कुठून येणार.. मग झाडून सगळयांची लफडी शोधायची आणि गावकऱ्यांच्या नजरेत आणून द्यायची. यातच काय तो डिटेक्टीव्ह असल्याचा आनंद घ्यायचा.

मंदारने गावातल्या बऱ्याच जणांना त्यांच्या कर्मानुसार पंचायतीसमोर नाक घासायला लावलं होतं. मग ते रेशनिंगवाल्या बबन्याची बेईमानी असो वा माधवाने चोरलेले आंबे असो. खालच्या आळीच्या सुनीलचं कोवळया रूपालीशी

केलेलं प्रेमप्रकरण तर जगजाहीर करून टाकलं. आणि चार वर्षांपूर्वी दुसऱ्यांच्या बायकांवर नजर ठेवणाऱ्या विक्रमला मंदारमुळेच गावकऱ्यांचा बेदम चोप मिळाला होता.

मागच्याच आठवड्यात गावाबाहेर स्टॅन्डजवळच्या केशकर्तनालाबाहेर एका पॅम्प्लेटने मंदारचे लक्ष वेधून घेतले होते.

“साहसी कामासाठी तरूण पाहीजे.. हेरगिरीसंबंधीचे ज्ञान असल्यास प्राधान्य.. आकर्षक मोबदला. राहणे-खाणे मोफत.. “

खाली कॉन्टॅक्ट नंबरही दिला होता.

केशकर्तनालय मंदारच्या घरापासून जवळच होतं. मग तिकडे नेहमीचे त्याचे येणेजाणे व्हायचे.

मंदारला तसंही गावात राहून फारसं काही मिळत नव्हतं. लग्न हा विचारदेखिल मनाला शिवला नव्हता अजून. तिन-चार दिवस नीट विचार करून मंदारने संबंधीत जाहीरातीत दिलेल्या नंबरवर कॉल केला होता.

---------------------------------------------------

रेल्वे फलाटावरच्या कॅन्टीनमधून हात धुवून बाहेर पडणार इतक्यात... मंदारला त्याच्या डेनिमच्या मागच्या खिश्यात काहीतरी हालचाल जाणवली.. मागे फिरला तसा एक साधारण शरीरयष्टीच्या इसमाच्या हातात त्याचं पाकीट.. तो इसम जीव खावून उडी मारून पळण्याच्या प्रयत्नात असतानाच..

मंदारने एकाच झेपेत त्याची मानगुटी पकडली. एक-दोन झोकांड्या घेऊन जेव्हा आपल्या पळून जाण्याच्या सगळया शक्यता नाहीश्या झाल्या असे त्या इसमाला वाटले तेव्हा तो गप्प उभा राहीला. अंगात लाल टि-शर्ट आणि निळी फडतूस जीन्स्.. गळयात रंगबेरंगी रूमाल बांधलेला..

मंदारच्या डाव्या हाताचा ठोसा अक्षरशः त्याच्यावर पडणारचं होता.. पण तितक्यात तो इसम पुटपुटला.. “कोड.. थ्री वन् फाय सीक्स्...”

मंदारला त्याच्या डोळयात वेगळीच चमक जाणवून आली. पब्लीक एव्हाना आपला हातसाफ करायला सरसावलीच होती.. पण मंदारनं त्या इसमाला गळाभेट देऊन सर्वांसमोर तो आपला मित्रच असल्याचे भासवले.

त्या इसमानं मंदारला त्याचं नाव आरीफ म्हणून सांगितले. फारसा तिथं न थांबता, त्या इसमानं मंदारला इशाऱ्यानंच त्याच्या मागून यायला सांगितले. मंदारनेही कल्याण स्टेशनच्या बाहेर पडण्याकडे प्रस्थान केले..

मंदारच्या चालण्यात एकप्रकारचा बेफीरपणा होता. त्याच्यातल्या निडर वृत्तीचाच तो एक भाग असावा.

हातातल्या घड्याळाने सवादोन वाजल्याचे दर्शवीले, मंदारने स्टेशनबाहेर येतायेता पाहीले.

मुंबईलगतच्या तापमानात हल्लीच्या काही वर्षात चांगलीच वाढ झाली होती. वैतागून मंदारने वर तापत्या सूर्याकडे पाहीले. उन्हाची बरीच झळ बसत होती.

पण अजून एक प्रश्न तर निरुत्तरीतच राहीला होता...

का बरे, वाचवले असावे त्याला मंदारने..?

-----------------------------------------------------

दोन दिवसांपूर्वी...

कल्याणमधलं नुकतचं सुरू झालेलं क्युबा रेस्टॉरंटने अल्पावधीतच लोकप्रियता मिळवली होती. सकाळ संध्याकाळ माणसांची बरीच वर्दळ असायची तिथे. कदाचित व्हेज-नॉनवेज दोन्ही मिळत असल्याकारणाने असावी.

तिथले वातावरण अगदी प्रसन्न वाटण्यासारखे होते. मेन रोडला लागुनच असं ते टुमदार हॉटेल होतं. समोरील बाजूला पूर्णतः सेकंड फ्लोअरपर्यंत असलेली ट्रान्स्परंट ग्लास.. आत प्रवेश करताच दोन्ही बाजूने सजवलेली छोटी छोटी झाडं.. वेल

कल्चर्ड स्टाफ.. आकर्षक सिटींग अरेंजमेंट.. वर सेकंड फ्लोअरला असलेले ए सी सेक्शन.. सगळंच लाजवाब होतं...

सकाळी अकराची वेळ.. क्युबा रेस्टॉरंटच्या ए सी सेक्शन मध्ये कोपऱ्यातल्या एका टेबलावर चार व्यक्तींची खाजगी कुजबुज चालू होती. आसपास अजून आठ टेबल होते. पण त्यापैकी दोन वगळता बाकी सहा रिकामेच होते. एकीकडे एक कपल आणि दुसरीकडे एक मिडल एज्ड व्यक्ती असे त्या दोन भरलेल्या टेबलांवर होते.

कोपऱ्यातल्या चार माणसांत चालू असलेलं संभाषण संपले तसे त्यातल्या एका दाढीवाल्याने कोणालातरी फोन लावला.. बाकी तिघांकडे पाहत त्याने इशाऱ्यानेच रिंग वाजतेय असे सांगितले. पलीकडून फोन उचलला गेला..

“हं.. हॅलो... मिस्टर मंदार जाधव..?”

पलीकडून होकार मिळाला तसे इथुन पुन्हा याने बोलायला सुरूवात केली.

“ईगल कंपनीसे बात कर रहा हु.. आपने फोन इंटरव्हयू दिया था.. आपके स्कॅनड् डॉक्यूमेंट और फोटोज के आधार पर आपका सिलेक्शन हो गया है... आपको परसो सुबह तक कल्याण आना होगा...” आपली दाट दाढी कुरवाळत तो फोनवर बोलत होता.

पलीकडून बहुधा पैश्यासंदर्भात विचारले गेले असावे.

“पचास हजार महीना मिलेगा..” इकडून दाढीवाल्याने हसत सांगितले.

“अपने आने की डिटेल्स मॅसेज कर देना.. हमारा आदमी स्टेशनपर मिलेगा.. ध्यान रहे हमें एक डिटेक्टीव्ह की जरूरत है.. आप तो जानते ही होंगे बाकी चीजें. और सबसे जरूरी शब्द नोट कर लिजिये..” आणि एक दीर्घ सुस्कारा सोडून तो म्हणाला..

“कोड.. थ्री वन् फाईव्ह सीक्स्...”

इतके बोलून त्याने फोन कट केला. चौघे एकमेकांकडे पाहुन हसले. त्यांच्यातला दुसरा ज्याच्या नाकाजवळ चामखीळ होते, त्याने खिश्यातून सॅमसंगचा स्मार्ट फोन काढला.. आणि ‘bhai’ नावाने सेव्ह केलेला नंबर डाईल केला.. पलीकडून कॉल उचलला गेला..

“भाय.. ‘डिग्री’ ने अपना काम कर दिया है...!”

.......................... पलीकडून काही विचारले.

“हा भाय.. आपके मुताबीक ‘डिग्री’ ने ही बात की उससे.. वो दो-तीन दिन मे आ जायेगा..!”

हॉटेलमध्ये बसलेल्या चौघांपैकी दाढीवाला जरा जास्त शिकलेला होता. कदाचित म्हणूनच त्याचं नाव ‘डिग्री’ असावं.

पलीकडून थंड रिस्पॉन्स मिळाला तसा दात विचकत हसत याने का ॅल कट केला..

--------------------------------------------------------

कल्याण स्टेशनच्या बाहेर पडताना मंदार आरीफच्या मागोमाग थोडं अंतर ठेवून चालत होता. एकंदर आरीफच्या कपड्यांवरून तरी मंदारला काही शंका आली होती. पण आता इथपर्यंत आल्यावर पुन्हा मागे जाणे त्याला कधीच पटणारे नव्हते. किमान काम काय आहे हे जाणल्याबिगर तर नक्कीच नाही.

आणि तसंही आपल्या कामाची परीक्षा घेण्याची ही एखादी पद्धत असू शकते, असा विचार करून मंदारने 'गो अहेड' करायचे ठरवले.

थोड्याच वेळात मुख्य रस्त्यावर आरीफ एका काळया इनोव्हाच्या पुढच्या दाराशी खेटून उभा होता. त्याच्या मवाली टाईपच्या कपड्यांमुळे त्या चकचकीत गाडीची इमेज कमी झाल्यासारखी वाटत होती. मंदार त्याला फॉलोव्ह करत तिथं पोहोचला, तसं आरीफने मागचा दरवाजा उघडून मंदारला खुणावून आत बसण्यास सांगितले.

मंदारने आत पाहीले. गाडीत दाढीवाल्या ड्रायव्हरशिवाय कुणीच नव्हतं. मंदार आत बसला तसं आरीफने दार बंद केलं.

“डिग्री तुम्हे सही जगह पहुचा देगा...!” अर्धवट उघड्या खिडकीच्या काचेवर आपली हनुवटी ठेवत आरीफ उद्गारला.

मंदारने आरीफच्या चेहऱ्यावरचे भाव वाचण्याचा प्रयत्न केला पण आरीफच्या चेहऱ्यावर शुन्य भाव अवतरले होते.

गाडी सुरू झाली. स्टेशन परिसरातून बाहेर निघताना ऑटो रिक्ष्यांच्या घोळक्यामुळे वेळ लागत होता. मंदारच्या डोक्यात विचारचक्र फिरू लागले होते. इथे आल्यापासून ते आरीफ जाईपर्यंत एक एक क्षण त्याने पुन्हा आठवून पाहीला. अजूनतरी काहीच चूकीचं वाटलं नव्हतं, पण काहीतरी वेगळं नक्कीच असावं असं त्याचं अंतर्मन सांगत होतं.

काय असावं याचा पडताळा मंदारला होत नव्हता. तरीही तो थोडा सावध झाला होता.

“तो आपका नाम ‘डिग्री’ है..?” मंदारने ड्रायव्हरला विचारलं.

“हो..” ड्रायव्हर समोरच्या मिरर् मध्ये पाहत उत्तरला.

त्याच्या उत्तरावर मंदारच्या चेहऱ्यावर हसु उमटले. एकतर त्याचं नाव विचित्रच होतं आणि दुसरं महत्वाचं म्हणजे त्याच्या ‘हो’ मधून तो मराठी असल्याचा दाखला मिळाला होता.

डिग्रीने मंदारला ते जात असलेल्या जागेची, आसपासच्या गावाची जुजबी माहीती दिली. अर्थात मंदारने ती काढून घेतली. मात्र कामासंबंधी विचारल्या गेलेल्या प्रश्नावर ‘डिग्री’ निरुत्तर झाला. त्याबद्दल काही माहीती नसल्याचे त्याने सांगितले.

गाडीने आता वेग पकडला होता. गाडीसोबत मागे जात असलेला रस्ता, आजूबाजूचे फलक, नदी, तिच्यावरचा निमुळता ब्रिज, मुख्य शहरानंतर नुकतेच मागे पडलेले गाव इत्यादी सगळं काही मंदार बारकाईने पाहत होता. त्याची चौकस नजर शक्य तितकं सारं काही टिपण्याचा प्रयत्न करत होती.

आणखी एक गाव मागे पडलं आणि साधारणतः पंचवीसाव्या मिनीटाला गाडीचा वेग कमी झाला.

--------------------------------------------------------

‘उत्कर्ष लॉजिंग ॲन्ड बोर्डींगस्’

मंदारने समोरच्या बोर्डवरचे नाव वाचले. पार्किंग लॉटमध्ये गाडी लावल्यावर डिग्री आणि मंदार दोघे बाहेर येऊन रिसेप्शनकडे जाऊ लागले. अर्थात मंदार फक्त डिग्रीच्या मागोमाग चालत होता.

त्या जागेच्या नुकत्याच रिन्होवेशन केल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. ग्राउंड फ्लोअरचा हॉल बऱ्यापैकी ऐसपैस होता. दोन बाजूला दोन सोफे. डाव्या बाजूला समोरच्या भिंतिला खेटून रिसेप्शन टेबल होते. तिथे साधारण वीशीचा एक तरूण मुलगा चेहऱ्यावर निर्विकार भाव ठेवून हातातील रजिस्टर चाळत होता. उजव्या बाजूने वर जाणाऱ्या स्टेप्स् होत्या. एकुण चार मजली असा तो लॉज होता.

डिग्रीने रिसेप्शनच्या हातावर शंभर रुपयाची नोट टेकवून तिथे अगोदरच बुक असलेल्या रूम नंबर २०१ ची किल्ली मागितली. खात्रीसाठी ज्या नावाने रूम बुक केली होती त्या नावाचा उल्लेख केला.

रिसेप्शनवर असलेल्या तरूणाने शंभर रुपयाची नोट हसत स्विकारत शांतपणे रूमची किल्ली डिग्रीकडे दिली.

डिग्री मागे वळाला आणि मंदारला उद्देशून म्हणाला,

“सेकंड फ्लोअर... लिफ्टने जाऊया..”

या एका वाक्यात मंदारला काहीतरी आठवल्यासारखे जाणवले. मंदार आणि डिग्रीमध्ये जेमतेम फुटभराचं अंतर होतं, आणि तितकसं अंतर पुरेस होतं डिग्रीचा स्पष्ट आवाज कानावर पडण्यासाठी.

“साहेब, लिफ्ट तासाभरापूर्वीच बंद पडली आहे.. माणूस येतच असेल नीट करण्यासाठी. पण आता पायऱ्यांनीच जायला लागेल..” रिसेप्शनवरचा तरूण खंत करत उद्गारला.

“काय याररऱ्....” डिग्री त्रासिक चेहऱ्याने स्टेप्सकडे वळाला.

मंदार त्याच्या मागोमाग होता.

पहील्या मजल्यावरच्या पायऱ्या संपताच वर कुणाची तरी कुजबुज ऐकू आली. दुसऱ्या मजल्यावरच्या पायऱ्यांवर वळताच डिग्री समोर बघत एक दोन क्षण थबकला.

स्काय ब्ल्यू रंगाचा शॉर्ट स्लीव्हलेस टॉप आणि खाली डार्क नेव्ही ब्ल्यू जीन्स घातलेली एक तरूणी पाठमोरी होती. तिच्या सोबत आणखी तीन माणसे होती. त्यातल्या एकाने ज्याच्या नाकाजवळ चामखीळ होते, तिच्या खांद्यावर आपला हात टाकला होता. त्यांच्या आपापसांतल्या कुजबुजण्यावरून त्यांच्यातली ‘खास’ मित्रता दिसून येत होती.

डिग्री एकवार मागे मंदारकडे पाहत हसला,

“हे सर्व इथे नॉर्मल आहे...’ डिग्रीने पुढे पुष्टी केली.

मंदारने मान हलवत आपल्याला काही फरक पडत नसल्याचे सांगितले.

डिग्री आणि मंदारची चाहूल लागताच त्या तरूणीने मागे वळून पाहीले.

आता मात्र मंदारच्या चेहऱ्यावर थोडीशी आश्चर्याची किनार उमटली.

‘ती’ स्त्री नसून एक तृतीयपंथी आहे, हे कळण्यासाठी मंदारला फारसे कष्ट पडले नाहीत.

तिने प्रथम डिग्रीला स्माईल दिली आणि मागे असलेल्या मंदारला वरून खालपर्यंत न्याहाळले. मंदार आणि डिग्रीची नजरानजर झाली. नजर चोरून डिग्री पुढे भरभर चालू लागला.

त्या चौघांकडे पाहत मंदारही निघाला..

एव्हाना डिग्रीची चाल आणि हावभाव यांत कमालीचा बदल झाला होता. मंदार समोर काहीच झाले नसल्याचे दाखवण्याचा त्याचा निष्फळ प्रयत्न सुरू होता.

रूम नंबर २०१ मध्ये मंदारला आतपर्यंत सोडून कसाबसा डिग्री तिथून लवकर सटकला. आज किंवा उद्या फोन करून कुणीतरी भेटण्यासाठी येईल असे त्याने सांगितले.

डिग्री गेल्यावर सर्वप्रथम मंदार संपूर्ण रूमची पाहणी करत काही आक्षेपार्ह मिळतेय का ते पाहू लागला. परंतु रूममध्ये तसे काही त्याला आढळले नाही.

घडलेल्या सर्व घटना जरी सामान्य माणसासाठी नॉर्मल वाटत असल्या तरी, एका डिटेक्टीव्हच्या दृष्टिकोनातून नक्कीच कुठेतरी पाणी मुरत होते.

‘डिग्रीच्या वागण्यात झालेला बदल, पायऱ्यांवर भेटलेली माणसे त्यांसोबत तृतीयपंथी, स्टेशनवर भेटलेला आरीफ आणि सर्वात महत्वाचं म्हणजे डिग्रीचा आवाज...’

‘हो... डिग्रीचा आवाज... रिसेप्शनवर जवळून ऐकलेला डिग्रीचा आवाज आणि इथे बोलावण्यासाठी आलेला कॉल... त्या कॉलवरचा आवाज... हे दोन्ही आवाज जवळपास एकाच व्यक्तीचे असण्याची दाट शक्यता होती..’

मंदार एक एक गोष्ट पुन्हा पडताळून पाहू लागला.

‘जर तो आवाज डिग्रीचाच असेल तर, आपल्याला बोलावताना दाखवलेली अदब, त्याच इसमाने ड्राइव्हर म्हणून येणं, त्याचा रिसेप्शनवरचा व्यवहार आणि त्यानंतर पायऱ्यांवर घडलेला प्रसंग यांत नक्कीच विसंगती दिसून येत होती.’

‘आणि तृतीयपंथीयाचे डिग्रीला स्माईल देणं ही त्यांची पूर्वओळख असल्याचे दर्शवीत होती.’

‘शिवाय डिग्रीने सांगितले त्याप्रमाणे त्याला आपल्या कामासंबंधी माहीती नाही, याचाच अर्थ कामाची माहीती देण्यासाठी अजून कुणीतरी आपल्याला भेटायला येणार आहे.’

सगळया गोष्टींचे ठोकताळे बांधून मंदार शांतपणे रूममध्ये वावरू लागला. तिथे त्याला आक्षेपार्ह असे काही मिळाले नाही. शेवटी त्याने तो प्रयत्न सोडून दिला आणि फ्रेश होण्यासाठी गेला.

-----------------------------------------------------

‘उत्कर्ष लॉजिंग ॲन्ड बोर्डींगस्’

पहील्या मजल्यावरच्या कोपऱ्यात असलेल्या सर्वात शेवटच्या रूममध्ये हलकासा गोंधळ सुरू होता. डोअर बेल दाबून दरवाज्यावर हलक्या हाताने दोन वेळा ‘टकटक’ झाले. ती एक विशिष्ट खुण होती. चार-पाच सेकंदात दार उघडले.

“भडव्यांनो आत रूममध्ये नंगानाच करता येत नव्हतां का तुम्हाला...?” डिग्रीने शिव्या घालतच प्रवेश केला.

आत रूममध्ये गेल्या गेल्या कुठल्याही व्यक्तीचं लक्ष पहीले त्या रूममधल्या कोपऱ्यांमध्ये आपसुकच गेलं असतं. एका कोपऱ्यात बीयरच्या रिकाम्या बाटल्या, सिगारेटची थोटकं, अर्धवट जेवलेल्या एक-दोन प्लेटस्... दुसऱ्या कोपऱ्यात ‘राखून’ ठेवलेला स्टॉक.. वेगवेगळया चवीचा चाखणा सांभाळून ठेवला होता.

आत समोरच्या खुर्चीवर नाकाजवळ चामखीळ असलेला मदन हातात पेग घेऊन बसला होता. दरवाजा उघडण्यासाठी गेलेला चंदू डिग्रीच्या मागून आत येत होता.

“आत ये... शांत हो... झालं ते आपल्याला सांगितलेल्या प्लॅन मध्ये नव्हतं, पण आता काही बदलता येणार नाही त्यातलं...” बेडवर निष्काळजीपणे पहुडलेला नसिर आळस देत म्हणाला.

“म्हणजे म्हणायचं काय आहे तुला.. साल्या आपण प्लॅनच्या बाहेर एकही चाल खेळू शकत नाही.. माहीत आहे ना, भायनी काय सांगितलेले...” डिग्री अजूनही चिडलेल्या अवस्थेत होता.

“त्याचा विचार केला हाय... काय फरक पडत नाही.. याबद्दल भायला कायपण सांगायची गरज न्हाय..” मदन थंड डोक्याने खाली जमिनीकडे पाहत उद्गारला.

“मदन.. पण असं का झालं...? इतका ढिला कारभार आपण नाही करू शकत... नायतर आपल्याला या कामाचे पैसे भेटणं जड होईल..” डिग्रीच्या क्रोधाची जागा आता चिंतेनं घेतली होती.

“डिग्र्या... तू लिफ्टने जाणार होतास.. मी चौकशी केली खाली जाऊन.. लिफ्ट बंद पडणं आपल्या प्लॅनमध्ये नव्हतं.. पण आता मी म्हणालो ना सगळं पक्क झालंय कसं करायचं ते... तसं पण ते आलेलं बुजगावणं ‘चू’ च वाटतंय.. तू टेन्शन घेऊ नको.. चल एक एक पेग हो जाये....” मदन.

मदनच्या त्या उत्तराने डिग्रीला हायसे वाटले. एकवार त्याने इतर तिघांकडे पाहीले.

“मौसम कुठाय...?” डिग्रीने अचानक विचारले.

“२०२ मध्ये...” चंदू म्हणाला.

“एवढ्या लौकर....” डिग्रीने आश्चर्य व्यक्त केले.

“हो, तिला सर्व नीट सांगितलेय.. दमली असेल सकाळपासून.. म्हणून थोडा आराम करायला गेलीय.. वेळ झाला की पहीला राऊंड ती सुरू करेलच..” नसीर गालातल्या गालात हसत म्हणाला.

“चल हे घे.. आणि तु पण आराम कर.. रात्री जागरण आहे आपलं...” मदन नविन बनवलेला पेग डिग्रीला देत म्हणाला.

“तुमच्च्या आयला... तुमच्च्या.. मजा मारलीत सकाळपासून.. आणि आता मी आराम करू काय... तुम्ही तिघं आता तासभर रूममधून सटका.. आली रे आली... आता माझी पाळी आली...” आनंदाच्या जोशात डिग्रीने एकाच दमात संपूर्ण पेग संपवला.. आणि मुठभर चिवड्याचा बकाना तोंडात भरला.

“ठिक हाय भावा.. तुझ्यासाठी रूमची कुर्बानी तर दिलीच पाहीजे...” नसीर हसत हसत बेडवरून उठला.

मदन आणि चंदूपण अंगात शर्ट चढवून रेडी होऊ लागले.

डिग्रीने तोपर्यंत ‘मौसम’ ला फोन करून खाली ‘अर्जंट’ कामासाठी बोलावून घेतले.

फोन ठेवताच इतर तिघांकडे पाहत निराश सुरात डिग्री म्हणाला..

“काय माहीत असला आयटम परत कधी नशिबात असेल..”

“बिच्चारा....” डिग्रीला प्रत्युत्तर म्हणून इतर तिघांच्याही तोंडून एकाचवेळी प्रतिक्रिया आली.

मदन, नसीर, चंदू तिघेही बाहेर जायला आणि मौसम यायला एकच वेळ साधून आली. तिला पाहत छेडत तिघेही खाली निघून गेले.

डिग्रीने अक्षरशः मौसमला आत ओढलेच.. मौसम मघाचीच तृतीयपंथीय होती. अधाशासारखं दरवाजा बंद करून डिग्री पुढचा तासभर मौसमवर तुटून पडला.

तो शांत झाला तसे तिने जवळच्या बाटलीतून बियर ग्लासात ओतली.. आणि ग्लास त्याच्यापुढे धरला. डिग्रीने तो पुढच्याच मिनिटात रिकामा केला.

पुढे काय, कसे करायचे आहे हे डिग्रीने मौसमला सांगितले. अर्थातच मौसमला अगोदरच मदनने याबद्दलची कल्पना दिली होती.

-----------------------------------------------------

डिग्रीला पूर्णपणे समाधानी करून मौसम रूममधून बाहेर पडली.

कंबर चांगलीच ठणकत होती. सकाळपासून डिग्री चौथा माणूस. त्यांची वासना, भूक त्यातून जन्मलेली तप्त अग्नी आपल्यात सामावून घेताना प्रचंड यातना होत. पण तिचं कामंच होतं ते. कस्टमरला कोणत्याही परीस्थितीत निराश करणं तिच्या धंद्याला साजेसं नव्हतं.

किन्नर समाजाचा भाग कधीच होऊ शकला नाही किंवा समाजाच्या निरुत्साही मानसिकतेने होणारही नाही. समाजाने झिडकारून लावलेलं असताना कश्याप्रकारे कुठल्या चांगल्या नोकरीची अथवा कामाची अपेक्षा किन्नरांकडून ठेवायची. भिक मागणे अथवा आपल्या शरीराचेच भांडवल करून जगण्याचा प्रयत्न करणे, याशिवाय कोणता मार्ग आपला समाज तृतीयपंथी व्यक्तीसाठी ठेवतो.

मौसमची कहाणी काही वेगळी नव्हती. ती असेल पंचवीशीची. तिलाही जगायचं होतं. किंबहुना आणखी कुणाच्यातरी आयुष्याची तजवीज तिला करायची होती. आणि त्यासाठी ‘हे’ सर्व करणं भागच होतं.

मदन मौसमला अगोदरपासूच ओळखत होता. त्याच्याच सांगण्यावरून मौसमला हे एक दिवसाचे काम मिळाले होते.

कल्याण शहरामध्ये सेक्सवर्कर किन्नर तसे जागोजागी दिसतील. त्यातल्या त्यात सोफिस्टीकीटेड, मिडलक्लास कॅटेगरीतले अथवा चिपरेटेड असे गटही होते. प्रत्येक कॅटेगरीचे आपापले प्रभाग वाटून घेतलेले होते.

मौसमची दिवसभराची कमाई हजार-दोन हजाराची होती.

पण आजच्या कामाचे तर तिला एक दिवसाचे एक लाख रूपये मिळणार होते. पन्नास हजाराचा ॲडव्हान्स तिला कालच मिळाला होता. जो तिने घरी तिच्या खास व्यक्तीजवळ सुरक्षित ठेवला होता. अशी व्यक्ती जिच्यावर ती सर्वात जास्त प्रेम करत होती.

या कामाविषयी मौसमने घरातल्या त्या व्यक्तीलाही कल्पना दिली होती.

डिग्रीकडून निघून आपल्या रूमवर आल्यावर मौसमने घड्याळाकडे पाहीले. पाच वाजले होते. ती अगदी घाईघाईतच वॉशरूमकडे वळाली.

काही वेळातच फ्रेश होऊन आल्यावर तिने तयारी करायला घेतली.

आरश्यासमोर शृंगार करताना तिला दुपारी पाहीलेला मंदार आठवला. त्याला कसंही करून आपल्यासोबत थोडं बोलतं करायचंच असा चंग तिने मनाशी बांधला. तिला सांगितलेल्या कामात तेवढंच तर होतं.

‘मंदारशी हसत बोलत त्याच्या रूममधून बाहेर पडायचेय... बस्स.. इतकंच तर काम होतं.. याचेच तर आपल्याला एक लाख रूपये मिळणार आहेत..’

‘आणि यात माझ्याकडून तरी काही चुकीचं काम होणारं नाही...’

कामात थोडी जोखीम नक्कीच वाटत होती पण तरी त्याबदल्यात मिळणारा परतावा जास्त असल्याने मौसम या कामासाठी तयार झाली होती. आणि साहजिकच तिला फक्त ॲक्टींग करावयाची होती, बाकी बाबींशी तिचा प्रत्यक्ष काही संबंध येणार नव्हता.

मंदारच्या नजरेतून मौसमने हे ताडले होते की हा माणूस पटकन भाळणारा नाही. त्यामुळेच त्याच्यासमोर इतर कस्टमरसारखे जाणे ठिक वाटले नसते. इतक्या वर्षांत मौसमचा संबंध बऱ्याच पुरूषांशी आला असल्याकारणाने तिला चांगलेच ठावूक होते की कुठल्या पुरूषाशी कश्याप्रकारे वागावे.

आरश्यासमोर असलेल्या मौसमने आपल्यातले स्त्रीसौंदर्य खुलवण्यासाठी जीन्स सोडून गुलाबी रंगाचा ड्रेस निवडला. चेहऱ्यावर हलकासा मेकअप आणि ओठांवर फिकट गुलाबी रंगाच्या लिपस्टिकचा आधार घेऊन ती मंदारला भेटण्यासाठी तयार झाली.

मौसम मनोमन या कामासाठी मदनचे आभार मानू लागली.

-----------------------------------------------------

साधारण सहा वाजण्याच्या सुमारास रूमच्या दरवाज्यावर चाहूल झाली. डोअर बेलचा आवाज ऐकताच मंदार दार उघडायला सरसावला, समोर चहाचा कप घेऊन रूमबॉय आला होता.

रूम सर्व्हंट चहा देऊन जाताच मंदार दार बंद करण्यासाठी गेला. पण दरवाज्यावर दुपारची तृतीयपंथीय व्यक्ती पाहून तो थांबला.

“हाय.. हॅन्डसम्... मी मौसम.. दुपारी तुला पाहीले होते...”

डाव्या बाजूला हलकीशी सरकलेली आपली फिकट गुलाबी ओढणी सावरत तृतीयपंथीयाने तिची ओळख करून दिली.

मौसम दिसायला उजवी होती, शिवाय स्त्रीयांप्रमाणे तिचा बांधाही कमनीय होता. मानेपर्यंत रूळलेले, मोकळे सोडलेले केस, चेहऱ्यावर हलकासा मेकअप, फुलांचे नक्षीकाम असलेला तिचा गुलाबी रंगाचा ड्रेस तिच्यातल्या स्त्रीत्वाचे प्रदर्शन करत होता.

“हो.. मग...?” मंदार कोरड्या स्वरात उद्गारला.

“मग काय... तुला पाहताचक्षणी मला जाणवले की आपण चांगले मित्र होऊ शकतो...” मौसम.

“ये भवाने... आपल्याला तसला समजू नकोस...” मंदारच्या मनात पहिली प्रतिक्रिया हीच आली. पण त्याने तसे बोलून दाखवले नाही. किंबहुना इथे आल्यापासून त्याला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी तो जपून वागत होता.

त्याच्या मनात ऊत्सुकता होती त्याच्या तिथे येण्यासंबंधी सर्व काही जाणून घेण्याविषयी. आणि अर्थातच त्याला जे काही थोडेफार क्लू मिळणार होते ते याच माणसांकडून. म्हणूनच मंदार आपल्या वागण्याबोलण्यातून सर्वांना चाचपून पाहत होता.

आणि तसंही या सगळ्यात त्याला थोडंफार का होईना पण एका थ्रिलिंग अनुभवांचं परमसुख मिळत होतं.

“हॅलो... कुठे हरवलास...?” मौसम.

“तुझं काय काम आहे सांगशील का...?” मंदारने शांतपणे विचारले.

“सांगितले ना.. मैत्री करायची आहे..? मौसमने चेहऱ्यावर स्मितहास्य आणत उत्तर दिले.

त्याच क्षणी डोअर बंद करावे असे मंदारला वाटले. तसे काही तो करणार इतक्यात त्याचे लक्ष नुकत्याच आलेल्या चहाच्या कपकडे गेलं.

आपल्या मनातल्या कल्पनेप्रमाणे त्याने मौसमशी थोडं मोकळीकतेने बोलायला सुरूवात केली.

“चहा देण्याइतपत मैत्री करू शकतो मी तुझ्याशी...” मौसमला आत येण्यासाठी जागा देत मंदार उद्गारला.

त्याने तिला चहाकडे खुणावले.

मंदारने सहजासहजी आपल्याला आत घेतल्याने मौसम मनातून सुखावली.

“हो.. हो.. चहा घेईनच मी... पण मग तू.. मी आणखी एक ऑर्डर देऊ का..” मौसम.

“नको... मी बाहेरचं सहसा काही खात-पित नाही, म्हणूनच दुपारचं जेवणही मी परत पाठवलं.” मंदारने उगाचच काहीतरी फेकायचं म्हणून फेकलं.

खरंतर मंदारला आता जपून पाऊलं टाकायची होती. त्यासाठीच तर त्याने दुपारचे जेवण नाकारले होते. आणि आता मौसमला रूममध्ये घेण्याचे कारण म्हणजे त्याला चहाविषयी संशय होता. जेवणात किंवा चहात गुंगीच औषध असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

मौसमने चहा पिल्यानंतर त्यासंबंधी खात्री झालीच असती.

मौसमने चहा पित गप्पांची सुरुवात केली. मंदारही तिच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा करू लागला. जर चहामध्ये काही असेल तर मौसमला काही काळ नजरेसमोर ठेवणे गरजेचे होते.

“अचानक नव्याने या शहरात आलेल्या व्यक्तीशी मैत्री...? खरंच तुला मैत्री करायची आहे की मैत्री करून घेण्यासाठी तुला कुणी पाठवलं आहे..” मंदारच्या खोचक प्रश्नावर मौसमला ठसका लागला आणि तिचा चेहरा पडला.

आपला शाब्दिक वार वर्मी बसल्याचे मंदारच्या लक्षात आले. तो अजूनही बारकाईने मौसमच्या डोळयांत आणि इतर हालचालींवर लक्ष ठेवून होता.

“अगदीच असं काही नाही..तु इथे नविन आहेस..?” हसत विषयाला बगल देत मौसम उत्तरली.

पंधरा-वीस मिनिटं होऊनही सर्वकाही नॉर्मल असल्याने मंदारची चहाविषयीची शंका दूर झाली.

एव्हाना मौसमचेही मंदारशी ओळख करून घेण्याचे काम संपले होते. त्यामुळे निघण्यासाठी ती उठली, मंदारलाही नाहीतरी तेच हवे होते.

बाहेर येताना मुद्दाम मौसमने मंदारला हग केलं. आणि स्माईल देत म्हणाली,

“अच्छा बाय्.. भेटू पुन्हा...”

मंदारला हे अनपेक्षित असूनही त्याने नकार दर्शविला नाही..

“ओके.. सी.. यू...” मंदार उत्तरादाखल म्हणाला.

मौसम आणि मंदार दोघेही आपापल्या मनात एकमेकांविषयी तर्क लावत होते. तिच्या मतानुसार त्याच्याशी अगदी कमी वेळात ओळख करून घेण्याची तिची चाल यशस्वी ठरली होती. त्याच्या मतानुसार त्याने तिचा परीस्थितीनुसार किमान चहासाठी तरी वापर करून घेतला होता.

अर्थातच ते फक्त त्यांच्या मनातले तर्कवितर्क होते. बाहेरच्या परीस्थितीपासून मंदार अजूनही काहीच अंदाज बांधू शकला नव्हता. शिवाय मौसमही बऱ्याच गोष्टींबद्दल अजून तरी अंधारातच होती. तिचा सहभाग फक्त या एका भेटीपुरताच मर्यादित होता किंवा आणखी काही तिच्या हातून घडणार होते, या प्रश्नांची उत्तरे फक्त येणारा काळच देणार होता.

मंदार दरवाज्यापासून थोडा बाहेर होता. मौसम त्याच्यासमोरच कॉरीडॉरमध्ये उभी होती.. दोघांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होते..

त्यांच्या नकळत कुणीतरी याच संधीची वाट पाहत होतं... हो.. हीच योग्य वेळ होती...

कॉरीडॉरच्या दुसऱ्या टोकावर एक कॅमेरा तयारच होता.. एका परफेक्ट क्लिक साठी....

‘म्हणजे मंदार आणि मौसमवर वॉच ठेवला गेला होता...? मंदारला इथे बोलावण्यात काय हेतू असावा..?

कोड थ्री वन् फाईव्ह् सीक्स् पुन्हा उपयोगी पडणार होता का..?

जर एखाद्या अनुचित कामासाठी कुणाला फसवायचंच होतं तर जवळपासच्या भागातलाच माणूस का नाही..?

लांब कोल्हापूरवरून मंदारलाच का बोलावले होते..?

आणि जरी डाव मंदारसाठी आखण्यात आला होता, तरी मौसमचा या खेळात नेमका किती सहभाग होता..?

का ती फक्त कठपुतली होती कि स्वतः सावज...?’

या सर्व प्रश्नांची उत्तरे घेऊन लवकरच पुन्हा भेटू पुढच्या भागात...

डॉमिनंट - भाग दोन

“हम्म्...”

..............................

“वो फोटोग्राफर तो अपना खासमखास है.......... हार्ड कॉपी कल तक मिल जायेगी..”

.......................................

“ठिक...”

.....................

“उसकी फिक्र छोड दो.... काम लगभग पूरा होने को है.....”

भारदस्त आवाजात पठाणी घातलेला तो अंगणातल्या व्हरांड्यात पाठमोरा उभा राहून फोनवर कुणाशीतरी बोलत होता. शरीरयष्टीही त्याच्या आवाजाला साजेशी अशीच तगडी होती. फोनवर बोलताना त्याच्या उजव्या हातातला चांदीचा जाडजूड कडा मागून सहज दिसून येत होता.

बोलणे संपताच त्याने आपल्या स्मार्टफोन वरून लगेच दुसरा नंबर डायल केला.

“हॅलो...”

....................

“फोटोग्राफरको पैसा देकर निकलने बोल... और उसको कलकी डिलीव्हरी का याद दिला दे...”

...........................

“हा उसका भी काम हो गया है... बाकी क्लियर करके जाने बोल दे...”

..............

“और रात को काम करके फौरन निकल आना.. याद रख ‘बकरे’ की मरम्मत करनी है.. पार्टी को खुनखराबा नही चाहीये...”

“ओके भाय...”

असा समोरून काहीश्या अस्पष्ट आवाजात होकार मिळताच याने फोन कट केला..

# डॉमिनंट भाग २

**माणसाला बऱ्याचदा असे वाटते की सर्वकाही त्याच्या अंदाजानुसार चालले आहे, किंबहुना तो तसेच व्हावे यासाठी झटत असतो. पण खरेच असे होते का...? डाव जिंकण्यासाठी आवश्यक सर्व हुकमी पत्ते जरी समोरच्या माणसाकडे असले तरी त्यातूनही विरूद्ध बाजूला बसलेला एखादा गॅम्बलर तो डाव त्याच माणसावर उलटवून जिंकतो.**

मदनला इन्स्ट्रक्शन देणारा भाय हा खरंतर कल्याणलगतच्या गावाजवळील झोपडपट्टीचा इरफान दादा होता. चोरी, हाल्फ मर्डर, छोटेमोठे दरोडे, खंडणी, हप्तावसुली ही त्याच्या उत्पन्नाची मुख्य साधने होती. चाळीशी पार केलेली असली तरी गुन्हेगारी जगतातल्या त्याच्या दीर्घ अनुभवामुळे तो लीडर बनला होता. कमाई जरी जास्त असली तरी त्याप्रकारचे राहणीमान दाखवण्यात त्याला स्वारस्य अजिबात नव्हते. मदन, डिग्री, नसीर, चंदू ही त्याचीच पाळलेली माणसं होती. त्यांच्या एकूण हालचाली आणि प्लॅनिंगवरून तरी ती या क्षेत्रात मुरलेली वाटत होती. मौसम तर फक्त त्यांचं प्यादं म्हणून तिथं होती.

इरफान भाय आपल्या माणसांना त्यांचा योग्य तो मोबदला कसाही करून मिळवून द्यायचा. हीच तर ती माणसे होती ज्यांच्यामुळे इरफान 'भाई' म्हणून मिरवू शकत होता.

मदनला जरी इरफान भायने पुढे करावयाच्या कृती स्पष्ट करून सांगितल्या असल्या तरी या सर्वामागचा सूत्रधार कुणी औरच होता. मंदारला इथं आणायचं कारणही त्यानेच निर्माण केलेलं होतं. आणि आता इरफान भायशी फोनवर संभाषण करून सर्वकाही सुरळीत असल्याची खात्री करून घेतली होती.

आणि मंदार... आतापर्यंत मंदारसोबतची आपापली भूमिका प्रत्येकाने चोख बजावली होती. पण मंदारने आपले रंग अजून दाखवलेच नव्हते.. तो फक्त वाट पाहत होता एका संधीची.. कारण तो जाणून होता त्याला इथपर्यंत आणणारी व्यक्ती कुणी औरच आहे. बाकी सगळे त्या व्यक्तीच्या इशाऱ्यावर नाचणारे नाच्ये आहेत..

हो नाच्येच.. कारण इथं आल्यापासून भेटलेल्या कुठल्याही व्यक्तीला तो सहज लोळवू शकत होता. त्याच्या तोडीचं अजून त्याला या गेममध्ये कुणीच दिसलं नव्हतं. त्या मुख्य व्यक्तीला लवकरात लवकर शोधणं मंदारसाठी आवश्यक होतं.. आणि त्यासाठी त्यांच्या प्लॅनमध्ये नसलेलं असं काहीतरी घडणं गरजेचं होतं.

---------------------------------------------------

मंदार बेडवर पडल्यापडल्या स्वतःशीच विचार करत होता.

**‘एक्झॅक्टली.... प्लॅन हे ठरवून दिलेल्या क्रमानुसारच एक्झिक्यूट होत असतात... प्लॅनविरूद्ध एखादी छोटीशी गोष्ट जरी घडली की संपूर्ण बनवलेला प्लॅन बदलावाच लागतो. आणि तिथेच चूक होण्याची शक्यता असते.’**

मंदारच्या चेहऱ्यावर हसु उमटले. रात्रीचे साडेआठ वाजले होते. पोटात भुकेने सिग्नल दिला होता.

बाजूला लागूनच रूम असल्याने मंदारने मौसमला तिच्या रूममध्ये जाताना पाहीले होते. झटकन उठून तो काही क्षणांतच रूम नंबर २०२ च्या दरवाज्यात होता. त्याने आजूबाजूला पाहीले आणि बेल वाजवली.

दरवाजा उघडताच मौसमच्या चेहऱ्यावर आश्चर्याची छटा त्याला दिसली.

“तू... आता... ईथे....” मौसमला त्याच्या येण्याचे नवल वाटत होते.

“का.. मित्र येऊ शकत नाही का भेटायला....” मंदारने तिरकस प्रश्न केला.

“हा.. हा.. नक्कीच येऊ शकतो...” मंदारला आतमध्ये घेत मौसम म्हणाली.

आत येता येता मंदारने रूममध्ये नजर फिरवली. मौसमची तयारीत पॅक केलेली बॅग पाहून तो चक्रावला.

“कुठे जाण्याची तयारी काय...?” मौसमकडे पाहत तो उद्गारला

“हो... इथले काम संपले.. आता सरळ घरी....” मौसम.

“ओह यार्... कसलं फुटकं नशिब घेऊन जन्माला आलोय मी...” मंदारनं तुटक शब्दांत आपलं दुःख दाखवलं. त्याच्या मनात एव्हाना पुढे करावयाच्या गणितांची आकडेमोड सुरू झाली होती.

मौसम तिला काही कळालं नसल्याचा भाव घेऊन त्याला पाहत होती..

“डिनर आणि आजची रात्र तुझ्यासोबत अविस्मरणीय अशी करण्याची माझी इच्छा बहुतेक मनातच राहील...” मंदारच्या बोलण्यात एकप्रकारची खंत होती.

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी मौसमची होती..

“मी...? मी चालेन का तुला पण...तुझे पता है ना मैं कौन...” मौसम.

“त्याने काय फरक पडणार आहे... “

**“इस लम्हे में तू मिल जाये तो तू हसीन शाम है,**

**क्या फर्क पडता है फिर, चाहे जो भी तेरा नाम है...”**

मंद हसत तिच्या डोळयांत पाहत मंदारने तिला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला.

“इमोशन में बहकके दोस्ती नहीं बढती दोस्त... मौसम मर्दों से दोस्ती पैसे के लिये ही करती है मग तुला पण एका रात्रीचे पाच हजार द्यावे लागतील....” तिनं आपला प्रोफेशनधर्म त्याच्यासमोर प्रस्तूत केला.

“सकाळी जाताना मागशील तितके भेटतील..” त्याच्या आवाजात दृढता होती.

मौसमने एक क्षण विचार केला. नाहीतरी मदनचे काम संपले होते आणि त्याने तिचे बाकीचे पैसे देऊन तिला रात्रीच निघण्यासाठीही सांगितले होते. मौसम आता तिच्या इतर कामांसाठी मोकळीच होती. मग आजची रात्र मंदारसोबत त्याच्या रूममध्ये घालवण्यात काहीच वावगे नव्हते. अर्थातच त्यातूनही एक्स्ट्रा कमाई होणारच होती.

मंदारला होकार देण्यासाठी ती आपले ओठ उघडणारच होती की मंदार कानोसा घेत दबक्या पावलांनी दरवाज्याकडे धावला. बाहेरून कसलीतरी चाहुल लागली होती. हलक्याश्या उघडलेल्या दरवाजातून मंदारने रूम सर्व्हंटला दुसऱ्या बाजूच्या एका रूममध्ये जाताना पाहीले. जेवणाच्या प्लेट्सचा टेबल बिघडलेली लिफ्ट पुन्हा चालू झाल्याची सुचना देत होता.

तो मागे फिरला आणि मौसमच्या उत्तराची प्रतिक्षा करू लागला. मौसमने इशाऱ्यानेच होकार दिला.

“मी निघतो, तुझं जेवण कॅन्सल कर.. म्हणजे कुणाला शंका येणार नाही. (बाहेर बोट दाखवत) तो खाली गेला की माझ्या रूमवर ये...” मंदार मौसमला सुचना देऊन निघून गेला.

मौसमने मागे पाहीले. बेडवर तीची भरलेली बॅग होती. महत्वाचं म्हणजे त्यात मदनने दिलेले कामाचे उरलेले पन्नास हजार रुपये होते.

काही झालं तरी ते मंदारपासून लपवणे गरजेचे होते. कारण फुकटचा पैसा कुणाला हवाहवासा वाटत नाही, त्यात मंदार अजूनतरी तिच्यासाठी नविनच होता. पण ही रूम सोडणेही अत्यावश्यक होते, मदनला कळाले तर त्याच्या रागाला सामोरे जावे लागले असते. पहाटे कुणाच्याही नजरेत न येता निघायचे, असे तिने मनोमन ठरवले.

सगळं काही विशिष्ट पद्धतीत करायचं ठरवून तिने हातातल्या फोनकडे पाहीले. मघाशी मंदारच्या नकळत शिताफीने मोबाईलवर त्याचा काढलेला फोटो तिच्या हुशारीचं प्रतिक होता.

अवघ्या पंधरा मिनिटात मौसम रूम नंबर २०१ मध्ये होती. जेवणाचे ताट भरलेले होते, मंदारने तिला जेवण्यासाठी खुणावले. तिने नकार दिला. खरं सांगायचं तर मंदारलाही हेच होतं. पण जेवण तपासण्यासाठी ते मौसमने थोडं तरी खाणं आवश्यक होतं.

“हे काय स्वीटी... तुला थोडं तरी खावंच लागेल...” असं म्हणत मंदारने बळेच तिच्यासमोर ताटातल्या मुख्य पदार्थांचा एकत्रित घास करून तिला खायला लावला.

थोडा वेळ रोमँटीक गप्पांमध्ये घालवल्यानंतर आणि आपल्या मनातल्या शंकेचं निरसन केल्यावर मंदारने आपली पोटातली भूक भागवली.

**त्यानंतरची रात्र त्यांचीच होती..**

-----------------------------------------------------------

खाली पहील्या मजल्यावर बऱ्याच वेळापासून सुरू असलेली कसलीशी खलबतं नुकतीच थांबली होती. सगळी तयारी जवळपास होतच आली होती. नसीर खिडकीत उभा राहून सिगरेटचे झुरके ओढत नाकातून धूर सोडत होता. मदन आणि डिग्री हातातला शेवटचा पेग संपवतच होते. त्या सगळ्यांत थोडासा कच्चा असलेला चंदू नसीरकडे कुतूहलानं पाहतच होता.

चंदूला नेहमीच नसीरच्या नाकातून धूर सोडण्याच्या कसबाचं आश्चर्य वाटायचं.. त्यानंही सिगरेट ओढण्याचा एकदोनदा प्रयत्न केला होता. पण सिगरेट काही त्याची गर्लफ्रेंड व्हायला तयारच नव्हती.

मदननं नसीरकडे पाहणाऱ्या चंदूकडे एक कटाक्ष टाकला.

“अरे... त्याला सोड... त्यात एवढं काय विशेष न्हाई...” मदन बोलू लागला तसे सगळे त्याच्याकडे पाहू लागले.

“तुला मी डोळ्यांतून धूर काढून दाखवू शकतो...” चंदूकडे पाहत मदन म्हणाला.

“तुला जास्त झालीयं... अजून काम संपलेलं नाय... सावध रहा म्हणे डोळ्यांतून धूर काढील...” चंदू उपहासानं मदनला म्हणाला.

“आरर् हाट्ट.. बीयर कुणाला चढती का कधी...” मदन चढ्या आवाजात उद्गारला.

भायच्या ऑर्डरमध्ये आजचा दिवस फक्त बीयरशिवाय कसलीही ड्रिंक न घेण्याचं बंधन होतं. ऐन वक्ताला काम चोख होणं गरजेचं होतं.

“चल ये, तुला दाखवतो...” असं म्हणत मदन चंदूजवळ गेला.

चंदू अजूनही त्याच्याकडे अविश्वासाने पाहत होता. नसीर आणि डिग्री त्यांच्याकडे पाहत गालातल्या गालात हसत होते.

मदनने सिगरेट पेटवली..

“हम्म... बघ डोळयात नीट बघ...” मदन काहीतरी महत्वाचं सांगत असल्यासारखं म्हणाला.

चंदू निरखून त्याच्या डोळयात लक्षपूर्वक पाहू लागला.

मदननं डोळे बंद करत श्वास भरून सिगरेटचा एक लांब झुरका ओढला. बीयर आणि सिगारेटची एकत्रित नशा त्याला झटका देऊन गेली... त्याच्या हातातील जळती सिगरेट चंदूच्या पायाला अर्धा-एक सेकंद चटका देऊन बाजूला झाली. मदनचे हळूहळू उघडणारे डोळे लालसर भासत होते.

सर्व लक्ष मदनच्या डोळयावर केंद्रीत असल्याने चंदूला सिगरेटचा चटका समजायला थोडा अवकाश लागला. पण त्याकडे दुर्लक्ष करत तो म्हणाला..

“भो×××च्या... कुठे आहे धूर....?” चंदू.

“हा..हा..हा.. माझ्या न्हाय तुझ्या डोळयात बघ....” चटक्यामुळे चंदूच्या डोळयातून आलेल्या अश्रूंकडे दर्शवीत मदन हसू लागला. त्याला साथ द्यायला नसीर आणि डिग्री तयारच होते.

चंदू झाला प्रकार समजून स्वतःच्या मूर्खपणावर खजिल झाला. पण काही बोलला नाही.

हसता हसता आलेला खोकला दाबण्यासाठी डिग्रीने पॅन्टच्या खिश्यात हात घालून रूमाल बाहेर काढला. त्याचवेळी रूमालासोबत खाली पडलेल्या किल्लीने सर्वांचेच हसू थांबविले.

वातावरण पुन्हा गंभीर झाले.. हीच ती डुप्लीकेट किल्ली होती.. रूम नंबर २०१ ची.. डिग्रीने संध्याकाळीच तिची सोय केली होती.. आज रात्री मंदारच्या रूमचा दरवाजा याच किल्लीने बाहेरून उघडला जाणार होता..

रात्रीचा एक वाजून गेला होता. गावालगतचा भाग असल्याने सगळीकडे नीरव शांतता पसरली होती. थोडाफार रातकिड्यांचा आवाजच काय ती शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत होता.

लॉजमधल्या पायऱ्या वगळता बाकी जागेतल्या लाईटस् बंद झाल्या होत्या. मदनने बोटांत 'पंच' चढवला. नसीर, चंदू, डिग्री आपापल्या परीने सज्ज झाले.. सगळे बाहेर पडण्याआधी चंदू एकदा बाहेर जावून सर्व आलबेल असल्याची खात्री करून आला.

---------------------------------------------------

इकडे रूम नंबर २०१ मध्ये अंधार पसरला होता. आकाशातील चांदण्यांच्या खिडकीतून येणाऱ्या काहीश्या प्रकाशामूळे मंदसा उजेड होता. पण तो उजेड फक्त मानवी आकृत्या दाखवण्याइतपतच होता. कुणाचा चेहरा दिसणे अवघडच..

बेडवर स्त्री आकृती असल्याने बहुधा ती मौसमच पालथी पहुडली असावी. मंदारसारख्या रानटी गड्यासोबत कदाचित तिची पहीलीच वेळ असावी. कारण नक्की सांगता येत नव्हते, त्यांच्यात काही झाल्याची शाश्वतीही देता येत नव्हती, पण मौसमच्या अवतारावरून तर 'तसली' शक्यता नाकारता येत नव्हती.

मानेवर रूळणारे तीचे केस विस्कटले होते. चादरीत अंग झाकल्यामुळे तिच्या अवस्थेचं ठिकसं वर्णन करता येत नव्हतं. एकंदरीत तीची फार दमछाक झाल्याचं चित्र समोर उभं राहीलं होतं.

समोर खुर्चीत मंदार कसलासा विचार करत बसला होता.

अचानक दरवाज्याजवळ झालेल्या चाहुलीनं मंदारचं चित्त भंग पावलं. तो दबक्या पावलांनी तिथं जाऊन कानोसा घेऊ लागला. कि-होल वर बाहेरून किल्ली लावल्याचा आवाज त्यानं स्पष्ट ऐकला.. किल्ली लागून लॉक हळूच उघडले... मंदार सावध झाला.. आजच घात होण्याचा त्याचा अंदाज खरा ठरू लागला होता.

करऽर.... करत जसा हळूहळू दरवाजा उघडू लागला... मंदार त्याच्या मागे आडोशाला आला... एक एक करत चार व्यक्ती शांतपणे आतमध्ये आल्या. काळोख

जरी असला तरी त्यातल्या एका व्यक्तीने लाईटच्या बटणांची जागा पक्की ठाऊक असल्याप्रमाणे पहील्याच प्रयत्नात स्विच ऑन केले.

झटकन रूममध्ये प्रकाश पडला.. चौघांची नजर सर्वप्रथम बेडवर पालथ्या झोपलेल्या मौसमवर पडली.. तिला तिथं पाहताच त्या चौघांची अक्षरशः भंबेरी उडाली.. प्लॅन फसत असल्याचा विचार त्यांच्या मनाला शिवून गेला.

इतका खटाटोप करून बनवलेल्या डावाचा मौसममुळेच सत्यानाश होणार होता. मदन तर शिव्या घालतच मौसमवर धावून गेला. नसीर, डिग्री आणि चंदूही दातओठ खाऊन पुढे सरसावले. रागाच्या भरात ते चौघेही मंदारबाबत विसरूनच गेले.. आणि इथेच त्यांची घोडचूक झाली.. चूक...? नाही... .. एक अक्षम्य असा अपराध...

त्यांच्या गाफील राहण्यामुळे मंदारला काही क्षण का होईना आलेल्या प्रसंगाची जाणीव झाली आणि आपली चाल चालण्याची संधी मिळाली होती. ते काही क्षण त्याच्यासाठी पुरेसे होते..

लाईटस् च्या प्रकाशात मंदारने किडूकमिडूक हत्यारांनिशी आलेल्या त्या चौघांना मागून नीट न्याहाळत स्वीच ऑफ केला. पुन्हा रूममध्ये अंधार पसरला.

धप्प... करून लाथेचा एक मजबूत प्रहार सर्वात मागे असलेल्या चंदूच्या पाठीवर पडला.. त्या आघातानं चंदू कळवळत जाऊन बेडवर असलेल्या मौसम जवळ जाऊन पडला.

“आ....आहह....” मौसमच्या मुखातून वेदनेनं भरलेली अस्पष्ट अशी किंकाळी फुटली..

काय झाले ते पाहायला मागे वळणाऱ्या नसीर आणि डिग्रीवर मंदार वीजेच्या चपळाईने धावला. पुढच्याच क्षणी डिग्री डाव्या बाजूला असलेल्या खुर्चीवर आदळला होता, तर नसीर बेडवर चंदू आणि मौसमच्या मध्ये असलेल्या जागेत पडला होता. चंदूचा उजवा हात नसीरच्या अंगाखाली आल्याने चंदू मोठ्या आवाजात विव्हळला.

मौसमची किंकाळी, चंदूचं विव्हळणं आणि डिग्रीचं खुर्चीवर आदळणं... फ्रिक्शन ऑफ सेकंद मधल्या या तिन्ही घटणांवर प्रतिसाद देताना मदनचे डोळे उजव्या बाजूकडून डावीकडे वळाले. परंतू त्याच्या नजरेच्या दृष्टीक्षेपात समोरून येणारा मंदारचा ठोसा त्याला दिसू शकला नाही.. चौघांपैकी कुणीही कल्पना सुद्धा केली नव्हती असं काहीसं त्यांच्यासोबत घडत होतं.

**बेसावध क्षणी मंदारने त्या चौघांवर हल्ला चढवून एकप्रकारे आपलं वर्चस्व सिद्ध केलं होतं.**

चंदू आणि नसीरनं आरडाओरड करत उठण्याचा प्रयत्न केला, परंतु मंदारने पुन्हा दोघांवर आपल्या बाहूबलाचा प्रयोग करून त्यांना फारशी हालचाल करू दिली नाही.

बाहेरची परीस्थिती जाणून घेण्यासाठी मंदार दरवाज्याजवळ आला. त्याने पाहीले की कॉरीडॉरमधल्या सर्व लाईट्स ऑन झाल्या होत्या आणि पायऱ्यांवरून दोन-तीन माणसे घाईत वर येत होती.

“डॅमीट.... रां×च्ये...” मंदारच्या तोंडातून रागातच उद्गार बाहेर पडले. चंदू आणि नसीरच्या गोंधळ घालण्याच्या हरकतीबद्दल त्यांना चांगलेच बदडून काढावे असा विचार त्याच्या मनात आला.

त्याने शक्य तितक्या लवकर डोअर आतून लॉक केला.

‘थड्डडड.....थाड्ड्ड.....’

मंदार दरवाजा लावून मागे वळणार तितक्यात त्याच्या पाठीवर खुर्चीचा आघात झाला... आणि डिग्रीनं हातातली खुर्ची स्वतःच खाली केली.. मंदारच्या डोळ्यांतली आग डिग्रीला इतक्या अंधारातही स्पष्ट दिसली. त्याच्या तसल्या अवताराने डिग्रीचे धाबे दणाणले.

“असल्या फडतूसड्या प्लॅस्टिकच्या खुर्चीनं माझं काय होणार आहे रां×च्या....” असं म्हणत मंदारने डिग्रीच्या कानसूडात वाजवली त्याचा तडाखा इतका जबरदस्त होता की एकदोन क्षण डिग्रीचे कान वाजू लागले..

कमजोर सावजांना न्याहाळत वाघ जसा सभोवताली नजर फिरवतो तसा मंदार सगळ्यांकडे एकवार पाहत होता. समोर मदनच तेवढा सावरण्याच्या तयारीत

दिसत होता... मंदारचा हात हत्यार काढण्यासाठी शर्टाच्या आतल्या बाजूस गेलाच होता की अचानक दरवाज्यावर 'धाडधाड' आवाज येऊ लागला..

मंदारच्या चेहऱ्यावरचा रंग त्या आवाजाने उडाला.. तिथून बाहेर पडणे त्यावेळी महत्वाचं होतं.. दरवाज्यातून जाणं शक्य नव्हतं... इतक्यात डिग्रीनं जवळ असलेले स्विच दाबून लाईट चालू केला.

डिग्रीला पुन्हा पकडून त्याला आपल्या डाव्या हाताचा प्रसाद देत मंदार बेडपर्यंत घेऊन आला.. डिग्रीनेही मंदारवर एक दोन प्रहार केले परंतु त्याचा फारसा फरक मंदारवर पडला नाही.. त्याला बेडवर चंदू आणि नसीरच्या अंगावर फेकत मंदार सावरलेल्या मदनकडेच वळणार होता की बेडवरचे दृष्य तो अचंबित होऊन पाहतच राहीला..

मौसमच्या मुखातून पुन्हा एकदा आवाज काढण्याचा प्रयत्न झाला होता...

बेडवर डिग्रीचा उजवा हात एका चाकूवर असून सोबत नसीर आणि चंदू दोघांचे रक्ताळलेले हात त्या चाकूभोवती होते. तो चाकू जवळपास पूर्णपणे मौसमच्या पाठीत छेदून गेला होता.. ती बिचारी वेदनेनं तळमळत मृत्यूची प्रतिक्षा करत असल्यासारखी निपचित पडून होती. त्यात भरीसभर म्हणून काय तर डिग्रीही तिच्या अंगावर आपलं धूड घेऊन पडला होता.

मंदार स्तब्ध होऊन तो प्रसंग पाहतच राहीला. दरवाजातून पुन्हा आवाज आला तसा भानावर येत मंदार तिथून निसटण्यासाठी सरसावला.. त्याच क्षणाला मदनच्या 'पंच' चा निसटता वार मंदारवर झाला.

'कर्रर्र्......' मंदारचा शर्ट फाटून आतमध्ये छातीवर तो वार बसला होता...

अक्षरशः घाईघाईतच मंदारनं जखमेकडे दुर्लक्ष करत.... "हाड्ड्... भे×××...." पुटपुटत त्याने मदनला बाजूला ढकलले.. आणि सुसाट खिडकीच्या दिशेला पळाला.. खिडकीतून मागच्या भागाची त्याने अगोदरच पाहणी करून ठेवली होती. जवळच ठेवलेली अमेरीकन टुरीस्टर उचलत त्यानं खिडकीबाहेरचा कठडा गाठला... पहील्या झेपेला तो बिल्डींगच्या मागच्या बाजूला असलेल्या पाईपवर आणि दुसऱ्या झेपेत त्याच्या बाजूला असलेल्या फर्स्ट फ्लोअरच्या कमानीपर्यंत पोहोचला.. तिथून सरळ खाली असलेल्या झुडुपात उडी मारत त्यानं निसटण्याचा प्लॅन परफेक्टली एक्झिक्यूट केला होता.

लॉजचं नुकतंच रिनोव्हेट केलेल्या खुणांचे अवशेष तिथेही पडून होते. झुडुपात असलेल्या दगड, तुटलेल्या विटा आणि सिमेंटच्या गोण्या अंधारात त्याला दिसल्या नसल्याने खाली उडी मारल्यावर त्याच्या अंगावर शिरशिरी आली. काहीसा कण्हत त्याने आपला मोर्चा मेनरोड कडे वळवला...

चारही सर्राईत गुन्हेगारांचा प्लॅन त्यांच्या शहरात नव्याने आलेल्या इसमाने त्यांच्यावरच उलटवत आपलं वर्चस्व दाखवून दिलं होतं... खरंच तो 'डोमिनंट' असल्यासारखाच वागला होता...

# डॉमिनंट भाग तीन

**मंदारला कोल्हापूरहून इथे आणण्याचा प्लॅन एकाचा. त्यात त्याने लोकल भाईला समाविष्ट करून घेणे. मंदार आणि मौसमची भेट, मौसमचा खुन होणं, तेव्हा खुनाचं हत्यार डिग्री अथवा नसीर किंवा चंदूच्या हातात असणं.. मग नेमकं तिला मारलं कोणी...? मंदारची त्या लोकल भाईच्या गुंडांशी हातापाई होणं, मंदारचं तिथून पळून जाणं... पण मंदार का बरं पळाला असावा तिथून..?**

लॉजच्या मागच्या बाजूला असलेल्या माणूसभर उंच कट्ट्यावरून धडपडत उडी मारत मंदार तिथल्या चिंचोळया गल्लीतून मेनरोडवर आला. आजूबाजूला पसरलेली बारीक झाडी तुडवत पुढे येताना त्याला शरीरावरच्या जखमांची जाणीव होत होती.

इतक्या रात्रीही वाहनांची रहदारी तुरळक प्रमाणात सुरू असल्याने अधूनमधून रस्त्यावर प्रकाशामय वातावरण निर्माण होते. आडोशातून मिळणाऱ्या थोड्याफार अंधारातून मंदार लॉजपासून काहीसा दूर सुरक्षित ठिकाणी येऊन थांबला.

आकस्मिक घडलेल्या या प्रसंगानंतर मंदार मनाच्या द्विधा अवस्थेत विचार करू लागला. इथून निघून पुन्हा गावी जावे तर धोका नक्कीच टळणार होता, पण इथे त्याच्या येण्याचा उद्देश कधीच कळू शकला नसता. झाल्या प्रकाराचा काय तो सोक्षमोक्ष लावल्याशिवाय तिथून जाईल तो मंदार कसला..?

आणि म्हणूनच सगळया प्रकरणाची उकल लावूनच गावी घराकडे जाण्याचा निर्धार त्याने केला.

बसलेल्या जागेवरून मंदार लॉजच्या दिशेला नजर ठेऊन होता. तिथून लॉजचे मुख्य प्रवेशद्वार आणि आसपासचा परिसर बऱ्यापैकी दिसत होता. अजूनतरी तिकडे शांतता होती. काही वेळातच एक पोलिस व्हॅन त्या प्रवेशद्वारातून आतमध्ये गेली. बहुतेक पोलिसांना कुणीतरी मौसमच्या खुनाची खबर दिली असावी.

पण हा खुन केला कुणी...? कश्यासाठी...? मौसमला कुणी का मारावं...? तिचं कुणाशी काही वैर वगैर असावं... किंवा.... ओह् गॉड्.... हा मंदारवर आळ आणून त्याला खूनाच्या प्रकरणात गोवण्याचा प्लॅन तर नसावा..

मंदारनं झटकन मागे अडकवलेली बॅग चाचपली. खिश्यात हात घूसवून रूमाल, वॉलेट तपासले. सगळं काही जागेवरच होतं. कोणताही पुरावा मागे ठेवला नसल्याची खात्री त्याने करून घेतली.

लॉजच्या पुढच्या बाजूला आता बऱ्यापैकी प्रकाश होता. एव्हाना तिथं दहा-बारा माणसं जमली होती. बहुधा ते इतर रूम्स् मधले गेस्ट असावेत. एक हवालदार व्हॅनजवळ उभा होता. मंदार परीस्थितीचं निरीक्षण करत मनात पुढे करावयाच्या बाबींवर अंदाज घेत होता. डाव्या बाजूला लॉजवरच्या हालचाली टिपन्यात मग्न असलेला मंदार उजव्या दिशेने गाडीचा करकचून ब्रेक मारल्याच्या आवाजाने भानावर आला...

राखाडी रंगाची काहीशी लांबट होंडा सिटी समोर रस्त्याच्या बाजूला येऊन अचानक थांबली. तिच्यापासून अवघ्या दहापंधरा फुटांवर मंदार होता. पण मंदार

आडोशाला झाडाझुडपांसोबत असल्यामुळे बाहेरून कुणी बारीक नजरेनं पाहिल्याशिवाय तो दिसला नसता.

कार थोडावेळ तशीच थांबली. कारच्या आतमध्येही इतकावेळ काही हालचाल झाली नाही.

तिकडे लॉजजवळील हालचालींना वेग आला. खाकी गणवेशातील दोनजण खाली आले. त्यांच्यासोबत पाच-सहा माणसेही होती. घाईघाईने सर्वजण लॉजच्या मागच्या दिशेने वळाले. एकूण सगळया गोष्टींची कल्पना मंदारला आली होती.

ते पोलीस आपल्याच तपासात तिकडे गेले असल्याची खात्री त्याला झाली.

आता काहीही करून आसपासचा परीसर शोधला जाऊ शकतो त्यामुळे तिथंच बसून राहणे मंदारला परवडण्यासारखे नव्हते.

समोर आलेल्या कार बद्दल जाणून घेण्याची ईच्छा असतानाही नाईलाजाने मंदारला निघणे भागच होते. त्याने कारचा नंबर पाहण्याचा प्रयत्न केला पण अंधुक वातावरणामुळे तो फोल ठरला. शिवाय समोरून पोलीसांचा मोर्चा त्याच्या दिशेने येताना त्याला दिसला. आणि मंदार क्षणभरही न थांबता आतल्या झाडाझुडपांतून वाट काढू लागला.

सुरक्षित ठिकाणी पोहचेपर्यंत तो वाटेत येणारे काटेकुटे तुडवत तसाच झपाझप पावले टाकत पुढे जात होता. अर्धा तास पायपीट केल्यावर मंदार मुंबई-नाशिक एक्सप्रेस हाईवेवर पोहोचला.

जवळच्या ढाब्यावर विश्रांती करण्याच्या हेतूने त्याने तिकडे कूच केले.

अनोळखी शहर त्यात मध्यरात्र उलटून गेलेली, शरीरावरच्या किरकोळ जखमा, काट्यांतून वाट तुडवताना खरचटलेले पाय, आणि इतका वेळ चालण्यामुळे मंदारला विसाव्याची गरज होतीच.

काही वेळातच ढाब्यावरच्या टॉयलेटमधून बाहेर पडताना मंदार थोडा फ्रेश वाटत होता. त्याच्या अंगातले बदललेले कपडे, डोळयांवर डार्क ब्लॅक रंगाची फ्रेम असलेला ट्रान्स्परंट ग्लासेसचा चश्मा त्याच्या एकूण लूक्स् मध्ये कमालीचं अंतर पडल्याची साक्ष देत होता.

नाही म्हणायला फक्त एक-दोन शहराबाहेर जाणाऱ्या ट्रॅव्हलस् तिथं उभ्या होत्या. आणि दहा-बारा माणसं वगळता खाली ढाब्यावर कुणी फारसं उतरलं नव्हतं.

आसपास १८०° च्या कोनात नजर फिरवत मंदार काऊंटरपाशी गेला. तिथं खाण्यासाठी काही ऑर्डर देऊन फिरावं तर त्याची दृष्टी कोपऱ्यात उभ्या इसमावर गेली.

तिथं आलेल्या काही प्रवाशांपैकी दोनएक बायकांवर हपापलेल्या नजरेनं पाहत तो इसम आपल्या मनाचं समाधान करण्यात मग्न होता. मागून खांद्यावर पडलेल्या थापेनं त्याचं लक्ष विचलित झालं.

मंदारला बाजूला पाहताच आरीफ चकीत झाला पण क्षणभरच.

“कुणाच्या इशाऱ्यावर मला इकडे आणलं..?” मंदारनं त्याला बकोटीला घट्ट पकडून ठेवत विचारलं.

मंदारचा आवाज कठोर होता. त्याचा प्रश्न विचारण्यातलाच दरारा इतका वाटावा की भलाभला गुन्हेगारही त्याचं उत्तर देणं टाळू शकला नसता. आणि आरीफ तर त्याच्यासमोर मच्छर होता अगदीच.

आरीफही काहीकाळ गांगरून गेला पण सावरत त्याने उलट उत्तर दिले.

“मुझे खाली पैसा दिखता है दोस्त.. उसके ही इशारे अपन समझता है..! तेरे को इधर कौन लाया, कायकु लाया अपना इस्ससे कोईच वास्ता नई.. और तू किधरसे आया ये भी पता नहीं.. डिग्री बोला उतना मैं किया और बदले में अपने को अपना खुदा माने पैसा मिला....” आरीफ रोखठोकपणे सांगून मोकळा झाला.

याच्यावर हात उचण्यात काहीच अर्थ नसल्याचे मंदारला उमगले.

खिश्यात हात टाकत मंदारने हजारची करकरीत नोट काढून आरीफला टेकवली.

“चल कमसेकम अपने खुदा के साथ तो वफा रख..” मंदारने आरीफच्या खिश्यातून फोन बाहेर काढत स्वतःला फोन लावला.

“जरूरत पडी तो याद करूंगा.. पैसा और मिलते जायेगा..” मंदारनं त्याला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला. नाहीतरी सध्या त्याला आरीफशिवाय इतर कुठून माहीती मिळेल असे वाटत नव्हते.

“सलाम साहब...” आरीफने त्याचा प्रस्ताव हसतहसत स्वीकारला.

तासाभरात मंदारने आरीफकडून संबंधित माणसांची थोडीफार माहीती काढून तो ढाबा सोडला. आरीफला त्यांचा उद्देश माहीत नसला तरी पैश्याच्या आमिषामुळे त्याने शोध घेण्याचे आश्वासन मंदारला दिले.

-----------------------------------------------------

**दुसऱ्या दिवशी सकाळी....**

शहराच्या मध्यवर्ती भागातल्या झोपडपट्टीत सकाळच्या कामांना वेग आला होता. कुणाची कचरा वेचण्यास निघण्याची घाई तर कुठे पाण्यासाठी भागदौड

सुरू होती. तिथेच एका पत्र्याच्या झोपडीवजा घरात मात्र अजून शांतता होती. कालचा दिवस समाधानकारक गेल्याने आरीफ नऊ वाजले तरी गाढ झोपेत होता.

घराची ऊंची जेमतेम माणूसभर असावी. दोन माणसं आगपेटीत कोंबल्यासारखी राहू शकतील अशी एकूण त्या झोपड्याची परीस्थिती होती. मोबाईलच्या रिंगच्या कर्कश आवाजाने जसे ती शांतता भंग केली तसा आरीफ वैतागत आळोखेपिळोखे देत उठला.

'मनू' चा कॉल पाहताच त्याने आळस झटकत फोन उचलला.

"हॅलो.. बोल मनू..."

....................

"क्या... कब..."

....................

"किसने किया......."

...........................

पलीकडून मिळालेली माहीती ऐकून आरीफची झोप कुठल्याकुठे पळून गेली. झटकन उठून त्याने सर्वप्रथम कोपऱ्यातला छोटासा टिव्ही चालू केला. टीव्हीच्या बटनांवर धडाधड बोटे फिरवत तो न्यूज चॅनल शोधत होता. शेवटी समोर

हवी ती बातमी दिसताच तो थांबला. बातमी खरंच त्याच्यासाठी धक्कादायक अशीच होती.

‘मौसमचा कुणीतरी अज्ञात इसमाने पाठीत सुरा घुपसून खुन केल्याची...’

फोन अजून चालूच होता..

“मनू..... मैं मिलने आता....” आरीफच्या आवाजात रडवेलेपणाचे भाव उतरले होते.

पलीकडून काहीतरी सांगितले गेले तसे काहीसा सावरण्याचा प्रयत्न आरीफने केला..

“ठिक.. मैं देखता है... तू खयाल रख” आरीफने कॉल कट करत फोन बाजूला ठेवला.

अंगात शर्ट चढवत तो न्यूज बारकाईने पाहत होता. इतक्यात त्याचा फोन पुन्हा एकदा खणाणला. फोन हातात घेत त्याने आलेला मॅसेज पाहीला.

मॅसेज उघडताच जणू शॉक लागल्यासारखा आरीफ स्तब्धपणे पाहतच राहीला.

‘मंदार.... होय त्या मॅसेजमध्ये मंदारचा तोच फोटो होता जो मौसमने चलाखीने काढला होता. फोटोवरून साफ दिसून येत होते की मौसम काल रात्री

मंदारसोबतच होती. पण मंदारने का करावं असं.. तो तर या शहरात पहील्यांदाच आला होता. डिग्री आणि मदनला यामागचं नक्की गौडबंगाल काय आहे हे माहीतचं असणार...’ आरीफच्या डोक्यात फोटो पाहिल्यावर विचारचक्र सुरू झाले.

भानावर येत त्याने मनूला फोन लावला. पहील्याच रिंगमध्ये पलीकडून फोन उचलला गेला..

“मनू.... मैं जानता इसको....” आरीफ महत्वाचं सांगत असल्यासारखं घाईतच म्हणाला.

पलीकडून बहुधा मनू नावाच्या व्यक्तीने भेटण्यासंदर्भात विचारले असावे, त्यावर आरीफ म्हणाला..

“नहीं... वो खुद मुझे फोन करेगा.. हमे पहले उसको जानना होगा. इस शहर में वो नया है और मुझे लगता की उसे कुछ पता करना होगा तो वो मुझे जरूर कॉन्टॅक्ट करेगा....”

..........................

“उसका फोन आते ही मैं तुझे खबर करूँगा..” आरीफने मनूला आश्वासन दिले आणि कॉल कट केला.

**इकडे मंदारने जवळच पुढे एक स्वस्तातला लॉज पाहून आपला मुक्काम तिकडे हलवला होता. मनात असूनही मंदार आरीफला मारू शकत नव्हता कारण आता तोच एक असा व्यक्ती होता.. ज्याला मंदार या अनोळखी शहरात ओळखत होता.. म्हणून आरीफला स्वतःच्या बाजूने वळवून त्याचा काही प्रमाणात तरी उपयोग करून घेणे मंदारसाठी आवश्यक होते..**

**सध्या आरीफच अशी व्यक्ती होता, जिच्या आधारे मंदार सुतावरून स्वर्ग गाठू शकत होता..**

---

तिकडे लॉजवर परीस्थिती गंभीर होती. पोलीस एकेकाची कसून तपासणी करत होते. मदन, डिग्री, चंदू आणि नसीर चौघेही तिथेच होते. मौसमचा खुन

मंदारनेच केला असून आपण तिला वाचवण्यासाठी सर्वात पुढे असल्याचं पोलिसांना पटवून देण्यात ते जवळपास यशस्वी ठरले होते.

मौसमचा खुन झालेला ती रूम सील करण्यात होती. बाहेर पोलीस सर्वांची उलटतपासणी करत होते.

“दरवाजा बाहेरून कोणी तोडला...?” इन्स्पेक्टरने सर्वांवर नजर फिरवत गंभीरपणे विचारले.

“साहेब.. मी रात्री ड्यूटीवर असतो. (बाजूला दोघांकडे पाहत) आम्ही दरवाजा खूपवेळा वाजवला आणि शेवटी नाईलाजाने तोडला.” एक पस्तीशीचा माणूस म्हणाला.

“मग तुम्ही अगोदरच रूमच्या आतमध्ये काय करत होता...?” डिग्री आणि इतर तिघांकडे वळत इन्स्पेक्टरने विचारले.

“तेच तर सांगतोय साहेब आम्ही... आम्हाला कुणाच्यातरी ओरडण्याचा आवाज आला आणि धावत इथं येऊन पोहोचलो... आम्ही दरवाज्यावर आलो तर तो उघडा होता...” मदन शिताफीने इन्स्पेक्टरच्या डोळयात पाहत खोट्याचं खरं करू पाहत होता.

“हो.. आणि आम्ही आत आलो आणि पाहतो तर त्या माणसाने मौसमचा खून केला होता...” नसीरने पुढे पुष्टी जोडली.

“आणि आम्ही ते पाहीलं म्हणून त्या माणसाने साक्षीदार संपवण्यासाठी दरवाजा बंद केला आणि आम्हाला मारण्याचा प्रयत्न करत होता....” नसीरचे बोलून होताच डिग्रीनेही आपल्यापरीने नाट्य कथन केले.

“नशीब बाहेरून वेळेवर मदत आली नाहीतर आम्हीही जिवंत राहीलो नसतो..” चंदूने आणखी त्यात भर घातली.

“तुम्ही सांगताय त्यात तथ्य असू शकतं.. पण तरीही मला ही गोष्ट पटणं अवघड आहे की तुम्ही चौघे आणि तो एकटा तरीही तो तुमच्यावर भारी पडावा...” इन्स्पेक्टर संदेह व्यक्त करत बोलत होता.

“खरंच साहेब, तो प्रोफेशनल किलरच असावा.. आम्ही चौघे असून त्याला रोखू शकलो नाही.. आमच्या देखत खून करून तो खिडकीतून पळाला..” डिग्री गोष्ट अधिक उलगडून सांगत होता.

“आणि साहेब, ज्या स्पीडने तो दुसऱ्या मजल्याच्या खिडकीतून खाली पोहचला.. हे काम एखादा सराईत गुन्हेगारच करू शकतो, नाही का..?” मदनने इन्स्पेक्टरला विश्वासपूर्ण वाक्यात स्पष्ट केले.

“ठिक आहे, सध्या तुम्ही चौघे पोलीस स्टेशनला चला. त्या माणसाचे वर्णन, फोटो, माहीती काही असल्यास नोंदवून घरी जा. आणि हो केस संपेपर्यंत तुम्ही शहर सोडून कुठेही जाऊ शकत नाही..” इन्स्पेक्टर काहीसा कठोर आवाजात म्हणाला.

"त्याचा फोटो....." चंदूने तोंड उघडलेच होते की डिग्रीने डोळे वटारत त्याला गप्प केले.

पुढे निघालेला इन्स्पेक्टर चंदूच्या त्या अर्धवट शब्दांवर मागे फिरला तसं डिग्री सावरत म्हणाला, "साहेब, त्याचा फोटो कसा ना आमच्याकडे असेल... (चंदूकडे रागाने पाहत) आम्ही तर त्याला ओळखतही नव्हतो..."

"ओह् आय सी.... पण मी फोटो सोबत वर्णनही म्हणालो... ते तर तुम्ही देऊ शकता ना...? की आत टाकून तुम्हालाच खुनी म्हणून सिद्ध करू...." करड्या स्वरात इन्स्पेक्टर बोलून पुढे गेला.

मागोमाग ते चौघे आणि इतर तीन कॉन्स्टेबलही पोलीस स्टेशनला रवाना झाले.

------------------------------------------------------

मंदारला कोल्हापूरहून इथे आणण्याचा प्लॅन एकाचा. त्यात त्याने लोकल भाईला समाविष्ट करून घेणे. मंदार आणि तृतीयपंथीय मौसमची भेट, मौसमचा खुन होणं, तेव्हा खुनाचं हत्यार डिग्री अथवा नसीर किंवा चंदूच्या हातात असणं.. मग नेमकं तिला मारलं कोणी...?

मंदारची त्या लोकल भाईच्या गुंडांशी हातापाई होणं, मंदारचं तिथून पळून जाणं... पण मंदार का बरं पळाला असावा तिथून..?

त्यात मंदार लपून लॉजवरच्या हालचाली पाहताना तिथं आलेली कार.. त्या कारचा आणि तिच्यात असलेल्या व्यक्तीचा या प्रकरणाशी काही संबंध असावा का..?

तिथून निसटल्यावर ढाब्यावर आरीफचं इतक्या सहजासहजी भेटणं हा निव्वळ योगायोग समजावा की हा देखील प्लॅनचा एखादा हिस्सा असावा...?

---------------------------------------------------

कल्याण-नाशिक हाईवेच्या आतल्या बाजूचा पाईपलाईन रोड तसा भरदिवसाही निर्जन असायचा. चुकून कधी बाहेर ट्रॅफिक लागलीच तरच या रस्त्याचा वापर व्हायचा, नाहीतर नेहमी सामसूमच.

मंदार पाईपलाईन रोडच्या मध्यभागी असलेल्या कठड्यावर शांतपणे बसून होता. सूर्यनारायण त्याच्यावर क्रोधित झाल्याप्रमाणे आपलं शक्तीप्रदर्शन करत होते. आजूबाजूला कुठे झाडाझुडपांचं नावही नव्हतं. ऊन्हाच्या झळांनी मंदार अक्षरशः त्रस्त होऊ लागला होता. पण तो तिथून उठून कुठं जाऊही शकत नव्हता.

कारण तीच तर जागा होती जिथं आरीफने त्याला काहीतरी महत्वाचं सांगण्यासाठी बोलावलं होतं. मंदारने दोन्हीबाजूंच्या दोन टोकांना पाहीले. अजूनतरी कुठुनही आरीफच्या येण्याच्या खुणा दिसत नव्हत्या.

अर्धा तास वाट पाहील्यानंतर मंदार वैतागून आरीफला फोन करणारंच होता की त्याला उजव्या बाजूने एक बाईकस्वार येताना दिसला. लांबून काळ्या रंगाचे जॅकेट खाली चकचकीत काळी ट्राऊझर आणि डोक्यात काळे हेल्मेट या अवतारात कुणाची ओळख पटवणे अवघडचं. मंदार त्याला निरखून पाहत जागेवर उठून उभा राहिला. साधारण पन्नास मिटरवरून ती बाईक झपाझप अंतर कापत त्याच्याजवळ येतंच होती..

इतक्यात हातातला फोन वाजला म्हणून मंदारचं लक्ष विचलित झालं. त्यानं फोन पाहीला.. आरीफ कॉल करत होता..

“किधर है तू....”

“ये क्या भाई सामने से आ रहा है मैं...”

मंदारने डावीकडे पाहीले..

**‘आरीफ समोरून येत आहे...’**

**‘पण पायीच..’**

**‘आणि मग उजवीकडला तो बाईकस्व.....रऽर..’**

मंदार विचारचं करत राहीला... आणि मागे फिरून पाहेपर्यंत...

‘सट्ऽटाक्क.....’ त्याच्या डोक्यात कसलातरी मजबूत प्रहार पडला..

त्या बाईकस्वाराने आपला डाव साधला होता... आरीफही जवळ पोहचला होता.. मंदार आरीफकडे अविश्वासाने पाहत होता... त्याचे डोळे शरीराने ताबा सोडल्यासारखे बंद होऊ पाहत होते. पण मंदारची हिम्मत त्यांना बंद होऊ देत नव्हती.. पंधरा सेकंद थोडीफार धडपड केल्यानंतर मंदार खाली कोसळला...

खाली पडल्यावरही डोळे अर्धवट बंद-उघड स्थितीत तो त्या व्यक्तीला पाहण्यासाठी आसूसला होता... कोण होता तो इसम.. ती व्यक्ती.. एक नक्की की आरीफ त्याला सामील होता.. अगदी साळसूदपणे त्या दोघांनी मंदारला जाळयात

ओढले होते.. अवघ्या एक-दोन क्षणांचा अवधीही मंदारला सावरायला मिळाला नव्हता..

मंदारच्या नेत्रवलयासमोर त्या इसमानं अलगद आपला हेल्मेट काढला... मंदारनं पुसटसं त्या व्यक्तीला पाहीलं... तत्क्षणी अकस्मात् आश्चर्यछटा त्याच्या चेहऱ्यावर येऊ पाहत होती पण त्याआधीच शरीरावरचं त्याचं नियंत्रण सुटलं.. आणि मंदारने डोळे मिटले...

घडलेल्या एकेक घटना निस्तरण्याऐवजी त्यात आणखी नवनव्या प्रसंगांची भर पडत चालली होती. मंदारला अजूनही काहीच माहीती मिळाली नव्हती. उलट मौसमच्या खुनाचा आरोप मात्र त्याच्या माथी पडला होता. पोलीस त्याचं वर्णन केलेलं स्केच घेऊन तपास करत होते..

आरीफ सोबत आल्यापासून मंदारची अंधुक अशी आशा जागृत झाली, पण आजच्या प्रकारानं ती ही फोल ठरली होती. नेमकं कश्याचा शोध घ्यावा मंदारने आणि कोणाच्या मागे जावे..

**डिग्री... मदन.. नसीर... चंदू... पण आता त्यांच्याही पुढे जाऊन लेच्यापेच्या दिसणारा आरीफ जास्त मोठा गुन्हेगार वाटत होता.. आणि तो इसम.. जो आरीफसोबत होता.. त्याचा काय उद्देश असावा.. की हाच तो मास्टरमाईंड.. का आणखी कुणी नवा**

**दुश्मन मंदारचं नुकसान करू पाहत होता...? आणि त्याला पाहून बेशुद्ध पडतानाही मंदारनं आश्चर्य का व्यक्त करावं... मंदार त्याला ओळखत होता...? की आणखी काही कारण असावं..?**

वरील सर्व प्रश्नांची उत्तरे घेऊन लवकरच भेटूया पुढील भागात..

# डॉमिनंट भाग चार

शहराच्या एका बाजूला असलेल्या खडकपाड्यासारख्या पॉश ठिकाणी नव्यानेच बांधलेल्या मनोरा टॉवरमधल्या एका फ्लॅटमध्ये भरदिवसा काळोखी पसरली होती. तसा तो फ्लॅट सातव्या मजल्यावर असून बिल्डिंगच्या आसपास मोकळेच होते, त्यामुळे प्रकाश आणि हवा येण्यासही चांगलाच वाव होता. परंतु तरीही त्या फ्लॅटच्या सर्व काचाखिडक्या बंद अवस्थेत होत्या. फ्लॅट तसा बऱ्यापैकी ऐसपैस होता. हॉलची सजावट आणि सामानही जेमतेमच होते.

मेन डोअरला लागून असलेल्या भिंतीवर टांगलेल्या अडतीस ईंची एल् सी डी वर मौसमच्या खुनाची इत्यंभूत माहीती मीठमसाल्यासह विश्लेषित करून दाखवली जात होती.

काही वेळा अगोदर टेबलवर ठेवलेले गरमगरम ब्रेडटोस्ट आता थोडेसे थंड पडू लागले होते. मस्तकावर प्रचंड ताण पडल्यासारखा तो न्यूज चॅनलवर नजर रोकून होता. दिसायला बऱ्यापैकी स्मार्ट आणि आकर्षक देहयष्टी होती त्याची. पुढ्यात पडलेला फोन उचलत त्याने भाईला कॉल केला.

“व्हाट् द हेल इज गोईंग ऑन... ये क्या दिखा रहे है न्यूजपर...” चवताळतच त्याने सुरूवात केली.

************ पलीकडून भाई बोलत होता.

“छोटीसी मिस्टेक... तू समज भी रहा है... खून हुवा है यु नॉनसेन्स.... ये कोई छोटीमोठी बात नहीं है... और बकायदा मैंने बोला था.. खुनखराबा नहीं करना था.. पुरा प्लॅन मैंने बनाकर दिया था.. फिर भी क्यूं..?”

*********

“अब तू इस प्लॅन से अपने आदमियों के साथ बाहर हो जा.. मैंने दियी हुई खैरात से एक कोठा बनवा ले और उन चारों से वहा पर रोज मुजरा करवा ले...”

*********

“वैसे भी मुझे मंदार की बदनामी का इंतजार था.. जो की आज नहीं तो कल होनेहीवाली है.. अफसोस है की तुम जैसे निकम्मे लोगों की वजह से किसी बेगुनाह की जान चली गई... मुझे लगता है जल्द ही मंदार के सामने अब मुझे आना होगा.. “

समोरून काहीतरी उत्तरादाखल प्रतिक्रिया आली पण त्यात फारशी ऊत्सुकता न दाखवत याने भाईला कायमचा रामराम केला.. आणि मनात स्वतः नव्याने पुढच्या योजनांची आखणी करू लागला.

********************************

दुपारच्यावेळी बाहेरच्या व्हरांड्यात काळया पठाणीत सोफ्यावर रेलून बसलेला ‘भाई’ काहीसा चिंताग्रस्त दिसत होता. बाहेर ऊन असले तरी त्याला पत्र्याच्या सावलीचा आधार होता. त्याच्या भारदस्त शरीरावर त्याचं केस नसलेलं डोकं आणि चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांनी पडलेल्या सपशेल ठळक खुणा वातावरण अजूनच गंभीर करत होत्या. आसपास पूर्ण शांतता होती. ‘काही वेळ आसपास कुणी फिरकायचं नाही’ असा सज्जड दम भाईने आपल्या घरातल्या मंडळींना आणि त्याच्या चेल्यांना दिला होता.

नुकताच कुणाचातरी फोन येऊन गेला होता. कधी नव्हे ते काल भाईचे पंटर आपल्या कामात फेल झाले होते. प्लॅन यशस्वी होणं राहीलं बाजूला उलट पोलीस स्टेशनला जबानी देत त्याची चारही कर्तबगार माणसं अडकली होती. ते चौघे पोलिसांचा ससेमिरा कसा चुकवतील याची काळजी भाईला होतीच पण त्याहीपेक्षा महत्वाचं म्हणजे पैसे घेऊन काम झालं नाही याचं दुःख त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. बदल्यात ज्यानं पैसे दिले होते त्यानं आज फोनवर त्याला चांगलंच सुनावलं होतं. अख्ख्या हयातीत त्याच्याशी कुणी इतकं आवाज चढवून बोललं नसावं.. म्हणूनच भाईचं मन खायला उठलं होतं..

काही वेळातच डिग्री, नसीर, मदन आणि चंदू चौघेही तिथं आले. भाईने एक जळजळीत कटाक्ष त्यांच्यावर टाकला. त्याला पाहताच कुणालाही धडकी भरावी

असा काहीसा राक्षसी अवतार होता. दातओठ खात त्याने डिग्रीची कॉलर पकडत विचारले..

“कैसे हुआ ये सब... और क्यू.. भे***... उस मौसमकी बिरादरी में शामील हो गये क्या..” भाईच्या आवाजात जबरदस्त द्वेष होता.

“भाई, हलकीसी मिस्टेक हो गई... वो छि** उस हरामी के साथ सोने गई थी.. और हम उस बात से अंजान थे....” मदन म्हणाला.

“हा भाय.. वही वजह थी के हम मौसम को वहा देख कर हैराण रह गये और उस नाकारा शक्स को वहा से भागने का मौका मिल गया...” नसीरने मदनचीच ‘री’ ओढत सांगितले.

भाई थोडा शांत झाल्यासारखं दाखवत नसीरजवळ आला. नसीरचं शर्ट व्यवस्थित करत भाईने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

“अच्छा बेटा.. काम तुने नही किया और नाकारा वो शक्स...”

सुरूवातीला कंठातून निघालेल्या प्रेमळ आवाज रौद्र रूप घेऊ लागला..

“अरे तुम चार लोगों से नहीं संभल पाया वो अकेला.. नाकारा वो था या तुम चारों... और किस भो*** ने उस चमेली को मारा.. मैंने पहलेही कहा था इस काम में हमे किसीका खुन नहीं करना था... पार्टी की वैसी डिमांड थी... फिर भी.. फिर भी ऐसी कौन सी आफत आन पडी की उसका खुन हुआ..?”

भाईच्या शेवटच्या प्रश्नावर जणू काही सन्नाटा पसरला.. डिग्री, मदन, नसीर आणि चंदू चौघेही एकमेकांकडे पाहत होते.. या गोष्टीवर रात्रीपासून त्यांना क्लिक झालेच नव्हते.. चौघेही बुचकळयात पडाले होते की नेमका खुन केला कुणी...?

सगळयात पहीला मदनच मौसमवर दातओठ खाऊन धावून गेला होता. पण नंतर पाहिले तेव्हा मौसमच्या पाठीत घुसलेला सुरा इतर तिघांच्या हाताजवळ होता. मग नक्की कुणी मारलं मौसमला..? रात्रीपासून या प्रश्नावर कुणाचेच लक्ष गेले नव्हते. किंबहुना रात्रीपासून चौघांना एकत्र बसून त्या विषयावर बोलायची संधीच नव्हती भेटली. रात्री लॉजवर घडलेला अनपेक्षित प्रसंग, त्यानंतर पोलिसांचे आगमन, त्यांचे सवालजवाब, तिथून पोलिस स्टेशन, मग तिथली उलटतपासणी आणि मधल्या वेळातला पोलिसांसमोरचा फालतुचा टाईमपास यातच सगळा वेळ निघून गेला होता.

त्यांना निरुत्तर झालेलं पाहून भाईच्या तळपायाची आग अजूनच मस्तकात गेली..

“अरे.. कोई बकचौ* करके ये बतायेगा क्या... खुन किसने किया... कल को पुलिस बीच में आ गई तो बचाने तुम्हारा ये बाप ही आयेगा...”

“नहीं भाय.. खुन उसी हरामजादे ने किया और वो भाग गया...” इतकावेळ घाबरून शांत असलेल्या चंदूने तोंड उघडले.

त्यांची असली बालीश कारणं ऐकून खरंतर भाई चवताळला होता. पण त्यानं स्वतःला आवरलं आणि म्हणाला..

“तुम लोग जाओ अब कुछ दिन यहा से दुर.. किसीकी नजर में मत आना जब तक मैं ना बुलावूं.. इस काम को अंजाम अब मैं अपने तरीके से दुंगा..”

“पर भाय.. एक मौका तो...” डिग्री काही बोलतच होता की भाईने त्याचं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच तोडलं..

“मैंने कहा ना.. कुछ दिन इस मामले से दुर रहो.. और चारों साथ में रहना..” भाईने कठोर आदेश दिला. कितीही रागात असला तरी भाईला आपल्या माणसांची काळजी होती. शिवाय उद्या पोलीस त्यांच्यामार्फत भाईपर्यंतही पोहचू शकले असते.

भाईला आता अजून पद्धतशीर प्लॅन करून मंदारला जाळ्यात ओढायचं होतं. पण यावेळी ते अवघड जाणार होतं हे भाईसुद्धा ओळखुन होता. एकतर मंदार आता गाफील राहणार नव्हता. दुसरं म्हणजे आपल्या माणसांच्या हातावर तुरी देऊन निसटून जाणारा कुणी साधासुधा माणूस नसणार, याची खात्री भाईला पटली होती. पार्टीच्या नजरेत आपली झालेली गच्छंतीही त्याला निस्तरायची होती. म्हणूनच भाई स्वतः या प्रकरणात उतरणार होता.

*********************************

पाच वाजण्याच्या सुमारास ऊन थोडंसं उतरू लागलं होतं. भंडारी बावाच्या अड्ड्यावर ते चौघे आपसात खुसपुस करत होते. भंडारी बावाचं दारू पिण्यासाठीचं साधं हॉटेल होतं. डबल फायदा करून घेण्यासाठी बाहेरच त्याने चायनीज/इटालियन फास्ट फुडचं बस्तानही मांडलं होतं.

डिग्री, मदन, नसीर आणि चंदू एका टेबलवजा बाकड्यावर दारू पित बसले होते. मौसमच्या खुनावरून आता त्यांच्यात वाद सुरू होत होते.

“खुन आपल्यापैकीच कुणीतरी केलाय...” डिग्री गंभीरतेनं निष्कर्षापर्यंत पोहचल्याचं दाखवत म्हणाला.

“आणि तो मी तरी नाहीयं.. कारण तिच्याजवळ बेडवर तुम्हीच तिघे होतात..” मदनने आपली बाजू सेफ केली.

“अयं.... आम्ही तिला मारण्याचा विषय आलाच कुठून... आमची आन् तिची ओळख फक्त बेडपुरतीच असायची.. उलट तूच तिला पहिल्यापासून ओळखत होतास.. तिला या प्लॅन मध्ये तूच घुसवले होते..” चंदू आपल्यावर येणारे आरोप झटकून देण्याच्या पवित्र्यात होता.

“मदन, हम लोग के पास कोई वजह नहीं थी मौसम को मारने की.. मुझे तो अफसोस है वो अब इस दुनिया में नहीं है... साला उसके जैसी आयटम ढुंढना बडी मुश्किल बात है... मुझे अगर खुनी का पता चले तो मैं तो उसका बदला जरूर ले

लुंगा... मदन सबसे पहले तू उसकी तरफ घुस्से में भागा था.. कही तूने तो..” नसीरने आपला रोष व्यक्त करू पाहीला.

“कमीने....” मदनचे हात चवताळून नसीरच्या मानगुटीवर पोहोचले.

“रूक... थांब मदन...” डिग्रीने मदन मागे खेचले आणि सर्वांना उद्देशून बोलू लागला.

“फिलहाल तो हम यही मानकर चलते है की उस मंदारने मौसम का खुन किया.. पहले उसे सबक सिखायेंगे बाद में सच्चाई का भी पता कर लेंगे.. आता सगळयात आधी आपल्याला भायला खुश केले पाहीजे. चुक आपल्याकडून झालीय.. निस्तरायचीपण आपणच..”

**डिग्रीने ढासळत चाललेली त्यांची युनिटी पुन्हा मजबूत केली. सर्व एकमताने त्याला होकारले. पुढच्या अर्ध्या तासांत मंदारला जाळयात पकडण्यासाठी यावर चर्चा झाली. आणि भंडारी बावाच्या अड्ड्यावरून ते चौघे मंदारला पकडण्याच्या निर्धारानेच बाहेर निघाले.**

**********************************

कित्येक दिवसांनंतर अनुभवलेल्या काहीश्या आळसट अनुभूतीतून जागं झाल्याप्रमाणे मंदारने हळूहळू पापण्यांची उघडझाप केली.. काहीसं भानावर येत असताना शरीरातली मरगळ झटकून देण्यासाठी त्यानं हातपाय पसरवायला केले तर त्याला तिथल्या बंदीपाशाची जाणीव झाली.. खडबडून त्यानं बांधलेल्या पायांकडे पाहीले.. खुर्चीवर बसलेल्या अवस्थेत त्याचे हात मागच्या बाजूला करकचून बांधले होते. प्रथम तर जोर लावून त्यानं हातपाय सोडवण्याचा निष्फळ प्रयत्नही करून पाहीला.. पण ताकदीनं काम होण्यासारखं दिसत नव्हते, म्हणूनच तेव्हा त्यानं हाताचा पंजा आणि मनगट यांमध्ये हालचाल करण्यास सुरूवात केली.

आसपास नजर फिरवत त्यानं सभोवतालच्या परीस्थितीचा अंदाज घेतला. सध्यातरी तिथं तो एकटाच बांधलेल्या अवस्थेत होता. काहीसं जुनाट असं दिसणारं ते घर होतं. वर नजर करून पाहताच कळपटलेल्या कौलांचं छप्पर, भिंतींवर ठिकठिकाणी जमा झालेली जळमटं.. असं वाटतं होतं की क्वचितच त्या घरात कुणी राहत असावं. एका बाजूला पाण्याचं मडकं दिसत होतं. बाकी विशेष असं काही सामान त्या घरात नव्हतं.

मंदारनं हातांची हळूहळू हालचाल करत शर्टच्या बाह्यांमधल्या खाचेत लपवलेले छोटेसे ‘कटर’ बाहेर काढले. मागे हात बांधलेल्या स्थितीत त्याने कसेबसे ते कटर डाव्या हाताच्या बोटांपर्यंत पोहोचवले. तिथून पुढचे काम फारसे अवघड नव्हते.. पण तितक्यात समोरचा दरवाजा उघडून आरीफ आला..

आरीफला पाहताच मंदारला बेशुद्ध होण्यापूर्वीचा प्रसंग आठवला.. आणि तो खुनशी नजरेनं आरीफकडे पाहू लागला..

मंदार काही बोलायला जाणार तोच आरीफने प्रश्नांची सरबत्ती घेऊन सुरूवात केली.

“तु कुछ बोलेगा उस्से पहीले मेरे सवालो के जवाब दे... वही तेरे लिये अच्छा होगा..”

‘ह्या मरतुकड्याला एका फटक्यात खाली लोळवावं..’ हा विचार क्षणभर मंदारच्या मनात आला पण त्यानं जरा दमानं घ्यायचं ठरवलं. अजून आरीफच्या दुसऱ्या साथीदाराविषयी जाणणंही महत्वाचं होतं.

“कुछ तो वजह है जो तुझे यहा मैंने पकड के रखा है... तू उसके ऊपरसे परदा हटा दे.. मै तुझे सहीसलामत यहा से निकालुंगा.. इतना ही नहीं मै तुझे डिग्री और उसके दोस्तों का पता भी दुंगा..” आरीफ मिश्किल हसत मंदारला आमिष दाखवत होता.

“हाहाहा... तुझ जैसा मच्छर क्या मुझे यहा पकड के लायेगा..” मंदार खिदळत हसत बोलू लागला.. “मै चाहु तो अभी यहा से निकल सकता हुं.. रही बात डिग्री की तो उन सबका पता मैं खुद धुंड सकता हुं.. और तुझपर एकबार भरोसा करके देख चुका हुं मैं..”

“साले तुझे तो...” आरीफ त्वेषाने मंदारवर धावून गेला पण शेवटच्या क्षणाला त्याने स्वतःला आवरले.

“तेरे साथ और जो कोई भी है उसको पहले सामने आने बोल दे..” मंदार शांतपणे म्हणाला.

मंदारचे शब्द ऐकताच आरीफ थोडा चाचपडला. पण मंदार बांधलेल्या अवस्थेत असल्याने काहीच धोका नव्हता.. आरीफ बाहेर निघून गेला आणि दोन मिनिटाच्या अवधीतच मनूसोबत परत आला..

पायातले ब्लॅक लेदर शुज, ली कूपरची फिटींग जीन्स आणि डार्किश मरून रंगाचा तिचा शर्ट सर्वच तिच्या काहीश्या सुडौल पण कमनीय देहावर परफेक्ट मॅच करत होते. स्वच्छ धुतलेल्या तांदळासारखी तिची कांती आकर्षित करण्यासारखी अशी होती. केस बॉयकट किंवा त्याहुन थोडेसेच लांब आणि चेहऱ्यावर विलक्षण आत्मविश्वास झळाळत होता. साधारण तेविशिची असावी.. स्त्रीया वय लपवण्यात माहीर असतात.. म्हणून पक्कं सांगता येत नव्हतं पण पंचविशीच्या आतली नक्कीच असावी..

मंदारनं ओळखले ही तीच होती जिने त्याच्यावर मागून प्रहार केला होता. बेशुद्ध होतानाची त्याच्या चेहऱ्यावरली ती आश्चर्याची छटा तिचं रूप आणि कर्म यांतील विसंगती पाहुनच आले होते. तरी तिच्यातल्या आत्मविश्वासाने तो प्रभावित झाला होता.

“ओह.. के.. म्हणजे मागून वार करण्यात तुझेच योगदान होते, नाही का...” मंदार मनूच्या हातातला सुरा निरखून पाहत म्हणाला.

“हो... निर्दयी.. खुनी माणसा...” मनू तावातावाने त्याच्याजवळ पोहचतच होती की आरीफने तिला अडवले.

“का मारलसं तु मौसमला.. तिने काय वाकडं केलेलं तुझं..” मनू हातातला सुरा त्याच्यापुढं नाचवत बोलू लागली. तोपर्यंत आरीफनेसुद्धा मागे पडलेला लोखंडी रॉड हातात घेतलाच होता. त्याला माहीत होते मंदार सहजासहजी काही सांगणार नाही..

“वेट वेट... शांत रहा जरा... तुम्ही दोघेपण.. तुम्हाला असं का वाटतयं की मी मौसमला मारेन..” मंदार मुळीच घाबरला नव्हता पण सद्यपरिस्थितीत तसं चेहऱ्यावर दाखवणं गरजेचं होतं.

“ये देख भ**.. तेरी करतूद सारे अखबार और टीव्ही चॅनेल चिल्ला चिल्लाकर उछाल रहे है...” आरीफने भडकून दोन-चार वर्तमानपत्रे त्याच्यासमोर फेकली.

मंदारने पहील्यांदा तर तिकडे दुर्लक्ष केले कारण सध्या त्याला आरीफ आणि मनूवर आपले सर्व लक्ष केंद्रित करायचे होते.

मनूला राहवत नव्हते.. तिचे हात शिवशिवत होते मंदारवर वार करण्यासाठी... मंदारला थोडीफार तरी इजा करावीच याउद्देशाने ती पुढे सरसावलीच. तोच परिस्थितीचं गांभीर्य ओळखत मंदारनं मागे बांधलेल्या हातांना हिसका देत सुटका करून घेतली. मनूला पुढ्यात ओढत त्याने डाव्या हाताच्या बकोटीत घेतलं आणि उजवा हातातलं कटर तिच्या मानेला लावलं..

“अहं.. भाईजान... एक इंचपण सरकलास तर समजून जा...” मंदार हल्ला करण्यास येणाऱ्या आरीफला उद्देशून म्हणाला.

मनू सुटकेसाठी झटपट करू लागली.. मंदारला हिसके देऊ लागली.

“जानेमन.. मगरीच्या जबड्यातून कुणी निसटू शकतं का कधी.. या मंदारची पकड मगरीसारखीच आहे मग कश्याला उगाचच त्रास करून घेतेयंस..”

“तू एकदा सोडून तर बघ मला.. नालायका.. दिदीचा बदला तर मी घेऊनच दम खाईन..” मनू आपली सर्व शक्ती पणाला लावून सुटण्याचा प्रयत्न करत होती. पण मंदारनं म्हटल्याप्रमाणे त्याची पकड खरोखरच मजबूत होती. ती सोडवण्यासाठी त्याच्याच तोलामोलाच्या माणसाची गरज होती.

मंदारचे सुटलेले हात पाहून आरीफचे तर अवसानच गळाले. आरीफला दरवाज्यावर जायला सांगून मंदारने एका हाताने पायाला बांधलेले दोरही सोडवले. खाली पडलेला सुरा घेऊन तो मनूसोबत दरवाजाजवळ आला. आरीफला त्याने पुन्हा

आतमधल्या एका कोपऱ्यात जायला सांगितले. त्याच्यापाठोपाठ मनूलाही तिकडे ढकलत त्याने दुसऱ्या हाताने तिथला लोखंडी रॉड उचलला.

“अजिबात चलाखी नकोय मित्रांनो.... अजूनतरी मी कुणाचा खुन केलेला नाही पण यानंतर तसं करायला मागेपुढे पाहणार नाही..” मंदारने धमकीवजा ताकीद दिली.

पण आरीफ आणि मनूचा त्याच्यावर विश्वास नव्हताच. त्यांच्या चेहऱ्यावरून अजूनही मंदारबद्दलची चीड कायम होती. मंदारने सुरूवातीपासून सगळे काही त्यांना विश्लेषण करून सांगितले. घटीत घटनांवरून साफ जाहीर होत होते की मंदार आणि मौसम पहील्यांदाच भेटले होते. मंदारकडे मौसमला मारण्याचे खास असे काही कारणच नव्हते..

“सध्या तुम्ही दोघं माझ्या ताब्यात आहात.. पारडं माझं जड आहे.. त्यामुळे माझ्या खोटं बोलण्याचा प्रश्नच उरत नाही. मी मौसमला मारलं असतं तर तसं मी इथे बोलू शकतो बदल्यात तुम्ही माझं काही वाकडं करू शकत नाही. तुम्हाला मारणं माझ्यासाठी अवघड नाही.. पण मुळात मी खुनी नसल्यामुळे मी तसं करू शकत नाही...” मंदारने मनूच्या डोळयात रोखून पाहत म्हटले.

मनू अजूनही काहीशी विचलित होती पण आरीफच्या मनातल्या शंका दूर झाल्यासारखे त्याच्या चेहऱ्यावरून वाटत होते. मंदारने आरीफ आणि मनूचा अंदाज घेत त्यांच्यावर शेवटची इमोशनल चाल खेळली..

“मला फसवण्याचे कारण आणि त्या माणसांचा छडा लावल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही... तुम्ही दोघे तुमच्या मार्गाने जाण्यास मोकळे आहात..”

“पण आता तुझ्यासमोर धोका अजूनच वाढलाय त्याचं काय...?” मंदारसमोर खाली पडलेली वर्तमानपत्रे सरकवत मनू म्हणाली.

“हा.. मियाँ.. अब तो उन लोगो के साथसाथ पुलिसभी तुम्हारे पीछे पडेगी..” आरीफने पुढे पुष्टी जोडली.

मंदार एक वर्तमानपत्र उचलून चाळू लागला. फ्रंट पेजवरच्या त्या बातमीनं तो अक्षरशः चवताळला..

मौसमच्या खुनाचा आरोप अज्ञात इसमावर होता, ज्याचं वर्णन आणि रेखाचित्र मंदारशी तंतोतंत जुळत होतं. हा पण जमेची बाजू अशी होती की मंदारचा फोटो अथवा नाव त्यात छापलं नव्हतं. मंदारने बातमी वाचून ओळखले की त्या लोकांनी आपल्याशी असलेला संबंध लपवला होता. म्हणूनच त्याचे नाव आणि फोटो त्यांच्याकडे असूनही त्यांनी पोलिसांना सांगितले नसावे.

“बुलशिट... हरामखोर मनाला येईल ते काहीपण लिहीतात..” रागाच्या भरात मंदार बोलू लागला. एव्हाना मंदारने पुढचा प्लॅन डोक्यात रेडी केलाच होता.. मंदारला कसंही करून आरीफची मदत हवीच होती तेही त्याच्या नकळत करून घ्यायची होती. आणि भर म्हणून की काय मनूही साथीला आली होती.

मंदारने मनूकडे पाहीले.. तिच्या डोळयांच्या कडा ओलसर झाल्या होत्या. अचानक काहीतरी आठवल्यासारखे जाणवून मंदारने मनूला विचारले,

“पण तुमच्या दोघांचा मौसमशी काय संबंध..? तुम्ही एवढी जोखीम घेऊन मला इथे का आणलं..?”

मनूने एक कटाक्ष मंदारवर टाकला आणि मौसमबद्दल सांगू लागली.

मौसमच मनूचा जगण्याचा आधार होती. अठराविश्व दारिद्र्य आणि कर्जाच्या बोझ्याखाली दबलेला तिचा बाप जगण्याची सारी आशा सोडून बसला होता. मनू तेव्हा दहा-बारा वर्षांची असेल. आई मनू लहान असतानाच देवाघरी गेली होती. बाप आणि मनू आला दिवस कसाबसा ढकलत होते. आपल्यानंतर पोरीचे हाल कसे होतील हे विचार मनूच्या बापाला आत्महत्या करून देत नव्हते. पण त्याला हेही कळून चुकले होते की कसंही करून जगण्यासाठी अनुकूल वातावरण तो निर्माण करू शकत नव्हता.

एका रात्री ‘आपल्याला बाहेर जायचे आहे’ असे सांगून तो मनूला घेऊन रेल्वेपटरीवर आला. चालताना मनूने विचारलेल्या प्रश्नांकडे साफ दुर्लक्ष करीत तो तिचा हात घट्ट पकडून चालत होता. मनूच्या लहान वयातल्या मनात तो अंधार आणि रेल्वेपटरी पाहून चलबिचल होत होती. तरीही ती ‘आपण कुठं जातोय..? कश्यासाठी..?’ हे सारखेच विचारत होती.

मागून ट्रेनचा हाॅर्न ऐकू आला.. झपझप झपझप ट्रेन मागून काळाप्रमाणे त्यांच्यावर झडप घालण्यास येत होती. मनूने मागे पाहत ओरडायला सुरूवात केली.. बापाला तिथून हटण्यास सांगताना तिला अक्षरशः रडू कोसळत होते.. बापाला हटवण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी ती जोर लावत होती. शेवटी शेवटी स्वतःचा हात सोडवण्याची तीची धडपडही केविलवाणी होती.. मागून ट्रेनने अजून एक जोराचा हॉर्न दिला तसे मनू पिसाळल्यासारखे मोठ्याने ओरडू लागली.. पण एवढ्या वेळात तिचा बाप ढिम्म् म्हणूनही तिथून बाजूला झाला नाही. जणू मरणाला कवटाळण्याचा निर्धार करूनच तो तिथं आला होता.

ट्रेन खुपच जवळ आली तसे पटरीपासून काही अंतरावर असलेल्या झाडीतून दोन तृतीयपंथीय त्यांच्या दिशेने झेपावले. मनूची आर्त हाक त्यांना ऐकू आली होती. त्यांच्यापैकी एक जवळपास मनूच्याच वयाचा होता. तर दुसरा त्याच्यापेक्षा थोडा मोठा होता. त्यादोघांच्या अनपेक्षितपणे अंगावर येण्याने मनूचा बाप बावचळला आणि त्याची मनूवरची पकड सैल पडली. समोर आलेली ट्रेन पाहत त्या दोन तृतीयपंथीयांपैकी जो लहान होता त्याने प्रसंगावधान दाखवून मनूसोबत बाजूला उडी मारली. मागे फिरून डोळयांचं पात लवतं न लवतं तोच काळाच्या रूपानं आलेली ट्रेन मनूच्या बापाला घेऊन सुसाट पुढं गेली. दुसरा तृतीयपंथीदेखील त्याच्यासोबत फरफटला गेला.

मौसम तेव्हा पंधरा-सोळा वर्षांचीच होती. तिनंच मनूला वाचवलं होतं. मनूच्या बापासोबत मौसमची गुरू तिची सर्वेसर्वा आपले प्राण गमावून बसली.

तिथपासून मौसमने मनूचा सांभाळ आपल्या लहान बहीणीप्रमाणे केला. तिचं शिक्षण, खर्च कश्यात काही कमी पडू दिली नाही. तसंच तिनं नाजूक मनूला या दुनियेत निडर राहून कसं जगावं हे शिकवलं. फक्त मनूसाठी मौसमने कोणताही पंथ वगैर न स्विकारता पैश्यासाठी आपल्या शरीराचे भांडवल केले होते. आणि मौसम जरी तृतीयपंथी असली तरी मनूला तिच्याबद्दल विलक्षण आदर आणि प्रेम वाटायचे. मौसमने आपल्यासाठी केलेल्या त्यागाची तिला जाणीव होती.

आणि म्हणूनच आज तिचं असं एकाएकी या जगातून जाणं मनूला असह्य होत होतं. आरीफसुद्धा दुनियेसाठी लफंगा असला तरी तो पूर्वीपासून मौसमची छोटीमोठी कामं करायचा. त्यामुळे त्याचं बऱ्याचदा त्यांच्या घरी येणंजाणं असायचं.

हे सगळं सांगताना मनू काहीशी भावूक झाली होती. मंदार तिला सावरायला पुढे सरसावणार होता की मनूने तिच्या स्मार्टफोन मधला फोटो मंदारला दाखवला.

मंदार स्वतःचा फोटो पाहून अचंबित झाला.. हा त्या लॉजच्या रूममधलाच फोटो होता. मौसमने शिताफीने तो फोटो काढून मनूला पाठवला होता. रात्रीचं जर कधी बाहेर थांबणं झालेच तर खबरदारी म्हणून मौसम नेहमीच तिच्यासोबतच्या व्यक्तीचा फोटो मनूला पाठवायची.

“अच्छा.. म्हणजे यामुळेच तुम्ही मला गुन्हेगार समजताय तर...” पुढे येऊन मनूला आश्वस्त करत मंदार बोलू लागला.. “त्या रात्री आम्ही एकाच रूममध्ये जरूर

होतो पण मला फक्त तिच्याकडून त्या चौघांची माहीती हवी होती. पण ते माहीत करून घेईपर्यंत आमच्यावर हल्ला झाला, आणि मी त्यांचा प्रतिकार करून होईपर्यंत चौघांपैकी कुणीतरी एकाने मौसमचा खुन केला...”

“फिर तू वहा से भागा क्युं...?” आरीफने त्याला प्रश्न केला..

“मैं वहा से नहीं भागता तो अभी यहा तुम लोगों के साथ अपनी बेगुनाही पर विवाद नहीं कर सकता था...” मंदार आरीफकडे वळत म्हणाला. त्याचा आवाज जरा चढ्या स्वराचा होता.

“तु म्हणतोयस त्यात तथ्य असेल तर मला त्या नराधमांना शोधून शिक्षा द्यावीच लागेल..” मनू प्रतिशोधाच्या उद्देशाने लाल झाली होती.

“मला वाटतं आपण तिघं वेगवेगळे होऊन एकाच प्रश्नाचं उत्तर शोधण्यापेक्षा एकत्र येऊन तो प्रश्न लवकर निकालात लावू शकतो...” मंदार.

त्याच्या बोलण्याचा रोख मनू आणि आरीफने ओळखला. आरीफचा इशारा येताच मनूही तयार झाली. पुढ्यात मांडलेलं कोडं सोडवण्यासाठी आता ते तिघंही एकत्र आले होते. परक्या शहरात येऊनही आता मंदारचं पारडं आरीफ आणि मनूच्या येण्याने जड वाटू लागलं होतं. प्रश्नांची उत्तरं आता लवकरात लवकर मिळण्यास सुरूवात होणार होती.

मुख्य सुत्रधार, भाई, डिग्री, मदन, नसीर आणि चंदू सगळे वेगवेगळे होऊन आपापले नविन प्लॅन बनवून मंदारला पकडण्यासाठी सज्ज झाले होते.. तिकडून मंदार, आरीफ आणि मनू त्यांना शोधण्यासाठी प्लॅन तयार करत होते. शिकारी आणि सावज यांमध्ये नक्की कोण कुणाची भुमिका वठविणार हे थोड्याच अवधित स्पष्ट होणार होते.. पाठशिवणीचा खेळ आता कुठे खऱ्या अर्थाने सुरू होणार होता. त्या सर्वांमध्ये खरा डॉमिनंट कोण हे येणारा काळच सांगणार होता.

# डॉमिनंट भाग पाच

मंदार, आरीफ आणि मनूचा एक गट तयार होऊन पुढे आखण्यात येणाऱ्या योजनांवर विचार विनिमय करत होते. नाही म्हणायला सध्यातरी त्यांच्याकडे फक्त चार माणसांचा शोध घेण्याचे काम होते. इतर अजून कोणकोण त्या कारस्थानात सहभागी आहेत, याची कल्पना अजून कोणालाच नव्हती. आरीफला त्या चौघांबद्दल जेवढी माहीती होती ती सर्व त्याने मंदारसमोर मांडली.

“वो चारों एक लोकल भाय के लिये काम करते है.. पर अपने को उन चारों से उसका नाम उगालना होगा.. हम डायरेक्ट जाके भाय से नहीं भीड सकते.. उसके लिये उसे हमारे जाल में लाना होगा...” आरीफ.

“हा पर ये कैसे हो सकता है... उससे अच्छा की हम भाय के पास बिन बुलाये मेहमान बन के जाये.. और वही पे खेल खत्म करें..” मनू आरीफच्या पुढे जावून विचार करत होती.

“नहीं.. उसमें खतरा ज्यादा है.. भाय के ऐरीया में जाके उससे भिडना आसान काम नहीं होगा.. और समझो बाद में पता चला के इस कांड उसका हाथ ही

नहीं था तो.. तो लेने के देने पड जायेंगे.. उसपर भाय को वहा के लोगों का भी सपोर्ट मिलेगा..” आरीफ मनूला समजावण्याच्या स्वरात म्हणाला.

“आरीफ बोलतोय ते खरे आहे.. आपल्याला समोरच्या माणसाची ताकद प्रथम आजमावी लागेल मगच त्याच्यावर हल्ला करता येईल. आणि त्याची ताकद त्याची माणसंच असणार.. म्हणून पहीलं त्यांचा समाचार घेतला पाहीजे..” मंदारने दोन्ही हातांच्या मुठी अलगद एकमेकांवर आपटत म्हटले.

आरीफ आणि मनूनेही त्याला सहमती दर्शवली.

“ठिक है.. अब में जाकर मुआईना करके आता हुं.. इस कांड के बाद अब कौन क्या कर रहा है इसका पता लगाना होगा..” आरीफ निघण्याच्या तयारीत म्हणाला.

“वो लोग तो अभी बिखर गये होंगे.. क्यु के उनका जो भी प्लॅन था वो फेल हो चुका है.. और अब वो लोग वही करेंगे जो उनके प्लॅन में बिलकूल भी नहीं था..” मंदार गालात हसत म्हणाला.

मंदारचा शाब्दिक बाऊन्सर आरीफच्या डोक्यावरून गेला. तो एकदा मंदारकडे पाहत मनूकडे नजर वळवू लागला.

“वो लोग अब कुछ नया करने की सोचने में अपना वक्त बरबाद करेंगे और जो भी सोचेंगे उस पर सौ टक्का शुअर नहीं होंगे.. इसका साफ मतलब ये है के अब हम

उनसे एक कदम आगे चलेंगे..” मनूने मंदारच्या बोलण्यातला यथार्थ उद्देश आरीफला उलगडून सांगितला.

मंदार मनूच्या हुशारीवर मंद हसला. त्याच्याकडे पाहत मनूच्याही चेहऱ्यावर स्मितहास्य आलं. आरीफदेखिल सर्व काही समजल्यासारखे भाव घेऊन त्यांच्याकडे पाहत हसला आणि निघाला.

आता तिथं मंदार आणि मनू दोघंच होते.

रिलॅक्स होत मनूने नकळत आपला शर्ट काढला आणि थोडे आळोखेपिळोखे देऊ लागली. तिच्या काहीश्या ट्रान्स्परंट शुभ्र रंगाच्या स्लीव्हलेस टॉपमधून तिची काया यौवनाचा सर्वात वरचा क्लास दर्शवीत होती. शारीरीक जडणघडण नियमित कसरतीने रेखीव अशीच होती. शब्दांत व्यक्त न करता येण्यासारखं तिचं रूप मंदार भरभरून आस्वादत होता.

अचानक तिला मंदारच्या तिथल्या अस्तित्वाची जाणीव झाली. काही झालं तरी अजून तो काहीसा अनोळखीच होता. तिनं त्याच्याकडे पाहीले. दोघांची नजरानजर होताच त्याची नजर ओशाळत दुसरीकडे गेली. तिनं बाजूला टाकलेला शर्ट पुन्हा उचलण्यासाठी हात पुढे केला पण तितक्यात मंदार म्हणाला..

“काही हरकत नाही.. तू सहज राहू शकतेस.. माझ्यापासून तुला काही धोका नाही...”

त्याच्या डोळयांत रोखुन पाहत ती हसू लागली..

“प्रयत्न तर करून पहा.. मघासारखी हातात येणार नाही मी.. यावेळी तुला मात खावी लागेल..”

“अच्छा.. घाबरलो बाबा.. मी नाही प्रयत्न करणार तसा..”

दोघेही हसतखेळत रोमँटीक वातावरणनिर्मिती करत होते.

“तसंही तुझा मघाचा हातात सुरा घेतलेला अवतार मी पाहीलाय.. मला वाटलेलं आता संपलोच की काय..” मंदार मनूची आणखी तारीफ करण्याच्या बहाण्याने म्हणाला.

मनूला तो प्रसंग आठवून कसेसेच झाले. मंदार गुन्हेगार नसताना त्याच्यासोबत जे तिने केले त्याबद्दल तिला वाईट वाटू लागले. तिच्या मनात अपराधीपणाची भावना जन्म घेऊ लागली होती. तसेच त्याची कहानी ऐकल्यावर आता तिला मंदारबद्दल सहानुभूती वाटत होती. मनातून तो विषय निघावा यासाठी ती मंदारशी इतर गप्पांत रंगू लागली.

मंदारने ते ओळखले. स्त्रीयांच्या मनात एखाद्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली की त्या व्यक्तीवर प्रेम आपोआप होते. मंदार चलाख होता. त्यानं मनूच्या मनात अलगदपणे तिच्याही नकळत प्रवेश केला होता. त्याला मनोमन ती खुप आवडली होती. म्हणूनच त्यानं ही खेळी अत्यंत सफाईदारपणे खेळली होती.

“मला माहीत आहे.. तू घाबरला नव्हतास ते.. उगाच आता मला चण्याच्या झाडावर चढवू नकोस हा.. मंदार काही म्हण तू आहेस अगदी निर्भिड.. तुझ्या डोळयांत मला भीती अजिबात दिसली नाही इतक्या वेळात..” मनूने काहीश्या लटक्या रागात म्हटले.

मंदार जागेवरून उठला.. त्यांच्यादरम्यानचं जवळपास सहा-सात फुटांचं अंतर कापत तो तिच्या जवळ आला. तिच्या डोळयांत पाहताना त्यानं इतर कश्याचाही विचार केला नाही. ती काय म्हणेल..? आपल्याबद्दल काय विचार करेल..? मनात येणाऱ्या असल्या फालतू प्रश्नांना न जुमानता तो तिच्या अगदी जवळ वाकून उभा होता. ती खुर्चीवर बसली होती. पुढे काय होईल याची कल्पना तिलाही नव्हती.. तिच्या मनातही थोडीफार घालमेल सुरूच होती..

“मग काय दिसलं तुला माझ्या डोळयात..” मंदारने विचारले.

तिनं त्याच्या डोळयांत पाहत एक आवंढा गिळला.. एक नजर दुसरीकडे फिरवली. त्याच्या व्यायामानं कमावलेल्या सर्वांगावरून नजर फिरवत पुन्हा त्याच्या डोळयांत पाहू लागली.. यावेळी तिला तो जेम्स बॉन्डसारखा भासला.. फक्त त्याचे केस तेवढे गोल्डन नव्हते.. तिला त्याचा श्वासोच्छवास स्पष्ट ऐकू येऊ लागला होता.. त्याच्या श्वासासोबत स्वतःचा श्वास एकाच लयीत एकरूप करून घेण्याची प्रबळ इच्छा तिच्या मनात आली. अंतर्मन नाही म्हणत असतानाही तिचं स्वतःवरचं नियंत्रण हरवत होतं. कितीही नाही म्हटले तरी मोहाचा तो एक क्षण कसा मानवी मनावर हावी होतो, याचा साक्षात्कार तिला तत्क्षणी होत होता.

तिची नजर त्याच्या डोळ्यांवरून खाली सरकत ओठांवर आली.. पापण्या हळूहळू बंद होऊ लागल्या.. जणू त्यानं संमोहीत केलं की काय.. तिच्याही नकळत तिचे ओठ पुढे सरसावले.. तो हसला.. मनूसारख्या डॅशिंग मुलीनं आपल्या स्वाधिन होणं हा त्याच्या पुरूषत्वाला मिळालेला पुरस्कारच होता.. आपल्यातल्या पुरूषावर त्याला गर्व वाटला.. त्यानंही आपले ओठ पुढे केले.. त्यांच्या ओठांमध्ये किंचितसं अंतर राहीलंच होतं की...

मंदारचा मोबाईल खणाणला... त्या आवाजानं गडबडत ती भानावर आली. मंदारला समोर पाहताच तिने मागे सरकून शर्ट उचलला आणि घालू लागली. मंदारही सावरत मोबाईल खिश्यातून काढू लागला. आज पहील्यांदा त्याला मोबाईल सोबत बाळगण्याचा प्रचंड राग आला होता. मनातल्या मनात ‘कोणा भिकारड्याचा जीव जातोय’ असे त्याला वाटले. फोन बाहेर काढून स्क्रीनवर त्याच्या वडीलांचे नाव पाहताच तो शांत झाला. फोन उचलून कानाला लावत तो मनूपासून थोडा बाजूला गेला.

काही वेळ कॉलवर बोलल्यानंतर तो पुन्हा मनूजवळ आला. पण आताचा तो थोडा वेगळा वाटला. त्याचे डोळे लाल झाले होते. रागाने तो धुसफुसत होता. काय करू नी काय नको असे त्याला वाटत होते. कारणच तसे होते. अख्ख्या गावात त्याच्या नावाची चर्चा चालू होती. पोलीस सुतावरून स्वर्ग गाठण्यात माहीर असतात. त्याच्या रेखाचित्रावरून पोलीस त्याच्या गावापर्यंत पोहोचण्यात यशस्वी ठरले होते.

एका किन्नरसोबत शय्यासोबत करून तिचा खुन केल्याच्या आरोपाखाली तो बदनाम झाला होता. आणि त्याच्या वडीलांनी त्याला इष्ट ते सर्व काही सांगून चांगलेच खडसावले. वर घराण्याच्या झालेल्या बदनामीचा दाखला देत मंदारशी असलेल्या संबंधांशी पूर्णपणे फारकत घेत फोन आदळला होता.

झालेली बदनामी मंदारच्या सहनशक्तीच्या पलीकडची होती. त्यामुळेच तो बिथरला होता. पण मनूला मात्र त्याच्यात काही वेगळाच बदल जाणवत होता. तिनं त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण त्यानं कठोरतेने तिच्याकडे पाहत दुर्लक्ष केले. काही काळ असाच निघून गेला.

****************************************

भंडारी बावाच्या अड्ड्यावरून निघाल्यानंतर डिग्रीने सुचित केल्याप्रमाणे सर्वजण आपापली खाजगी कामे निपटवून एक तासानंतर सायंकाळी पाच-सहाच्या दरम्यान पुन्हा एकत्र आले. आणि ठरल्याप्रमाणे त्यांनी कल्याण स्टेशनच्या दिशेने कूच केले. स्टेशनजवळच लैला नावाचा कुख्यात बार होता. जो आसपासच्या झाडून सगळयाच खबऱ्यांचा खास असा अड्डा होता. शिवाय बाहेरच्या राज्यांतील बरेचसे तडीपार गुंड, गुन्हेगार तिथेच तळ ठोकून असायचे. त्याला कारणही तसे खासच होते म्हणा..

लैला बारच्या मागच्या बाजूलाच त्या बारचाच एक भाग असलेल्या चार मजली लॉजवर अनैतिक धंद्यांचा सुळसुळाट असायचा. कमालीची बाब अशी की तिथल्या वैश्याव्यवसायात क्वचितही स्त्रीयांचा सहभाग नसायचा. फक्त देहव्यापार करणाऱ्या तृतीयपंथींचीच तिथे रेलचेल असायची. गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांमध्ये एक खास बात असते जी सामान्य माणसात आढळून येत नाही. गुन्हेगार लोक कधीही संतुष्ट अथवा समाधानी होऊ शकत नाहीत. त्यामुळेच सतत त्यांच्या आवडीनिवडी, शानशौकत बदलत्या असतात. म्हणूनच स्त्रीयांमध्ये अडकतील ते गुन्हेगार कसले..?

आणि भर म्हणून की काय सर्वकाही माहीती असुनही पोलिस त्या जागी फिरकत नसत. अगदी मंत्र्या-संत्र्यापर्यंत सगळयांना बक्कळ हप्ता जात असे.

असो.. लैला बार मध्ये आपल्याला मंदारला शोधून देणारे कुणीतरी भेटेलच या सार्थ आशेने डिग्री, मदन, नसीर आणि चंदू तिथे पोहोचले.

साडेसहा वाजण्याच्या सुमारास मुख्य रस्ता सोडल्यावर ते चौघे आतल्या बाजूच्या साधारण चार मीटरच्या अरूंद गल्लीत शिरले. वरती लैला बारचा डिजिटल बोर्ड जरी आकर्षक लाईटींगमुळे चकचकत असला तरी त्याकडे फारसे कुणाचे लक्ष

जायचे नाही. कारण रस्त्याच्या दुतर्फा एकसोएक लावण्यवती तृतीयपंथी आपल्या अदाकारींचा जलवा प्रदर्शित करत असत.

डिग्री, मदन आणि नसीर पूर्वीही तिथं आले होते. त्यामुळे त्यांना त्यात फारसं काही आश्चर्य वाटत नव्हतं. परंतु चंदू त्या ऐरीयात पहिल्यांदाच आला होता. तो भरभरून त्या ललनांचा आणि त्यांच्या लटक्या नखरेल अदाकारींचा आस्वाद घेत होता. मौसमची सोबत त्याला राहूनराहून आठवू लागली.

थोडंस पुढे चालून आल्यावर नक्षत्रासारखी एक अप्सरा त्याला दिसली.. नेव्ही ब्लू कलरच्या साडीचा फिकट गुलाबी रंगाचा पदर छेडत ती ही त्याच्याकडंच पाहत होती. मेकअप भडकच वाटत होता पण तिची कमालीची फिगर आणि दातानं जरा दाबलेल्या रसरशीत लालभडक ओठांचा रस त्याला खुणावत होता. त्याच्या डोळ्यांतील भूक तिनं पाहताच ओळखली. तो आणखी थोडा जवळ येताच ती हळूच पुटपुटली..

“ये शाहरूख.. चल ना .. जन्नत दिखाती हुं..”

तिच्या प्रस्तावानं जणू चंदू घायाळ झाला. त्यानं पुढे पाहीलं बाकी तिघे त्याच्यापासून काही अंतरावर असलेल्या शिडीवरून वर चढत होते. चंदूने झपाझप पाऊलं उचलत त्यांना गाठलं.

“भाईलोग तुम चलो आगे मैं जरा इससे निपटके आता हुं.. आज इसको ले कर ही सुकून मिलेगा..” चंदूनं धडाधड त्यांना सांगितले.

“अबे क्या पागल हो गया है..” नसीर.

“अय... सांभाळून रहा इथं. माहीत पडलं तिनंच तुला घेतलं.. उद्या ढुंगण बाहेर काढून फिरशील..” मदनने हास्यावारी नेलं.

“चंदू.. अभी ये वक्त नहीं है.. रात को जाते टाईम उसको साथ लेके जायेंगे..” डिग्रीने त्याला समजावले.

पण चंदू मदनच्या पंच मुळे खजिल झाला होता. मनोमन मदनचा खून करावा असा विचार त्याच्या मनात आला.

****************************************

संध्याकाळ होत आली होती. आरीफने बाहेर पडताच फोनाफोनी करत आपल्या दोन-तीन भाईबंधूकडून त्या चौघांचे अड्डे, ठावठिकाणे जाणून घ्यायला सुरूवात केली. तसेच सर्वांना ते दिसतील तेव्हा कळविण्यास सांगितले होते. दोनएक तासात सर्व फिल्डींग लावल्यावर आरीफ भायच्या ठिकाणाच्या आसपासच्या

परिसरात शोध घेण्यास तिकडे वळणारच होता की डिग्री आणि त्याचे साथीदार स्टेशन परीसरातल्या लैला बारजवळ नुकतेच आल्याची बातमी मिळाली.

आरीफने ताबडतोब मनूला फोन केला.

“उन चारों का पता चल गया है.. “

“हा..”

“अभी अभी लैला बार में इन्ट्री की है..”

“वहा का माहौल तुम्हे पता है.. सारे खबरीयोंका वही अड्डा है इसलिये वहा आने पर होशियार रहना..”

“मेरे खयाल से तु सिर्फ मंदार को भेज.. यहा पर मौसम की बहुतसी सहेलियां रह सकती है.. तुझे किसीने पहचान लिया तो मुसिबत हो सकती है..”

आरीफने आवश्यक त्या सुचना देत फोन ठेवला.

लाऊडस्पीकर ऑन मोड मध्ये असल्याने मंदारने संभाषण ऐकले होते.

“मी नाही जाणार असं होऊच शकत नाही..” मनू रागाने फुत्कारत म्हणाली.

“स्वीटहर्ट.. त्याचं म्हणणं बरोबर आहे.. आपल्याला त्यांचा खुन करायचा नाही.. तु तिथं गेलीस तर एकाचा तरी मुदडा पाडल्याशिवाय शांत रहाणार नाहीस.. वर तुला कुणी ओळखलं तर आपल्याला पुढच्या गोष्टी करणं अवघड जाऊ शकतं.”

“अरे पण बदला मला घ्यायचाय...”

“तुला काय वाटतं त्यांना पकडून किंवा मारून बदला पूर्ण होईल...? ज्यानं मौसमला यात गोवलं त्याचं काय..? तो मुख्य सूत्रधार सापडेपर्यंत तुला बाहेर निघून चालणार नाही.. तसंही तु आपल्या टिमचा हुकमी एक्का आहेस.. तुला अजून कोणी पाहीलेलं नाही या प्रकरणात.. सो तुझ्यावर कुणालाच संशय येणार नाही.. मी आणि आरीफ त्यांच्याकडून खरं काय ते जाणून घेतो.. नेक्स्ट टाईम आय प्रॉमिस दॅट यु विल् लिड् दी ऑपरेशन..” मंदारने एखाद्या वकीलाप्रमाणे आपली बाजू स्पष्ट केली.

मंदारमध्ये हीच तर जादू होती, त्याचं म्हणणं तो समोरच्याला अश्या रीतीने पटवून द्यायचा की समोरच्या व्यक्तीला नकार देण्यास जागाच मिळायची नाही.

मनूनेही का-कू करत तो नाद सोडून दिल्याचे दाखविले.

मंदार तिथून एकटाच निघाला. सर्वात आधी तो त्या लॉजकडे वळाला जिथे त्यानं रूम घेतली होती. पंधरा मिनिटात खांद्यावर ब्लू अमेरीकन टुरीस्टर लटकवलेला एक इसम बाहेर पडला. डोक्यावर डार्कीश काळया रंगाची कॅप आणि

ब्लॅक गॉगल्स लावलेला तो इसम शरीरयष्टीवरून तरी मंदारसारखाच भासत होता. हो.. तो मंदारच होता.

**लॉजमध्ये घुसतानाचा मंदार आणि बाहेर पडलेला मंदार यांच्या वेशभूषेत आणि कपड्यांत बराच फरक होता. साहजिकच पोलिसांच्या कृपेमुळे त्याचा चेहरा मिडीयामध्ये आला होता. म्हणूनच त्याला लपूनछपून सर्व काही करणे भाग होते. रस्त्यावरच्या धावत्या ऑटो रिक्षाला हात दाखवत त्याने थांबविले. आणि कल्याण स्टेशनच्या दिशेने कुच केले.**

**************************************

मंद लाईट्सचा प्रकाश त्या बारचं आतलं वातावरण अधिकच गडद करत होता. वेगवेगळया टेबलांवर अलगअलग तर्हेच्या माणसांच्या गुप्त मिटींगी चालू होत्या. काही टेबलांवरची माणसं तिथल्या सर्व्हंटशी अश्लील चाळे करत होती. डिग्री, मदन, नसीर आणि चंदू एका टेबलवर बसून कुणाची तरी वाट पाहत होते. चंदू राहून राहून आसपासचं सगळं निरखुन पाहण्यात मग्न होता.

अर्धा-पाऊणतास तसाच एक-एक पेग संपवण्यात घालवल्यावर नसीर कंटाळून गेला होता. चंदू अजूनही नेत्रसुख घेण्यात धन्यता मानत होता. मदन

नसीरकडे रोखून पाहत होता. डिग्री मात्र शांतपणे सर्ववार नजर ठेवून होता. त्याचा खबरी केव्हाही तिथं आला असता.

“मैं जरा हलका हो के आता हुं..” नसीरने डाव्या हाताची करंगळी उंचावत दाखवली.

मुख्य हॉलपासून उजव्या कोपऱ्यात वॉशरूमकडे जाण्यासाठी एक चिंचोळी वाट केली होती. तिथलं वातावरणही काहीसं अंधारमय असंच होतं. अहं.. लाईटस् इश्शूज, लोडशेडिंग असलं काही कारण नव्हतं.. तिथं येणाऱ्या साऱ्या कलंदरांची प्रायव्हसी म्हणून तशी अरेंजमेंट खास केली होती.

नसीर गेल्यावर पाच-दहा मिनिटांनी मदनही उठला आणि टॉयलेट रूमकडे प्रस्थान केले.

त्यांच्या मागावर असलेल्या आरीफने नसीर आणि मदनला टॉयलेट रूमकडे जाताना पाहीले. आणि तो कुणाला संशय येणार नाही अशा पद्धतीने दबक्या पावलांनी त्यांच्या मागोमाग तिकडे जाण्यास निघाला. मंदारला याबाबत कळवावे असे त्याला मनोमन वाटले पण तितका वेळ नव्हता.

**मदनला नसीरपाठोपाठ जाताना डिग्री संशयास्पद नजरेने त्याच्याकडे पाहत होता. मदन आणि नसीरमध्ये बऱ्याचदा खटके उडाले होते. शिवाय नुकतीच मदनने नसीरची कॉलर पकडली होती हे डिग्रीला आठवले. तसेच मौसमच्या**

**खुनामध्ये मुख्य संशय डिग्रीला मदनवरच वाटत होता. म्हणूनच की काय आता त्याच्या मनात संशयाची पाल चुकचुकली.**

इकडे वाॅश बेसिनमध्ये हात धुताना नसीरने आरश्यात पाहताना दाढीच्या एका पिकलेल्या केसावर नजर टाकत तोंड वाकडे केले. मागे टॉयलेट रूमचा बंद दरवाजा आरश्यातून स्पष्ट दिसत होता. नळ सुरू करून नसीर चेहरा धुण्यासाठी खाली झुकला.. ओंजळीत घेतलेले पाणी चेहऱ्यावर मारत तो आरश्यात पाहण्यासाठी म्हणून उठला आणि आरश्यामधल्या प्रतिबिंबातील झालेला बदल पाहून त्याच्या काळजात धस्स् झाले.. एक अनामिकशी भीती त्याच्या अंतर्मनाला स्पर्शून गेली.

जसा मनात काही वेगळाच विचार आला तसा डिग्री धावतच टॉयलेट रूमकडे पळाला. वाटेत त्याची धडक आरीफशी झाली.. पण सध्या त्याच्याकडे दूर्लक्ष करत डिग्रीने एकदाची आतमध्ये इन्ट्री मारली. आत घुसताना तो मदनच्या नावाने ओरडतच तीव्रतेने धावला.

मदन कमोडपासून एका हाताच्या दूरीवर गुडघ्यात वाकून बसला होता. डिग्री नुकताच तिथं पोहोचला आणि समोरचं दृश्य पाहून थिजला. मदनने मागे आलेल्या डिग्रीकडे पाहीले. त्याच्याकडे अविश्वासाने पाहत डिग्रीने तोंड फिरवले आणि तो नसीरला न्याहाळत आसपास नजर फिरवू लागला.

**‘नसीरचा खुन झाला होता. तोही इतक्या सफाईदारपणे की नसीरला बचावाची एकही संधी मिळाली नसावी. त्याचे हात उलट्या बाजूला वळाले होते**

**पायांची हालतही जवळपास तशीच होती. आणि मुंडकं कमोडमध्ये झुकलं होतं. कुणीतरी जबरदस्त ताकद लावून नसीरच्या हाडांशी खेळलं होतं.'**

डिग्रीला मदनवर संशय होता पण त्याची इतकी मजल जाईल का यावर शंकाही होती. मागून कुणाच्यातरी पाऊलांचा आवाज आला म्हणून सावध होत ते दोघे मागे फिरले. दरवाजा पुढे लोटलेल्या अवस्थेत होता. दरवाज्याजवळ येत ते बाहेरील आवाजाचा कानोसा घेऊ लागले.

जे कोणी बाहेरून येईल ते तिथलं दृश्य पाहून बोंबलणार एवढं नक्की होतं. म्हणून त्यानं आत पाऊल टाकल्याटाकल्याच त्याचं तोंड दाबायचं असं दोघांनी ठरवलं. पण तो पावलांचा आवाज असाच कुणा आयाराम गयारामचा असेल वा त्याच खुनी माणसाचा... आणि जर तोच असेल तर काय करायचे..? आता नाही म्हटले तरी डिग्री आणि मदनच्या मनात भीतीची ती लहर आलीच.

डिग्री आणि मदन दोघेही काहीशी ऊत्सुकता आणि काहीशी भीती अश्या द्विधा अवस्थेत दरवाज्याच्या मागे प्रतिकारात्मक तसेच बचावात्मक पवित्रा घेऊन उभे होते. पुढे काय होणार याची कल्पना कुणालाच नव्हती...

मंदार तिथं पोहोचला होता का..? मंदारनेच हे सर्व घडवून आणले की.. या सगळया प्रकरणात मदनचा हात होता..? मनू सारखं डॅशिंग व्यक्तीमत्व खरेच आणीबाणीच्या असल्या प्रसंगी घरीच बसलं असावं की तिनं या खेळात उडी मारली असावी..? का मुख्य सूत्रधार नवा व्हीलन बनून समोर आला होता..?

# डॉमिनंट भाग सहा

'किती कमी वेळात मंदारबाबतचे गैरसमज दूर झाले आणि किती पटकन त्या नाजूक क्षणापर्यंत आपण त्याच्यासोबत गेलो.. त्याची पर्सनॅलिटी बाकी आपल्याला साजेशी अशीच आहे.. उंच, मजबूत बांध्याचा.. बिनधास्त.. कसल्याही प्रसंगाला न घाबरणारा.. निडर.. असाच तर जोडीदार हवा होता मला.. छ्या.. माझ्यात मुळी टिपीकल बायकांसारखे लटकेझटके नाहीत.. बाईलचाळे करत मला तर धड लाजताही येत नाही.. नाहीतर त्याला आजच माझ्या प्रेमात वेडं केलं असतं..' मनू आपल्याच मनाशी संवाद साधत होती.

मुळात धाकडशाहीसारखा स्वभाव असल्याने तिनं कधी असल्या गोष्टींवर फारसं लक्ष दिलं नव्हतं. पण आज त्याच्यातल्या पुरूषानं तिच्यातल्या बाईला जागं केलं होतं. जीवनात अशी वेळ एकदातरी येतेच जेव्हा मनावरचा संयम सुटतो आणि आपण स्वतःवर बाहेरून कितीही कसलेही पांघरूण घेतले तरी आपल्यातल्या मुळ इच्छेला न्याय द्यावा लागतो.

मंदारच्या विचारांत हरवलेल्या मनूच्या डोळयांसमोर अचानक मौसमचा चेहरा आला आणि तिला सद्यपरिस्थितीचे आकलन झाले.

'अह.. शिट्ऽऽ कसले मूर्ख होते मी.. नशीब पण त्याला फोन आला आणि मी भावनांच्या भरात सारं काही विसरता विसरता राहीले. कितीही काहीही झाले तरी पहीले मला त्या खुनी नराधमाला शोधले पाहीजे.' मंदारचा विचार झटकून मनूने पुन्हा आपले मन मूळ मुद्द्याकडे डायव्हर्ट केले.

मंदार आणि आरीफ दोघांमुळे आपल्याला लवकरात लवकर मौसमचा खुनी सापडण्यास तरी मदत होईल अशी खात्री मनूला झाली होती.

मंदार निघून गेल्यावर काहीश्या अस्वस्थ असलेल्या मनूच्या मनात चलबिचल सुरू होती. तिला राहून राहून कसलीतरी शंका येत होती. म्हणूनच की काय तिने आरीफला पुन्हा एकदा तिथली परीस्थिती जाणून घेण्यासाठी फोन करायला घेतला. पण त्याचा नंबर डायल करण्यापूर्वीच तिला समोरून 'मेहजबीन' नावाच्या व्यक्तीचा फोन आला.

"हॅल्लो... " मनू ऊत्सुकतेने म्हणाली.

"मौसम आखरी दिन जिन लोगों के साथ थी, वो लोग अभी अभी यहा आये है.. तुम कहो तो मै सबको बुलाकर उन ह*** को पकड के रख दूं..?" समोरून मेहजबीन म्हणाली.

मनूने अगोदरच मौसम सोबत काम करणाऱ्या सर्वांना काही खबर मिळाली तर कळवण्यास सांगितले होते. त्यातूनच या मेहजबीन नामक व्यक्तीने तिला ताबडतोब माहीती दिली होती. मेहजबीन तीच होती जिने लैला बारजवळ चंदूशी

लगट करण्याचा प्रयत्न केला होता. खरंतर तिने त्या चौघांना ओळखले होते आणि मौसमच्या हत्येचा सुड घेण्यात तिलाही आपले योगदान द्यायचे होते. म्हणूनच ते चौघे शिडी चढून वर जाताच तिने मनूला फोन केला होता.

"नहीं दिदी.. वहा पहलेसे ही अपने दो आदमी गये है.. और उन चारों को बिना आगाह किये हमे तलाश करनी है.. अपने लोग ये काम कर देंगे.." मनू मेहजबीनला समजावत म्हणाली.

"हा पर वो तो चार लोग है.. और लगते तो पक्के गुंडे टाईपके.. मुझे लगता है शायद वो लोग भारी पड सकते है.. इसलिये हमें रिस्क नहीं लेना चाहीये.." मेहजबीन मनूला संभाव्य धोक्याची शक्यता सांगू लागली.

मनू तिच्याशी बोलता बोलता थोडा विचार करत मनाशी बॅकअप प्लॅन पक्का करू लागली. जर तिथे डाव उलटला तर... या सर्व गडबडीत तिने अथवा मंदार किंवा आरीफने बॅकअपचा विचारच केला नव्हता.

"ठिक है दिदी.. मैं आती हुं वहा.. तब तक आप उन चारों को अलग करने की कोशिश करना.. बस उन्हे शक नहीं होना चाहीये.." मनूने घाईतच निघत तिला सुचना दिल्या.

**चौघांशी एकदम भिडण्यापेक्षा त्यांना वेगवेगळे करून पकडणे जास्त सोईस्कर होते. शिवाय तिथे इतरही मवाल्यांचीही वर्दळ असणारच. म्हणूनच काम**

**चोख होण्यासाठी त्यांच्यातला कुणी मेहजबीनसोबत तिथून वेगळा झाला तर त्याच्याशी मी माझ्या पद्धतीने निपटू शकते. मनूने धडाधड सर्व निश्चित केले.**

"मैं तो अपना काम शुरू भी कर चुकी हुं.. उनमें से एक तो मेरा दिवाना भी हो गया है.. मैं कैसै भी करके उसे अलग कहीं लेके जाते हुं.. जगह और रूम नंबर मेसेज कर दुंगी.." मेहजबीन हलकीशी स्माईल करत म्हणाली.

"ठिक है.. अपना खयाल रखना.. मैं बस पहुंच ही रही हुं.." मनू एव्हाना बाहेर पडली होती.

समोरून मिळालेली माहीती मनूसाठी महत्त्वाची अशीच होती आणि मग कसलाही पुढचामागचा विचार न करता मनूने आपल्या बाईकला किक मारली. हेल्मेट डोक्यात चढवून तिनं गिअर टाकला आणि सुसाट बाईक मुख्य रस्त्यावर काढू लागली..

अचानक रस्त्यात आलेल्या माणसाला प्रसंगावधान राखत तिने चुकवले.. अगदी थोडक्यातच वाचला तो मनूच्या बाईकपासून...

"ओय् अंकल् बाईक से कुछ नहीं होगाऽऽ.. ट्रक ढुंड ले मरने के लियेऽऽ..."

**तो माणूस फक्त आ वासून मनूचे शब्द ऐकत मागे वळून पाहत राहीला आणि मनू वाऱ्याच्या वेगात कल्याणच्या दिशेने 'छु' झाली.**

*******************************

मदन आणि डिग्री दोघेही श्वास रोखून बाहेरील व्यक्तीचा अंदाज घेत होते. पण बाहेरील व्यक्ती बहुधा हुशार असावी तिने दरवाजा उघडून आत जाण्यापेक्षा दरवाजा झटकन हाताने ढकलून चार पाऊले मागे जाणे पसंद केले.

**दरवाजा एकदम उघडल्याने डिग्री थोडा चाचपडला. खरंतर डिग्रीच्या मनात एकाचवेळी बाहेरील शत्रू आणि आत असलेला मदन दोघांचा विचार सुरू होता. मदनसंबंधी डिग्रीचे मन साशंक होते. काही झाले तरी त्याने नसीर सोबत टॉयलेट रूममध्ये मदनलाच पाहीले होते. म्हणून तो नसीरप्रमाणेच आपल्यावरही हल्ला करतो की काय अशी भीती डिग्रीच्या मनात आता घर करू पाहत होती.**

दरवाजा पूर्णपणे उघडला गेला तसा मदन थोडा पुढे सरकला. डिग्री आणि मदन दोघांचाही जीव समोर आरीफला पाहून भांड्यात पडला.

“तु यहा क्या कर रहा है..” मदनने आवाजात जरब दाखवत म्हटले. साहजिकच तो आरीफला तिथं पाहून नाखुश होता.

“मैं क्या करूँगा ना भाय.. अपन तो यही पडा रहता है हमेशा..” आरीफ थोडं घाबरत असल्यासारखं दाखवलं.

"एक मिनिट.." डिग्री भडकतच पुढे आला आणि आरीफची कॉलर गच्च पकडत त्याला भिंतीवर दाबत विचारू लागला.

"अभी बाहर मुझे तु ही टकराया था ना चु**.."

"भाय....भाय.. हा मै ईच था वो.. पर क्या हुवा..?" आरीफने नरमाईची भुमिका घेतली होती.

"आ... आ इधर भो***..." डिग्रीने त्याला आत नसीरच्या बॉडीपशी नेलं. नसीरला त्या अवस्थेत पाहताच आरीफ साफ हादरला.

"या अल्लाह.... ये क्या हो गया..." आरीफ विस्फारलेल्या डोळयांनी ते पाहत उद्गारला.

"चौकने की ॲक्टींग मत कर श्याने.. या तो तूने कुछ देखा है या ये कारनामा तूनेही किया है.." डिग्री त्याला सज्जड दम देण्याच्या आवेशात म्हणाला.

"नहीं भाईजान.. खुदा कसम ना मैंने कुछ देखा ना इससे मेरा कोई वास्ता.. मै तो बाथरूम आ रहा था.. अचानक आप पीछेसे भागते हुये आते दिखे और मैं रूक गया..." आरीफ गयावया करत स्पष्टीकरण देत होता.

"तो फिर तेरे मरनेसे हमारा कोई नुकसान नहीं होगा.. " असे म्हणत मदन पुढे सरसावला आणि आरीफला बकोटीला घेऊन त्याच्या मानेवर जोर देण्याच्या प्रयत्न करू लागला.

डिग्रीने मदनला तत्क्षणी अडवले आणि आरीफला मदनच्या तावडीतून सोडवले. ज्याप्रमाणे मदन आरीफचा जीव घेण्याचा प्रयत्न करत होता त्यावरून डिग्रीचं मन मदनबाबत अधिकच साशंक होत होतं.

“रूक जा मदन.. मंदार के बारें में इससे बेहतर हमें कौन खबरी मिलेगा...” डिग्री म्हणाला.

त्यामागे दोन कारणे होती एकतर आरीफ सुरूवातीपासून अप्रत्यक्षरित्या या प्रकरणात गुंतलाच होता आणि मंदारला पहील्यांदा त्यानेच स्टेशनवरून पिक करून आणले होते. म्हणून आरीफसारखा खबरी यापुढेही कामी आला असता. वरून मदनवर डायरेक्ट आरोप करण्यापेक्षा त्याचा तपास करायला थोडा अधिक वेळ डिग्रीला मिळाला असता. शिवाय आता आरीफला त्याच्यापासून वाचवून आपण पुढे मदनचाच या खुनामध्ये काही संबंध आहे का हे ही आरीफला शोधायला सांगू शकतो.

“नहीं.. वो बहोतही चलाक है.. इतनी आसानीसे हमारे हाथ नहीं आ सकता..(नसीरच्या मृत शरीराकडे पाहत) और जिस तरह से उसने नसीर को मारा है, वो ताकद से काबू नहीं आयेगा.. हमें उसके लिये अलग जाल बिछाना होगा.. अगर नसीर आज मारा गया है इसका मतलब अगली बार हम में से किसको मारने वो जरूर आयेगा..” मदन एकाचवेळी आवाजात जरब आणि भिती ठेवून बोलत होता.

त्याने तसा अंदाज वर्तवल्यामुळे डिग्री अजूनच सावध होऊ लागला. त्याला आता मदनवर पूर्ण संशय येऊ लागला होता, कारण तिथे मंदारच्या उपस्थितीच्या कोणत्याच खुणा दिसत नव्हत्या.

“आप लोगों को ऐसा क्यों लग रहा है के ये सब मंदारनेही किया है..” आरीफ तिकडून वेगळा तर्क लावून त्यांना कन्फूज करू पाहत होता. तसं म्हणायला गेलं तर त्यालाही नेमकं माहीत नव्हतं की नसीरचा खुन कोणी केला आहे.

“और कौन हो सकता है... हालात यही बयान कर रहे हैं... क्युं डिग्री..?” मदनने डिग्रीकडे पाहत विचारले.

खरंतर डिग्रीच्या ओठांपर्यंत मदनचं नाव आलंच होतं. पण त्याच्यासमोर तसं काही बोलण्याचं धैर्य सध्यातरी डिग्रीमध्ये नव्हतं. म्हणून त्यानं फक्त मान हलवत सहमती दर्शवली.

“आरीफ.. जितनी जल्दी हो सके उसका पता लगा.. उसे अपने अड्डे पे कैसे लाना है ये बाद में सोचेंगे..” डिग्रीने मदनच्या समाधानासाठी आरीफला सुचित केले.

आरीफही मनाच्या द्विधा अवस्थेत होता. मंदार की मदन कोणी केलं असावं हे... मंदारबाबत तसे वाटत नव्हते कारण तो क्रिमिनल वाटत नव्हता.. आणि मदन जरी क्रिमिनल असला तरी त्याच्यात एखाद्याची हाडं तोडण्याइतपत कौशल्य नसावं. शिवाय इथं पोहोचल्यावर मंदारने आपल्याला फोन करून कळवलं तरी असतं. असं

अचानक आत येऊन तो डायरेक्ट खुन करणार नाही.. आरीफच्या मनात विचारांचा कल्लोळ उठला होता.

“हम तीनों को अब साथ में ही रहना होगा..” मदन एवढं बोलून दरवाज्यापर्यंत गेला.. आणि पटकन मागे वळून डिग्रीला ओरडून विचारू लागला..

“चंदू कहां हैऽऽऽऽ...”

“वो तो बाहर टेबलपर बैठाऽऽऽ....” डिग्री उत्तरादाखल म्हणाला आणि तोंडातलं वाक्य संपण्याआधीच त्याने चमकून मदनकडे पाहीले. त्याचक्षणी त्याच्या मनात विचार शिवून गेला..

‘जर मंदार खुनी असेल तर...? चंदू तिकडे एकटाच बसला आहे...’

बहुधा मदनच्याही मनात तसंच काहीतरी चाललं असावं.. त्याने डिग्रीच्या चेहऱ्यावरचे भाव वाचले.. एकाचवेळी दोघांच्याही मनात आलेल्या त्या शक्यतेने क्षणाचाही विलंब न करता त्यांनी चंदूकडे धाव घेतली.

**नसीरच्या खुनानंतर वॉशरूममध्ये अनुक्रमे मदन, डिग्री आणि आरीफ या तिघांनी प्रवेश केला होता. तिघेही घडलेल्या आकस्मिक प्रसंगात एवढे गुंग झाले होते की एवढ्या वेळात त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली नव्हती. नसीर ज्या टॉयलेट रूम मध्ये पडला होता त्याच्या बाजूला आणखीही दोन टॉयलेट रूम होत्या. पैकी एका टॉयलेट रूमचे डोअर अर्धवट उघडे होते. पण दुसरा रूमचा डोअर... ओह.. नो.. तो**

**तर आतून लॉक होता.. कुणीतरी आतच होते.. त्या बंद दरवाज्याच्या मागे.. पुढील संधीची वाट पाहत..**

**********************************

चंदू एकटाच टेबलवर बसून आसपासच्या नजाऱ्यांना पाहत नयनसुखाचा आनंद घेत होता. मनात चाललेल्या उत्तेजक विचारांच्या प्रवाहात तो मस्तपैकी निष्णात असल्यासारखं पोहत होता. अचानक त्या प्रवाहात कुठूनतरी खडकावर आपटावं तसं त्याला मदन आणि त्याने मारलेला पंच आठवला. जरी त्यावेळी तो प्रसंग निव्वळ हसण्यावारी गेला असला तरी त्याला मदनचा प्रचंड राग आला होता. सरळसरळ त्याच्यातल्या पुरूषत्वावर केलेला तो हल्ला होता. म्हणूनच मदनला धडा शिकवणे त्याला आवश्यक वाटत होते.

काही क्षण त्या प्रसंगात रेंगाळल्यावर चंदू पुन्हा सभोवताली नजर फिरवण्यासाठी म्हणून इकडेतिकडे पाहू लागला. यावेळी त्याला ती दिसली. समोर उभी राहून त्याच्याकडेच पाहत गालातल्या गालात मंद हसत होती. फिकट गुलाबी रंगाचा पदर छेडतानाची तीची बोटे खरेतर चंदूमधल्या आसुसलेल्या पुरूषाला छेडत होती. आणि तो त्या नजाकतींवर फिदा होत मिश्किलपणे हसत होता.

तिनं खुणावून त्याला तिच्या मागे येण्यास सांगितले. चंदू झटकन जाण्यासाठी उठला पण एक क्षण घुटमळत थांबला. डिग्रीला सांगून जावं का..? नको जाऊ दे.. ते लोकं उगाचच पुन्हा काही फालतूचे टोमणे मारतील.. त्यापेक्षा सुमडीत जाऊन काम फत्तेच करून येऊ.. आणि मग मदनला पण दाखवून देऊ आपण काही कमी नाही म्हणून..

चंदू निघाला तिच्या मागून..

बारच्या मागच्या बाजूला असलेला लॉज मधल्या कॉरीडॉरने जोडला होता. ती त्या कॉरीडॉर पर्यंत पोहोचली होती. मागून चंदूही येत होता. साधारण पाचसहा पाऊलांच्या अंतरावरून ते चालत होते. तिच्या पाठमोऱ्या शरीरावरून नजर फिरवत त्याने तिच्या जवळ जात विचारले..

“नाम क्या है तेरा...?”

“मेहजबीन...” तिनं एकदा त्याच्या डोळयांत पाहून नजर फिरवत सांगितले. तिच्या चेहऱ्यावर अजूनही मघाचेच मंद हास्य कायम होते.

“आह्.. नाम भी कमाल का है.. वैसे हम कहा जा रहें है..” त्याने विचारले.

“जहां जाने का आपको बेसब्रीसे इंतजार हैं...” तिचं हास्य आता थोडं अजून खुललं होतं.

“यहीं पीछे रूम मिल जायेगा..” पुढे हात दाखवत तिने सांगितले.

त्यानंही आवेषात येत तिच्यासोबत जाणं पसंद केलं होतं.

साधारण दहा मीटरच अंतर कापल्यावर मुख्य दालनात त्यांनी प्रवेश केला. मेहजबीनने इशाऱ्याने समोरच्या काऊंटरवर बसलेल्या माणसाकडे चंदूचं लक्ष वेधलं. पुढे जाऊन चंदूने तिथं पैसै वगैरे भरून किल्ली घेतली आणि त्या माणसानं सांगितलेल्या दिशेने चंदू आणि मेहजबीन गेले.

मुख्य दालनापासून आडबाजूला आणि काऊंटरपासून दिसणार नाही अश्या ब्लॉकमध्ये त्यांना रूम मिळाली होती. आतमध्ये प्रवेश करताना मेहजबीनने दारावरच्या रूम नंबरवरून नजर फिरवली. आत खोलीतला माहौल काहीसा भडक असा होता. डार्क अंधारल्या सारखा लाईट्सचा उजेड म्हणजे एकप्रकारची विसंगतीच होती. दहा बाय दहाची अशी ती लहानशी खोली सुरू होऊन एक बेड आणि त्या बेडला सभोवतालून एकावेळी एका माणसाला राऊंड मारता यावा इतपतच काय ते अस्तित्व होतं. समोरची भिंत संपावी तिथं मोठी काचेची खिडकी होती. बेडच्या पायाकडच्या दिशेला एका बाजूला टॉयलेट आणि दुसऱ्या बाजूला वॉशरूम होते.

मेहजबीनला मनू येईपर्यंत त्याला त्या रूममध्येच थोपवून ठेवायचं होतं. त्यासाठीच ती नॉर्मल कस्टमरसारखेच त्याच्याशी वागत होती. आत येताच चंदूने डोअर आतून लॉक केला आणि त्याने मेहजबीनला बाहुपाशात ओढले. तिने प्रेमाने त्याला सबूरीने घेऊन फ्रेश होऊन यायला सांगितले. पण चंदू तिला सोडून जायला

तयार होत नव्हता. थोडावेळ त्याच्याशी गोड गुजगोष्टी करत मेहजबीनने कसेबसे त्याला आत फ्रेश होण्यासाठी पाठवले.

चंदूने वॉशरूममध्ये जाऊन शॉवर चालू केला. आणि जसा वॉशरूमचा डोअर लॉक केल्याचा हलकासा आवाज मेहजबीनने टिपला तसे तिने लगोलग हालचाली करायला सुरूवात केली. सर्वप्रथम तर तिने स्वतःचा फोन काढत त्या जागेची डिटेल्स् मनूला शॉर्टमॅसेज करत पाठवून दिली. नंतर तिने मुख्य दरवाज्याजवळ जात चंदूला कळून येणार नाही अश्या पद्धतीने लॉक उघडून दरवाजा वरचेवर बंद केला. नको असलेल्या हवेच्या झोताबरोबर मनू येण्याच्या आधीच दरवाजा उघडू नये यासाठी तिने बाजूच्या खाचेच्या फटीमध्ये जवळ पडलेल्या न्यूजपेपरचा छोटा तुकडा आवश्यक तितका फोल्ड करत घुसवला.

आता बाहेरून कुणीतरी धक्का दिल्याशिवाय तो दरवाजा उघडला नसता. राहता राहीलेले एक मुख्य कार्य करण्यासाठी ती मागे फिरली आणि चंदूच्या मोबाईलकडे ती पोहोचलीच होती की तेवढ्यात वॉशरूमचा डोअर उघडल्याचा आवाज आला.

‘शीट्..ऽऽ.. त्याचा फोन बंद करणं राहूनच गेलं... मनू येण्याअगोदर मध्येच त्याला कुणाचा फोन आला तर..’

काहीसा असाच विचार मेहजबीनच्या मनात आला. आपले काम अर्धवट राहण्याची शक्यता तिला वाटत होती. कसेही करून चंदूला भरकटवणे आवश्यक झाले होते.

बाहेर येत तिच्याकडे पाहत चंदू गालांत हसत होता. साहजिकच मनातल्या इच्छापूर्तीचा क्षण जवळ आल्याच्या जाणिवेने तो खुश होता. तिला निरखत निरखत तो जवळ आला आणि पुढ्यात पडलेला मोबाईल उचलून कुणाचा कॉल-मॅसेज आलेय का ते पाहू लागला.

मेहजबीन त्याच्या बाजूलाच उभी होती. तिच्या सर्वांगावरून काटा फिरत असल्यासारखे तिला भासत होते.

'हुश्श... बच गई.. फोन पहले हि बंद किया होता तो ये आदमी मुझपे शक करता और अब तक की मेहनत भी चौपट हो जाती... क्या करू अब.. फोन बंद करूँ या नहीं...? इसके दोस्त अगर टेबलपर लौट गये तो इसे वहा ना पाकर कॉल तो जरूर करेंगे.. बंद तो करना ही होगा.. और करू तो भी कैसे..' मेहजबीन मनात स्वतःशीच बोलत होती.

तिच्याकडे पाहत चंदूने फोन खाली ठेवला.. तिचं लक्ष त्याच्याकडे नव्हतं. त्यानं ते ओळखले.

"क्या हुआ.. ध्यान कहा है.. कुछ टेन्शन..?"

“अऽ अह्... कुछ भी तो नहीं...” ती चटकन सावरत म्हणाली.

तो मागे दरवाज्याकडे जाऊ लागला तिच्या काळजात ‘धस्स’ झाले.. नकळत उजवा हात छातीजवळ आला.. हा आता दरवाजा निरखून पाहतोय की काय.. एक क्षण तिला वाटले की चंदू दिसतो तितका ‘चू’ नक्कीच नव्हता. आता थोडीफार तरी का होईना पण मेहजबीन आतून घाबरली होती तरीही येणाऱ्या प्रसंगाला जमेल तसं सामोरे जाण्यास ती सज्ज झाली.

त्याची चाल दरवाज्याजवळ जाऊन मंदावली आणि बाजूलाच असलेल्या लाईटस् चे स्विच बंद करून तो पुन्हा तिच्याकडे येऊ लागला.

तिनं पुढे काय होईल या काळजीने घेतलेला छातीवरचा हात हळूहळू खाली केला. तिच्या चेहऱ्यावरच्या चिंतेची जागा पुन्हा एकदा स्मितहास्याने घेतली.

‘हा अगदी चू च आहे..’ तिने त्याला बरोबरच हेरले होते.

तो तिच्याजवळ पोहोचला होता. तिला जवळ जाऊन स्पर्श करनार तोच त्याचे लक्ष खिडकीकडे गेले. समोरच्या खिडकीची काच जरा उघडी असल्यामुळे तिथून थोडाफार प्रकाश आत येत होता. त्याने खिडकीकडे पाहून तोंड वाकडे केले आणि अत्यंत नाखुशीनेच तो खिडकी बंद करण्यासाठी वळला. तितकासा अवकाश होता की मेहजबीनने बेडवर तिच्याजवळ पडलेला त्याचा फोन बंद करण्याच्या उद्देशाने उचलला.

अरे बापरे.... त्याचा फोन तर लॉक होता.. चंदू खिडकी बंद करेपर्यंत डायरेक्ट फोनची बॅटरी काढणे शक्यच नव्हते.. ती एअरफोन मोड ऑन करायला गेली पण तेही लॉक उघडल्याशिवाय शक्य नव्हतं. एव्हाना चंदू मागे वळणारच होता, त्या एका क्षणात मेहजबीनला जे शक्य वाटलं तेच केलं. तिने त्याच्या फोनची स्क्रिन ऑफ करत पुन्हा होता तसाच फोन बेडवर ठेवला. तोपर्यंत चंदू मागे वळला आणि मेहजबीन आपल्या पहील्याच पोजमध्ये उभी राहीली.

चंदू हलकेहलके पाऊले टाकत तिच्याजवळ गेला. तिला बाहुपाशात ओढून तो मनातल्या तीव्र इच्छेची पूर्तता करण्यासाठी तिच्यासोबत बेडवर झुकला. तिचे हात हातात घेऊन तो लाडीक भावात गुजगोष्टी करू लागला. चंदूसारख्या गुन्हेगार व्यक्तीकडून मेहजबीनला असे काही अपेक्षित नव्हते. तिला वाटले होते इतर कस्टमरसारखे तो अधाश्यासारखा आपला भोग घेण्यास सुरूवात करेल पण सुरूवात तरी तशी काही झाली नाही.

‘असो जे काही होतेय त्यामुळे थोडा अवधी तरी मिळत आहे, मनू कधीही इथे पोहचू शकते. बास्स्..ऽऽ तेवढ्या वेळात याचा फोन नाही वाजला म्हणजे मिळवले..’ मेहजबीन त्याच्या संवादाला प्रत्युत्तरत तर होती पण तिच्या मनात मात्र पुढे काय होईल याचंच टेन्शन होतं.

तिकडे बारमध्ये टेबलजवळ धावत आलेल्या डिग्री आणि मदनला चंदूच्या अनुपस्थितीने आणखीनच चिंतेत टाकलं होतं. कुठे गेला असेल तो..? की मंदारनेच

तर काही केले नसेल ना..? अश्या नानाविध प्रश्नांनी त्या दोघांच्या डोक्यात भडीमार केला होता.

चंदूला फोन करण्यासाठी डिग्रीने त्याचा नंबर डायल केला...

**'The number you have dial is currently not reachable....'**

पलीकडून आय् वी आर् वरच्या बाईनं कळवलं.

**असं वाटत होतं की नियतीही मेहजबीनच्या खटाटोपींना साथ देत होती. आपल्या मैत्रीणीच्या खुन्याला शोधण्यासाठीचे तिचे जेन्यूयन प्रयत्नांना दैव वाया जाऊन देत नव्हते. हा निव्वळ एक योगायोग असावा की गुन्हेगार चंदूचं स्वतःच्या कर्मांनी कमावलेलं दुर्दैव.. कुणास ठाऊक.**

डिग्रीने पुन्हा एकदा ट्राय केलं पुन्हा तेच ऐकू आलं. आय् वी आर् वरचा आवाज थोडा मोठा होता म्हणून मदनपर्यंत तो पोचू शकला.

"साला कोणत्या भो** जाऊन बसलाय कुणास ठावूक.." चिडलेल्या मदनच्या तोंडून निघाले.

**डिग्री वरवर शांत वाटत असला तरी त्याच्या मनात असंख्य विचारांच्या लाटा एकमेकांवर आदळत होत्या. नेमके काय घडतेय.. कसे घडतेय.. आणि नक्की कोण करतेय.. कश्याचाच माग लागत नव्हता. अक्षरशः बधीर झाल्यासारखा डिग्री भांबावून गेला होता.**

इकडे लॉजमधल्या रूम मध्ये चंदू बोलता बोलता मेहजबीनसोबत रंगात आलाच होता. आणि त्याच्या मनातल्या प्रणयाच्या आतुरलेल्या क्षणांना सुरूवात होणार होती की....

‘धाड्डड्ऽऽ.... थऽ..ड्थाऽड्...’ जोराचा आवाज झाला आणि दरवाजा उघडला गेला.

आणि चंदू आणि मेहजबीन दोघेही डोळे विस्फारून दरवाज्याकडे पाहू लागले. चंदूने गडबडून उठून सावध पवित्रा घेतला. मेहजबीने खाली आलेला पदर सावरत वर घेतला. तिने पाहीले.. दरवाज्यात मनू नव्हतीच. मग हे कोण आलेय आता इथे..? तिच्या मनात प्रश्न पडला. अगदी चंदूच्याही डोक्यात दरवाज्याजवळच्या व्यक्तीविषयी तोच प्रश्न होता.

दरवाज्यात साधारण पाच फूट आठ इंच उंचीची व्यक्ती उभी होती. अंगातल्या सुटबुटांवरून ती व्यक्ती श्रीमंत घराण्यातील अशी वाटत होती. आतल्या व्हाईट शर्टच्यावरचा काळा ब्लेझर त्यानं थोडा मागे केला. त्याच्या मानेवरच्या दाट आणि बोल्ड वळणदार इंग्रजी ‘V’ शेपमुळे त्याचं नाव तसलंच काही असण्याची दाट शक्यता होती.

पण तो कश्यासाठी आला असावा..? माझ्याशी याचं काय वाकडं..? का या मेहजबीनचा कुणी यार वगैरे आहे का..? चंदूने अविश्वासाने तिच्याकडे पाहीलं पण त्याला जाणवलं की तीही समोरच्या व्यक्तीला पाहून त्याच्याइतकीच गोंधळून गेली

होती. काही क्षण फक्त त्या व्यक्तीला निरखुन पाहण्यातच गेले आणि निरीक्षण करता करता त्याच्या हातातली पिस्तूल पाहून चंदूचं अवसानच गळालं...

मनूच्या अगोदर तिथं कोण पोहोचलं असावं.. ? चंदू कुठे आहे हे फक्त मेहजबीन आणि मनूला माहीत होतं.. मग दरवाज्यावर आलेला तो इसम कोण असावा..? मनूनेच तर त्याला पाठवलं नसावं ना..? की चंदूवर अगोदरपासूनच कुणी पाळत ठेवून होतं..? आणि मुख्य म्हणजे मंदार अजूनपर्यंत कुठे होता..? तो निघाल्यापासून त्याचा काहीच पत्ता लागला नव्हता की बंद टॉयलेट रूममध्ये तोच दबा धरून बसला होता.... नसीरचा खुन.. चंदूचं ट्रॅपमध्ये अडकणं.. ही सर्व कुणाची प्लॅनिंग असावी..?

या सगळ्या प्रश्नांची उत्तरं पुढील भागात

# डॉमिनंट भाग सात

रूममध्ये पूर्णपणे शांतता पसरली होती. कुणीही कसलीच हाचचाल करत नव्हते. मेहजबीन शांतपणे बेडच्या डाव्या अंगाला कोपरा पकडून बसली होती. चंदू अकस्मात् परिस्थिती त्याच्या बाजूने वळवून देणाऱ्या संधीची वाट पाहत होता. दरवाज्यातील व्यक्ती भावनाशून्य होत चंदूला न्याहाळत होती. त्याची ती भेदक नजर चंदू आणि मेहजबीन दोघांनाही खायला उठत असल्यासारखे त्यांच्या चेहऱ्यावरून वाटत होते.

न राहवून एकदाचे काय ते फायनल होऊनच जाऊ दे या अनुषंगाने चंदूने तोंड उघठले.

“कोण आहेस तू.. आणि काय पाहीजेय तुला..?”

“मी कुणीही असो काय फरक पडतो..”

“मग इथं कश्याला आलायस.. आम्हाला मारायला..?” पुढची शक्यता मनात धरत चंदूने विचारले.

“नक्कीच तुला मारायला.. तु हिच्यासमोर काही ओकला असशील तर चिडून मी तुला मारणारच आहे आणि जर तू अजून काही सांगितले नसशील तरी तू भविष्यात माझ्यासाठी धोकादायक ठरणारच आहेस.. म्हणून या ना त्या कारणाने मला तुला मारावं तर लागेलच...”

“एयं हिरो.. तू काय बरळतोयस मला कायच कळत नाहीयं.. कसलं.. काय.. कुणाला सांगायचं..? आणि हीला सांगितलं तर म्हणजे...? ही कोण पोलिस आहे का..?” (मेहजबीनकडे इशारा करत) चंदूने जरा आवाज चढवतच त्याला विचारले. चंदूला खरंतर कळतच नव्हतं की आता ही नसती भानगड कुठून वर आली.

“ती कोण.. (समोरचा व्यक्ती हसु लागला).. ती कोण.. ते तिलाच विचार.. जगात मूर्ख माणसांची कमी नाही.. आणि त्यातलाच तू एक अतिमूर्ख इथे या रूममध्ये येऊन हिच्या जाळयात अडकलायंस..”

“काय...” चंदू जवळजवळ हडबडला.

त्याच्या मनात एकावेळी दरवाज्यातील व्यक्ती आणि मेहजबीन दोघांविषयी अविश्वास वाटू लागल्याचे दिसत होते.

“कसं शक्य आहे.. (चंदू मेहजबीनकडे पाहत) तुझी माझी काय दुश्मनी..?”

दरवाज्यातील व्यक्तीने सर्व प्रकार कथन केला. चंदू बारमध्ये आल्यापासून ते मेहजबीनशी त्याची खाली झालेली भेट, त्यानंतर तिने कॉल करून कुणालातरी

बोलावून घेणे आणि त्यांचे या रूमवर येणे सगळया बाबींवर अत्यंत सफाईने त्या व्यक्तीने पाळत ठेवली होती.

चंदूने मेहजबीनचा फोन तिच्याकडून अक्षरशः हिसकावून घेतला. आणि तो रिसेंट डिटेल्स् चेक करू लागला. मॅसेजेस मधला तो मॅसेज त्याने उघडला आणि तिने शेअर केलेला त्यांचा रूम नंबर आणि लोकेशन त्याला दिसला.

चंदू मेहजबीनकडे रागात पहात होता. त्याचं माथं साफ भडकलंच होतं तिच्यावर. च्यामायला.. ह्या भिक्कार रां*ने आपल्यासोबत असा गेम करावा.. हा प्रकारच त्याच्या सहनशक्तीच्या पलीकडला होता. आणि तिच्यावर आपला रोष काढण्यासाठी तो आसुसलेला वाटत होता.

मेहजबीन अजूनही शांत बसून त्यांचे संभाषण ऐकत होती. अशा परिस्थितीत कसलंही स्पष्टीकरण देण्यासाठी तोंड उघडणे तिच्यासाठी सोईस्कर नव्हते. तिला माहीत होते एक हलकीशी चूक आणि त्या दोघांपैकी कुणीही तिचा जीव घेतला असता. जोपर्यंत वेळ मारून नेता येईल तोपर्यंत गप्प बसून राहण्याशिवाय आणखीन कुठला पर्याय शिल्लक होता तेव्हा..?

एका बाजूला हिंस्त्र श्वापद आणि दुसऱ्या बाजूला कठोर काळजाचा शिकारी यांच्यामध्ये अडकलेल्या सावजासारखी तिची अवस्था यावेळी होती. त्यावेळी सावजाला सरंडर केल्याप्रमाणे डोळे मिटून गप्प बसावंच लागतं. कुणास ठावूक कदाचित गप्प राहिल्याने येणारा मृत्यु कमी त्रासदायक होईल. किंवा शांत राहील्याने

आपला जीव तरी वाचेल. तिनेही डोळे बंद केले.. कुठूनतरी कुणीतरी यावं आणि आपण अलगद यातून बाहेर पडावं या आशेने ती वाट पहात होती.

चंदूने तिच्यावर धावून गेला आणि सटासट् चार-पाच कानसुडात खेचून दिल्या.

“हरामखोर.. साली.. छि**....”

हळूहळू त्याचा जोर वाढू लागला आणि तो तिला लाथाबुक्क्या मारू लागला..

मेहजबीन वेदनेनं कळवळू लागली..

आता तर मृत्यू अटळ झाल्याप्रमाणे परीस्थिती झाली होती. चंदू तुफान पिसाळल्यासारखा तिच्यावर तुटून पडला होता. जर मरायचेच आहे तर असे का मरावे.. प्रतिकार करणे आता निकराचे झाले होते..

नाहीतर त्याच्या लाथाबुक्क्यांचा मार खाल्ल्यानंतर कदाचित प्रतिकार करणेही आवाक्याबाहेर जाईल.. तिच्या मनात विचार आला.

जेव्हा सुटकेचा दुसरा कोणताच मार्ग दिसला नाही तेव्हा भिती झुगारून तिने चंदूवर प्रतिहल्ला चढवला. अचानक तिचे हात चालू झाल्यामुळे चंदू एकदोन क्षण हबकला.. आणि तिनं त्याच्या त्याच एकदोन क्षणांच्या निष्क्रीयताचा फर्स्ट ॲडव्हान्टेज् घेत त्याला जमेल तसं मारायला सुरूवात केली.

सपासप् पडू लागलेल्या फटक्यांनी चंदूला काही सुचेनासे झाले. टाळया वाजवून कडक झालेल्या तिच्या तळहातांचे फटकार् त्याच्या चेहऱ्यावर खोलपर्यंत वेदना दित होते. त्याला मारत सावरत उठून तिने गुडघ्यांना हत्यार बनवत जीव खावून त्याच्या पोटावर वार केला.. आणि चंदूचा तोल जावून त्याचं डोकं पहीले बेडच्या कोन्यावर आणि पुढच्याच क्षणी खाली जमिनीवर आदळले. अक्षरशः डोक्यात झिणझिण्या आल्यासारखे झाले त्याला..

दरवाज्यातली व्यक्ती अजूनही तिथेच उभी राहून तमाशा पाहत होती. चंदू खाली पडताच मेहजबीन थांबली. खुप वेळापासून सुरू असलेल्या गोंधळात अचानक कुणीतरी येऊन ‘स्टॅच्यू’ म्हणावं आणि एकसाथ सगळं काही शांत व्हावं असं काहीसं तिथं घडलं.

“च्च्....च्च्...च्च्...च्च्... छ्या.. एका हि**कडून मार खाल्लास..” हातातलं पिस्तूल समोरच्याला दिसेल असं दाखवत दरवाज्यावरची व्यक्ती म्हणाली.

“मार तीलाऽऽ.. गोळी मारऽऽ.. तु बोलशील ते मी करीन.. पण आता तिला मारऽऽ.. मला डोळयासमोर ती जिवंत नकोयऽऽ..” चंदू अडखळत त्याला विनवणी करत आपली शुद्ध हरपत होता.

“अरे मग कश्याला पुढेपुढे करत शहाणपणा केलास.. मला ना सुरूवातीपासूनच असल्या मारझोडीसारख्या फाल्तू गोष्टीत अजिबात इंट्रेस नाही. आपला हिसाब एक ट्रिगर दाबला आणि खेळ खल्लास्... मी तिला मारणारच होतो..

तु उगाचच हिरो बनायला गेलास्...” दरवाज्यावरील व्यक्ती आपल्या कुल अॅन्ड काल्म् आविर्भावात म्हणाली.

मेहजबीन आणि दरवाज्यावरची व्यक्ती यांमध्ये रूमच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंतच अंतर होतं. शिवाय दोघांच्यामध्ये बेडचीही अडचण होती. अश्यावेळी खरंतर तिनं त्याच्यावर झेप घ्यायलाही कमी केलं नसतं. पण त्याच्याकडच्या पिस्तूलामुळं तो सरस होता. आणि ती त्याच्या जवळ पोहचेपर्यंत त्याने पिस्तूल चालवली सुद्धा असती.

“अरे.. पर साहब मेरेको मारके आपको क्या मिलेगा ना.. मैंने क्या बिगाडा आपका..?” मेहजबीन त्याला समजावण्याच्या सुरात म्हणाली.

“सुकून... सुकून मिलेगा मुझे.. मैं जानता हुं कोई तो है जो मरे मुर्दे जगाने की कोशिश में लगा है.. और तुम उसका साथ दे रही हो.. आज तुम लोग इस तक पहुंच गये हो.. कल को इसके साथीयों तक भी जा सकते हो.. और यही मैं नहीं चाहता.. जो कुछ उस लॉज पे हुआ.. मैं वहा से जुडे हर सबूत को मिटा दुंगा.. तुम बेफिक्र होकर उपर का रास्ता देख लो.. तुम्हारे बाद (खाली बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या चंदूकडे पाहत) मैं इस नामर्द को भी मार डालूंगा और फिर इसके साथियों को भी..” दरवाज्यावरच्या व्यक्तीने असं बोलत बोलतच विकट हास्यानं जल्लोष केला.

त्यानं हातातल्या पिस्तूलाची पकड घट्ट केली आणि मेहजबीनवर ताणून धरलं.

“अम्म् म्म... मतलब्.. मौसमको तूने मारा है..?” मेहजबीनने त्यापरीस्थितीतही कुतुहलाने विचारले.

“नहीं... मैंने किसीको नहीं मारा.. और ना ही मैं ये जानता हुं के वहा हुआ क्या था.. पर तुम अब मरनेहीवाली हो तो जानलो.. वहा जो कुछ होनेवाला था वो मेरा ही प्लॅन था... पर अफसोस ये नाकारा और इसका महाचू** भाय अपना काम ठिकसे नहीं कर पाये... और खामखां किसीकी जान गई.. इनफॅक्ट मैंने तो इन लोगों को पहले ही बोला था की पुलिस तक बात नहीं जानी चाहीये.. खैर अब सबको मारके मुझे उनकी गलतियों की सजा तो देनीही पडेगी.. कल किसीभी एक की वजह से पुलिस मुझतक नहीं पहुंचनी चाहीये..” त्याचा बोलण्यातला टोन अजूनही कमालीचा थंड होता.

“मुझे मत मारों.. मैं किसीको कुछ नहीं बताऊंगी..” मेहजबीन विनंती करू लागली.

“अरे यार.. मुझे कोई खुशी नहीं हो रही तुम्हें मारने में.. पर क्या करें, (दिर्घ श्वास घेत) मरना तो तुम्हें पडेगा..” त्यानं स्पष्ट केलं आणि पिस्तूल चालवायला तो सज्ज झाला.

ट्रिगरवरची त्याची बोटं हालचाल करणारच होती की कसलातरी जबरदस्त आघात त्याच्या हातावर झाला. त्या आघातानं तो थोडा तोल जाऊन काहीसा धडपडला आणि त्या गडबडीत त्याचं पिस्तूल खाली जमिनीवर पडलं. थोडीशी

झटापट झाली आणि तेवढ्या वेळातही त्याचं लक्ष मागून कुणी हल्ला केलाय ते न पाहता, खाली जमिनीवर पडलेल्या पिस्तूलाकडेच त्याचे हात सरसावले.

ते पिस्तूल अगदी त्याच्या हातात येणारच होते की मागून कुणाच्यातरी लाथेने ते अजून पुढे फेकले गेले. मेह्जबीनने पाहीले.. साक्षात मृत्यू तिला नुकताच स्पर्श करून गेला होता. पण आता ती सेफ होती. जिची वाट ती इतक्या वेळापासून पाहत होती त्या मनूने रूममध्ये प्रवेश करत तिथली सुत्रं आपल्या हातात घेतली होती.

मनूच्या त्या हरकतीने चिडून त्या व्यक्तीने तिचे पाय धरून खेचण्याचा प्रयत्न केला. पण मनूच्या चपळाईमुळे तो प्रयत्नही साफ फोल ठरला. ती व्यक्ती सावरून उठेपर्यंत मनू त्याच्या पालथ्या अंगावर बसली होती. वरून दोन-चार ठोसे पडताच त्याचा प्रतिसाद थंड पडू लागला. मनूने शक्य तितका तिला चोप देऊन त्याला नमवले. भलेही ती स्त्री असली तरी तिने चातुर्याने ताकदीशी मिलाप करत त्याला गार केले होते. युद्ध फक्त ताकदीने जिंकले जात नाही त्यात बऱ्यापैकी चतुराई, जलद निर्णय, आणि काहीवेळा कुटनितीचा वापर करावाच लागतो.

“मग महाशय.. खेळून दमला असाल तर सांगण्याचं कष्ट कराल का की हे सगळं कश्यासाठी..? नाही.. म्हणजे मघाशी बाहेरून थोडंफार ऐकलंच आहे पण मला पूर्ण माहीती हवीयं.. हे सर्व का केलंस.. मौसमला मारण्यात तुझाच हात असणार.., हो ना..?” मनूने आवाजात जरब दाखवत विचारले.

“फॉर गॉड सेक्.. बंद करा हे मौसम पुराण.. मी कुणाला सांगितलं नव्हतं मौसमला मारायला.. तिचा खुन का झालाय मला नाही माहीत..” चवताळलेली ती व्यक्ती मनूच्या तावडीतून सुटण्यासाठी हिसके देत होती. पण मनूनेही त्याला आपल्या विळख्यात घट्ट पकडून ठेवले होते.

“मग मंदारला कोल्हापूरहुन इथे का आणलंस..?” मनूने त्याला अजूनच दाबत विचारलं.

पण तिच्या त्या प्रश्नाने त्याचं हिसके देणे थांबलं. नुकतच एखादं वादळ येऊन जावं आणि अचानक एकाएकी आसपासचं वातावरण स्तब्ध होऊन जावं. तसंच सन्नाटा पसरल्यासारखी शांतता त्या रूममध्ये पसरली. आपण काही विक्षिप्त तर नाही ना विचारलं असं काहीसं मनूच्याही मनात एकवेळ आलं. छेऽऽ.. तिनं तर सरळ मुद्द्याला हात घातला होता.

खाली पडलेली व्यक्ती काहीच प्रतिसाद देत नव्हती.

ते पाहता मेहजबीनने उठून पुढे गेलेली पिस्तूल उचलली आणि मनूकडे देत म्हणाली,

“ये साला ऐसे नहीं बोलेगाऽऽ.. पक्का क्रिमिनल है ये...”

तिच्या बोलण्यातला रोख मनूने ओळखला. ज्याअर्थी हा बिनधास्त पिस्तूल घेऊन फिरतोय त्याअर्थी नक्कीच हा कुणी छोटामोठा गुन्हेगार नसणार, आणि तसं

असेल तर याच्याशी शक्य तितक्या लवकरात लवकर ठिल करून माहीती काढणं आवश्यक होतं.

मनूने पिस्तूलाचा निशाना त्याच्यावर लावत त्याच्यापासून चार हात मागे जाणं पसंद केलं. आणि धमकावत त्याला बोलतं होण्यास प्रवृत्त केलं.

मनू मागं जाताच थोडंसं धडपडत तो उठला. तिच्याकडून वळून त्यानं अवकाश घेतला आणि बोलू लागला..

“मी विक्रमऽऽ...”

त्यानं स्वतःचं नाव सांगताच मनूचं लक्ष त्याच्या मानेवरच्या दाट बोल्ड आणि वळणादार इंग्रजी अक्षरातल्या ‘V’ कडे गेलं. त्यानं मध्येच कुठल्याही बेसावध क्षणाचा फायदा घेऊ नये म्हणून मनू त्याच्यावर पिस्तूल रोखूनच होती. पण तो मात्र त्याच्या मूळ ॲटीट्यूडप्रमाणेच काल्म झाल्यासारखा बोलत होता.

विक्रम पूर्वी एका एन जी ओ सोबत काम करायचा. गावाखेड्यातल्या स्त्रीयांना त्यांच्या समस्या आणि हक्क यांविषयी लागणारी मदत त्या एन जी ओ मार्फत मिळायची. विक्रम मुळात पैश्येवाल्या फॅमिली बॅकग्राऊंडमधून आलेला होता. आणि त्याच्या म्हणण्यानुसार ते काम तो फक्त सामाजिक जाणिवेतून करत होता.

चार वर्षांपूर्वी जेव्हा कोल्हापूरजवळच्या गावी तो गेला होता. तिथंच मंदार आणि त्याची भेटही झाली होती. सुरूवातीला झालेल्या मैत्रीचे एके दिवशी अचानक

दुश्मनीमध्ये पर्यावसन झाले. नेमके काय घडले होते, ते फक्त विक्रम आणि मंदारमध्येच होते.

पण काही दिवसांतच मंदारने विक्रमला गावातील स्त्रीयांच्या नियमभंगच्या आरोपाखाली गावकऱ्यांकडून जबर चोप दिला होता. अक्षरशः मरता मरता विक्रम त्या जीवघेण्या प्रसंगातून वाचला होता. एक-दोन दिवस शहरातील वर्तमानपत्रात विक्रमची बरीच बदनामीदेखील झाली होती.

“माझं काम त्या गावातल्या स्त्रीयांशी निगडीत होतं. मग साहजिकच मला त्यांच्यासोबत राहावं लागायचं. पण मी कुणा स्त्रीकडे वाकड्या नजरेनं पाहीलं नव्हतं. मंदारने मला उगाचच नसत्या प्रकरणात गोवलं आणि माझी नको तितकी बदनामी झाली.. हे सगळं मी कसं सहन केलं माझं मलाच माहीत.. पण मनात फक्त आणि फक्त एकच विचार होता.. मंदारच्या बदनामीचा.. आणि चार वर्षांनंतर आता मी हा प्लॅन बनवून त्याला पुरता अडकवलाच आहे. तो फक्त पोलीसांच्या हातात येणं बाकी आहे आता...” विक्रमच्या डोळ्यात मंदारविषयीचा राग झळकत होता.

“हा.. पण असं काय झालं होतं तुमच्यात की.. तुम्ही एकमेकांशी वैर पत्करलंत..” मनूने ते कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

पण बाहेरून येणाऱ्या चाहुलीने त्यांचा विषय बहुधा तिथंच अर्धवट राहणार होता.

बाहेर कुणाच्यातरी धडाधड पळण्याचा आवाज येत होता. एक-दोन लांबून येकू येणारे आवाज..

“पुलीसऽऽ...”

“पुलीसऽऽ...”

“रेड पड गयी हैऽऽऽ....”

“खूनऽऽऽ...”

“खून हुआ हैऽऽऽ....”

लॉजच्या चिंचोळया आणि काहीश्या बंदीस्त कॉरीडॉरमधून त्या आवाजांचे प्रतिध्वनी घुमत होते.

आणि आत रूममध्ये एका कोपऱ्यात मेहजबीन.. बेडच्या अलीकडल्या बाजूला विक्रम.. त्याच्यावर अजूनही पिस्तूल रोखून उभी असलेली मनू.. आणि बेडच्या पलीकडल्या टोकाला नुकताच शुद्धीवर येऊ पाहत असलेला चंदू... बाहेर काय सुरू आहे हे कळायला थोडा अवकाश तर लागणारच होता. पण तिवढ्या वेळात पोलिस तिथं पोहोचले तर रूममधलं वातावरण बघून यांना पकडणारच हे निश्चित होतं.

पण मुळात पोलिस तिथं आलेच कसे..? हा प्रश्न होता. कारण एरवी त्या बार आणि लॉजकडे पोलिस मुद्दाम कानाडोळा करत असत. म्हणजेच आज कुणीतरी खास टीप दिल्याची शक्यता दिसत होती. विक्रमने ते ओळखले. पण मनूच्या हातात त्याच्यावर रोखलेले पिस्तूल असल्याकारणाने तो झटपट हालचाल करू शकत नव्हता. जे काही करायचे ते मनूला विश्वासात घेऊनच करावे लागणार होते.

**आणि त्याने त्याअनुषंगाने आपले फासे टाकण्याचे ठरवले...**

# डॉमिनंट भाग आठ

चंदूचा फोन काही केल्या लागत नव्हता. वैतागलेल्या डिग्रीने टेबलवर ठेवलेला दारूचा भरलेला ग्लास तोंडाला लावत गटागट रिकामा केला. थोडासा गळ्याला शेक बसल्यावर डोकं शांत ठेवत त्याने भायला फोन लावला. त्याला आवश्यक ती सर्व माहीती सांगितली. नसीरच्या खुनाबद्दल ऐकून भाय बहुधा चवताळला असावा, कारण पलीकडून डिग्रीला शिव्या पडत होत्या.

“तुम लोगों को बोला था मैंने, यहा से दूर निकल जाओ.. लगता है तुम चारों को पर निकल आये है...” भायचा पलीकडला आवाज मदनलाही ऐकायला आला.

“नहीं भाय.., पर हमने सोचा.. कुछ पता लगा लेंगे उस हरामी का.. तो आपके सर से भी टेन्शन कम हो जायेगा..” डिग्री आपधी बाजू सावरत बोलत होता.

“भग्.. भो**के... खुदा के वास्ते अब अपना मगज दौडाना बंद कर.. और जैसा कहता हुं वैसा कर.. मंदार का बंदोबस्त मैं कर लुंगा.. तुम दोनों वहा से निकल के मेरे घर जाओ..” भायने शिव्या घातल्या पण आपल्या माणसांची काळजी त्याला होतीच.

“भाय, और भी कुछ कहना है....” डिग्रीच्या मुखातुन नकळतच निघालं आणि पटकन आपण केलेल्या चुकीचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याला भाईशी मदनबाबतच बोलायचे होते. पण मदन तर बाजूलाच उभा होता. सांगणार तरी कसं.. आपोआप त्याचे डोळे गच्चकन मिटले गेले आणि जीभ चावली गेली. त्याच्या मनात चाललेल्या कालवाकालवीत तो पुरता गुंतला होता.

“बक्.. और क्या किया है..” भायने पलीकडून विचारले.

“नहीं भाय, चंदू नहीं मिल रहा...” डिग्रीने विषय सफाईने फिरवत भायला सांगितले.

“उसकी फिक्र मत कर.. मैं देख लुंगा..” भायच्या इतक्या खात्रीपूर्वक शब्दांनी डिग्रीला थोडं आश्चर्यच वाटलं. पण भायने सांगितलेय म्हटल्यावर तो थोडा आश्वस्त झाला.

भायने डिग्रीला पुढच्या सर्व सुचना देत फोन ठेवला. त्याच्याशी बोलल्यावर डिग्रीमध्ये कमालीचा आत्मविश्वास आला. उलट एखादं लहान मुल गेम जिंकत असताना जसं खुश होतं अगदी तसाच आनंद त्याच्या चेहऱ्यावर पसरला होता. त्याच्या चेहऱ्यावरून भायने काहीतरी महत्त्वाचं असं त्याला सांगितलं होतं.

**********************************

आरीफदेखील त्यांच्यामागोमाग वॉशरूममधून बाहेर पडला होता. पण थोडासा घुटमळत त्याने मंदारला फोन लावत लॉजच्या दिशेने कुच केले. पलीकडून रिंग वाजत होती पण मंदार फोन उचलत नव्हता. खुन मदनने केल्याची जवळपास खात्री आरीफला झाली होती. म्हणून मंदार पुन्हा खुनाच्या आरोपाखाली फसण्याची शक्यता होती.

मनूला फोन करून इथली परीस्थिती सांगावी तर ती बिचारी आपला जीव धोक्यात टाकण्यासाठी इथे येईल, असा विचार करून आरीफने तिला काही सांगायचे टाळले. मंदारला कसंही करून शोधणे हाच एकमात्र उपाय होता ही सर्व कोंडी सोडवण्यासाठी..

त्याला शोधून परत मदन आणि डिग्रीवर वॉच ठेवणे देखिल निकराचे होते. साला.. मेरी लाईफमें सब झमेले एकसाथही आ जाते है.. पर इन सबमेंसे रास्ता तो बनाना ही पडेगा.. पर कैसे....?

काय करू काय नको या विवंचनेत आरीफने निश्चय केला आणि लॉजमधले एकेक करत ओळीने सगळया खोल्यांचे दरवाजे ठोठावू लागला. कुणीतरी वॉशरूमकडे जाऊन पोलिसांना फोन करायच्या आधीच आपण थोडी अफरातफरी निर्माण केली तर मंदारला वाचण्यास थोडा वेळ तरी भेटेल या आशेने आरीफने हे पाऊल उचलले होते.

*********************************

तिकडे एकाएकी बाहेर सुरू झालेल्या भगदौडीमुळे रूममधल्या प्रत्येकासमोर येणाऱ्या परीस्थितीत तग धरून राहण्याचे अथवा तिथून सुखरूप बाहेर पडण्याचे आव्हान निर्माण झाले होते. सर्वप्रथम तर बाहेर काय घडलंय याचा आढावा घेणं गरजेचं होतं.

“पोलीस सहजासहजी इथं येणार नाहीत... नक्कीच काहीतरी मोठा मॅटर असेल.. अश्या परीस्थीतीत आपलं असं इकडे थांबणं ठिक रहाणार नाही..” विक्रम मनूला समजावत म्हणाला.

“ते मलाही माहीत आहे.. बाहेर काय झाले असेल ते पहीले कळू दे.. तोपर्यंत जागचा हलू नकोसऽऽ.. नाहीतर आहेस तिथंच शेवटचा श्वास घेशील.. मंदार आणि तुझ्यात नेमके काय झाले होते त्याचीही मला सविस्तर माहीती दे.. “ मनू पिस्तूल त्याच्यावरून न हटवता दरडावत म्हणाली.

“सगळेच जर एकाच नावेत स्वार आहेत आणि नाव बुडणारच असेल तर एकमेकांशी वैर धरण्यात काय फायदा.. तुर्तास आपली दुश्मनी विसरून पुन्हा कधी आपापसात सामना करूच.. आता इथून सटकणं केव्हाही चांगलंच..” विक्रम अजूनही समजावणीच्या सुरात बोलत होता.

“वेट... तुला एकदा सांगून कळाले नाही का..? मनू त्रासत उद्गारली. आणि तिने मेहजबीनकडे पाहत इशाऱ्यानेच तिला बाहेर जाऊन पाहण्यास सांगितले.

मेहजबीन बाहेर जाण्यास उठली आणि एकदोन पाऊल पुढे आली पण दरवाज्याकडे पाहत तशीच थबकली. मनूला तिच्या नजरेत भीती दिसली म्हणून तिने त्या दिशेला पाहायला मान वळवली. पण हाय् रे... मनूला काही समजण्याच्या आतच तिच्या हातातलं पिस्तूल समोरच्या दणकट बाहूंनी हिसकावलं. तिचा पुढे आलेला हात खेचून पिळवटत त्या नराधमानं तिला आपल्या बकोटीला धरलं.

अंगातल्या काळया रंगाच्या पठाणीत इरफान भायचं भारदस्त शरीर एखाद्या परफेक्ट विलेनला साजेसं असंच होतं. त्याच्या हातातला तो जाडजूड कडा मनूच्या गालावर रूतत होता. आणि एव्हाना तर त्या कड्याने तिच्या गालावर लालसर रेघेचं आपलं अस्तित्व उमटवलंही होतं.

त्याच्या तावडीतून सुटकेचा मनू प्रयत्न करत होती. ह्याच्या.. तर.. साला कुठून कडमडला मध्येच येऊन काय माहीत.. त्याला हाताच्या कोपरानं मारण्याचादेखील तिनं प्रयत्न करून पाहीला.. पण छे.. सपशेल फेल.. त्याच्यावर काही असरच होत नव्हता. मनू हताशतेने विक्रमकडे पाहू लागली.

विक्रम मात्र जणू आतापर्यंत काही झालंच नाही अश्या आविर्भावात आपला ब्लेझर् हलकासा झाडत पुन्हा त्याच्या रिलॅक्स मूड आला. हम्म्.. मात्र यावेळी त्याच्या चेहऱ्यावर छद्मी हास्याची झलक होती.

"च्..च्..च्च.. बिच्चारी... तुला काय वाटलं, इतकं सहजसोपं असेल मला पकडणं आणि मारणं.. अगं इतका वेळ तर मी तुझ्याशी खेळत होतो बस्स्... हाहा.. दम आहे बाकी तुझ्यात... पण उतावीळ खुप आहेस तू.. तुला काय वाटलं मस्क्यासारखं सगळं सुरळीत आहे का.. हाऽऽहाऽहाऽऽ.. पण घाबरू नकोस मी कुणी सायको खुनी वगैरे नाही.. तुला माझ्यापासून काही धोका नाही.." विक्रम शांतपणे भिंतीला रेलून उभा राहत म्हणाला.

"जर एवढा शहाणा आहेस तर मग मघापासूनचे नाटक कश्यासाठी..." मनूने आश्चर्य व्यक्त करत त्याला विचारले.

"थोडीशी माहीती काढून घ्यायची होती.. बस्स्.. बाकी कुठला वाईट इरादा नव्हता.. चंदूला जाळयात ओढून इथे कोण येणार आहे तेच पाहायचे होते मला.. मी मंदारची अपेक्षा करत होतो, पण इथे तर तु आहेस..आता तुच मला सांग.. की तु मंदारला सामील आहेस की आणखीन काही.." विक्रमने धीम्या आणि सुस्तावलेल्या आवाजात म्हणाला.

मनू त्याच्या प्रश्नावर थोडा विचार करू लागली. मेहजबीनने परीस्थिती ओळखलो आणि ती तिकडून हालचाल करण्यास पुढे आली. पण चंदू तिला आडवा गेला. त्याच्या एका फाईटमध्येच ती बेडवर जाऊन पडली. यावेळी चंदूने जीव खावून मेहजबीनच्या चेहऱ्यावर मुक्का दिला होता. म्हणूनच त्या वेदनेनं ती तशीच पडून राहीली.

“तुम निकलो यहा से.. हम लोग इनको संभाल लेंगे.. मदन का फोन आया था.. बार में नसीर का खुन हो गया है.. और पुलिस को उस बात की खबर भी पड गई है. हमें इस चक्कर में फसने से पहले यहा से निकलना होगा..” भायने विक्रमला घाई करत निघण्यासाठी सांगितले.

भलेही त्यांच्यात अगोदर वाद झाले असले तरीही विक्रम हा इरफान भायचा क्लाईंट होता आणि म्हणूनच त्याला या प्रकरणात सेफ ठेवणं भायचं कर्तव्य होतं. इरफान भाई आपल्या धंद्यात पक्का होता. विक्रम आणि भाय दोघेही तिथं एकत्रच आले होते. फक्त कोणताही धोका उत्पन्न झाला की मदत म्हणून भाय मागे थांबला होता. आणि आता ऐनवेळेस रूममध्ये येऊन त्याने विक्रमचं पारडं जड केलं होतं.

“व्हाॅट्ऽऽ.. क्या कहा...? नसीर का खुन...? मतलब मंदार यही पर है.. उसे ढुंढो..” विक्रम तावातावाने ओरडला.

“उसकी जरूरत नहीं विक्रमसेठ.. अपना काम पुरा हो गया है.. मंदार अब बुरा फस गया है.. आज पुलिस उसको पकड ही लेगी..” भाय विक्रमला समजावत म्हणाला.

नाहीतरी विक्रमचा मोटो मंदारला मारण्याचा नव्हताच. त्याला फक्त मंदारची बदनामी आणि अटक हवी होती. आणि इरफान भायशी त्याने तश्शीच डिल केली होती.

“पण त्याला एवढी मोठी शिक्षा कश्यासाठी.. असलं कसलं वैर आहे तुमच्यात..” आतापर्यंत गप्प असलेल्या मनूने न राहवून विचारलं. तिच्या मनात मंदारबद्दल आपुलकी होती. आणि त्यामुळेच आता विक्रमबद्दल चीडही वाटत होती.

“व्हॉट् डू यू मीन् बाय् कश्यासाठीऽऽ...” विक्रमने खोचकपणे तिला उलट विचारले.

विक्रमने मौसमचा खुनी मंदारच असल्याचे तिला पटवून देण्याचा प्रयत्न केला. शिवाय त्याने नसीरच्याही खुनाचा दाखला दिला. जर आपण सगळे या रूममध्ये आहोत तर बाहेर नसीरचा खुन मंदारशिवाय करणार कोण.. असेही विक्रमने मनूला विचारले.

“अरे.. पण असं नाही होऊ शकत का, की नसीरला कुणी भलत्याच मॅटरमुळे मारलेय...” मनू मंदारची वकीली करत बोलत होती.

“काय प्रेमात पडलीस की काय त्याच्या.. (मनूकडे गांभिर्याने पाहत) हे.. वेट हा.. तुझा काय संबंध मंदारशी.. आणि कश्याचा एवढा पुळका.. मंदार काय चीज आहे ते मी चांगलंच जाणतो.. मला शंभर टक्के खात्री आहे की दोन्ही खुन त्यानेच केले आहेत...” मनूला समजावताना आता विक्रम त्रासला होता.

मनू मात्र अजूनही संभ्रमावस्थेतच होती.

“नहीं, मैं नहीं मानती के मंदार खुनी हो सकता है..” मनूच्या आवाजात खात्रीही वाटत नव्हती.

“तेरे मानने से सच बदलेगा नहीं लडकी..” इरफान भाई मनूच्या कानात पुटपुटला. त्याची तिच्यावरची पकड अजूनही मजबूत होती. तिला तसंच पकडून ठेवत त्याने पुढे बोलायला सुरूवात केली.

“मौसम के खुन के बाद मेरे आदमी वहा से पुलिस के साथ थाने गये.. उसके पहले पुलिसने मंदारके रूमकी तलाशी भी ली थी.. भले ही उन्हे कुछ छोटे-मोटे सबूत मिले हो, पर एक चीज उन्हें वहा नहीं मिली थी, न वो चीज मेरे आदमियों को मिली..”

मनू लक्षपूर्वक त्याचं बोलणं ऐकत होती. इरफान भाईचं बोलणं अजून संपलं नव्हतं.

“वो चीज थी पचास हजार रूपये..! जो हमने मौसम को एक दिन की एक्टींग के लिये दिये थे.. वो पैसे वहा किसिको नहीं मिले थे..” भाईने आवाजातला जोर वाढवत सांगितले.

“ह्ह्.. तेरेही आदमियोंने छुपाये होंगे.. या क्या पता तुम लोगों ने मौसम को उसके पैसे दिये ही नहीं हो..” मनू तुसड्यासारखं बोलून गेली.

पण तिचं बोलणं इरफान भायच्या जिव्हारी लागलं. हातातलं पिस्तूल तिच्या कानाजवळ दाबत तो जवळजवळ ओरडलाच.

"चूप कर.. तेरी बकबक यहीं बंद कर दुंगा.. इरफान भाई भले बेईमानी का धंदा करता हो.. पर अपने प्यादों का खयाल इमान से रखता है.. मेरे आदमी वहा से खाली हाथ पुलिस थाने गये थे.. जब के डिग्री ने मौसम को शाम को ही पैसे दिये थे.."

त्याच्या आवाजातला रोष मनूला एकदा त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडत होता. कदाचित तो खरे बोलत असावा. पण इथे कुणावर विश्वास ठेवायचा या विवंचनेत ती ही होती.

"भाय.. वहा से भागने में मंदार अकेला कामयाब हो गया था.. और इतनी जल्दबाजी में भी, खिडकी से कुदने से पहले उसने अपना बॅग उठाया था.." चंदूने आठवल्यासारखे सर्व सांगितले.

विक्रम त्यांचे बोलणे ऐकत आपल्या मनात एकएक संदर्भ जोडत होता. सरतेशेवटी त्याने तोंड उघडले. मनूकडे पाहत तो म्हणाला,

"मंदार और तेरे बीच क्या है, मुझे नहीं पता.. तु उसे कहा मिली..? क्यू..? तेरा तू जाने.. हम लोग यहा से निकल रहें है.. बचना है तो तू भी हमारे साथ आ सकती है.. और एक बात समझ ले, मंदार पर इतनी जल्दी भरोसा मत कर.."

विक्रमला मनूला बोलतं करायचं होतं. ती मंदारला कसे ओळखतेय वगैरे डिटेल्स् त्याला हव्या होत्या. पण इतक्यात तिच्यावर त्यासाठी दबाव आणणे घाईचे ठरले असते. म्हणूनच थोडं दमानं घेणं अत्यावश्यक होतं. त्यात विक्रम म्हणजे एखाद्या सायलेंट किलर प्रकारचा माणूस होता. कोणत्याही गोष्टीला डिपली ॲनलॅसिस

केल्याशिवाय तो आपले काम करायचा नाही. मनू आज नाही तर उद्या सगळं काही सांगेल याची खात्री त्याला होती. फक्त तिला अनुकूल तशी परीस्थिती निर्माण करणं आवश्यक होतं.

मनू थोडा विचार करून म्हणाली,

“जर मंदार इथेच आहे तर त्याच्याकडून खरंखोटं जाणून घेण्याचा आज माझ्याकडे चान्स् आहे, मी बारजवळ जाऊन एकदा पाहून येईन.. तुम्ही लोक जाऊ शकता..”

“और इसका क्या करने का..” विक्रमने चंदूकडे बोट दाखवत भायला विचारले.

“विक्रमसेठ, वो मेरा आदमी है.. मर जायेगा पर जबान नहीं खोलेगा.. पर ये लडकी को हम ऐसे छोड नहीं सकते.. अगर ये मंदार के साथ होगी तो आगे अपनी मुश्किले बढा सकती है..” भायने विक्रमला चंदूबाबत आश्वस्त केले पण मनूबद्दल शंका व्यक्त केली.

“छोड दो उसे.. वो मौसमके खुन का बदला लेना चाहती है.. और खुन मंदारने किया है तो मुझे इससे कोई खतरा नहीं.. तो फायनली वो मेरी औरतऽऽ.. अह्ह.. अह्ह.. (मुद्दामच खोकत) मतलब इनडायरेक्टली वो भी मेरा साथ ही दे रही है..” मनूकडे स्मितहास्य करत विक्रम म्हणाला.

मनूने त्याला फारसं भाव दिल्यासरखं न दाखवता भायच्या विळख्यातून सुटण्याचा प्रयत्न केला. विक्रमने भायला खुणावले तसे भायने तिला सोडले. मनूने बेडवर पडलेल्या मेहजबीनजवळ जात तिला सावरायला मदत केली. आणि एक जळजळीत कटाक्ष तिने चंदूवर टाकला. विक्रम तिच्या त्या कातिल नजरेवर हसला आणि खिश्यातून एक कार्ड काढून त्याने मनूजवळ बेडवर फेकले.

“कुछ जरूरत हो, तो याद कर लेना..” विक्रम एवढे बोलून तिथून निघाला. इरफान भाई आणि चंदूही त्याच्या मागोमाग गेले.

ते गेल्यावर मनू तिथून लगोलग निघण्याची तयारी करू लागली. बारमध्ये शक्य तितक्या लौकर पोहोचणे आवश्यक होते. मंदार जर खरेच खुनी असेल तर तो पळून जायच्या आधी त्याला गाठायला हवं. आणि जर तो खुनी नसेल तर बिच्चारा उगाचच पुन्हा नाही तिथे फसून जाईल. मनूला दोन्ही बाजूंनी विचार करावा लागत होता. कारण मंदार आणि विक्रम दोघांनीही तिच्या डोळ्यांत डोळे घालून आपापले सत्य सांगितले होते. आणि दोघांच्याही बोलण्यात खरेपणा वाटत होता. पण मुख्य बाब ही होती की दोघांचे सत्य एकमेकांच्या विरोधात होते. म्हणूनच नेमके कोण खरे बोलतेय याचा पडताळा करणे आवश्यक होते.

“मनू मुझे लगता है.. विक्रम सच कह रहा है.. वो हमें यहा मार भी सकता था पर उसने ऐसा नहीं किया..” मेहजबीनने तर्क लावत म्हटले.

“तुम अगर मंदार की बात सुन लेती तो उसके बारें में भी यही कहती.. मंदारभी मुझे और आरीफ को मार सकता था.. इतना तो मैं जानती हुं के वो दोनों एकजैसी सोच रखते है.. उनके बीच कुछ तो बडा कांड हुआ है..” मनू अजूनही गहन विचार करत बोलत होती.

अचानक आरीफबद्दल आठवून तिने त्याला फोन केला. त्याच्याकडून तिने नसीरच्या खुनाविषयी सगळी माहीती काढली. आरीफच्या म्हणण्याप्रमाणे नसीरचा खुन मदनने केला असल्याची दाट शक्यता होती. कारण बाथरूममध्ये मदनच पहीला दिसला होता. त्याच्यामागून डिग्री गेला होता. त्यांचं तिथं झालेलं संभाषण आरीफने तपशीलवार मनूला सांगितले. शिवाय पोलिस आल्याची अफवा आपणच उडवल्याचंही त्याने मनूला सांगितले.

“हुश्श्... म्हणजे पोलिस आले ही अफवा होती तर..” मनूने आरीफला विचारले.

“हा.. बिलकूल..पर तुम यहा कैसे..?” पलीकडून आरीफने काळजीपूर्वक विचारले.

“मुझे यहा आना पडा.. पर अच्छा ही हुआ.. नसीरका खुन हुआ वहा मंदार के कोई निशान या फिर वॉशरूम में कोई हरकत हुयी थी क्या..? तुम तीनों के अलावा और कोई वहा पर था या नहीं ये देखा था क्या..?” मनूने ऊत्सकतेने विचारले.

“शिट् मुझसे बहुत बडी गलती हो गई है... उस खुन के चक्कर में मैं तो बिल्कूल हक्काबक्का रह गया.. मैंने बाकी चीजों पर ध्यान भी नहीं दिया..” आरीफ पश्चात्ताप व्यक्त करत म्हणाला.

“अब वापस वहा मत जाना.. बाहर से ही कुछ पता चले तो देख लेना.. आरीफभाय, और भी बहुतसी बातें पता चली है.. सब मिलकर बताऊंगी.. फिलहाल बस आपको मंदारसे मिलकर उसके पास कुछ पैसे वगैरह है या नहीं ये पता लगाना है..” मनूने आरीफला मौसमच्या पन्नास हजार रूपयांबाबतची माहीती दिली.

**मनूने मंदारपासून हुशारीने वागण्यास सांगितले. त्याला डाऊट येईल असे काहीच आपल्याला करायचे नाही, शिवाय मनामध्ये त्याच्या प्रत्येक हालचालीवर डाऊट ठेवूनच तपास करायचा यासंबंधीच्या सुचनांची देवाणघेवाण करत आणि बार मध्ये आपण येत असल्याची खबर देत मनूने फोन ठेवला. तसेच तिने मेहजबीनचे आभार मानत तिला जबाबदारीतून मुक्त करत खाली जाण्यास सांगितले.**

# डॉमिनंट भाग नऊ

भाईने आपण बारमध्येच असून चंदूही सोबत असल्याची माहीती डिग्रीला कॉलवर अगोदरच दिली होती. शिवाय तिथून निघून ताबडतोब आपल्या घरी बोलावले होते.

इरफान भाईशी बोलून झाल्यावर डिग्रीने मदनला भायच्या घरी निघण्यास सांगितले. पण मदनने डिग्रीला जरूरी कामासाठी त्याला बाहेर जायचे असल्याचे सांगत तिथून भायच्या घरी डायरेक्ट येऊन भेटण्याचे नक्की केले. मदन डिग्रीला सांगून तेथून निघून गेला. डिग्रीच्या मनात मदनबाबत काहीसा गोंधळ असल्याने आणि आता भायही तिथून निघणार असल्याकारणाने नसीरच्या खुनाची खबर पोलिसांना देण्याचा विचार आला. आणि त्याने फारसा विचार न करता तसे लगेचच केले. तसेही पोलिस तिथं पोहोचेपर्यंत तो आणि इरफान भाय शिवाय चंदू तिथून निघाले असते.

इकडे मनूचा कॉल कट केल्यानंतर आरीफ घाईतच पुन्हा बारच्या वॉशरूमच्या दिशेला जायला निघाला. भलेही नुकतेच मनूने त्याला तिथे जाण्यास मनाई केली होती. तरीही त्याला लवकरात लवकर तिकडे जाऊन काही ना काही सुगावा लागतोय का.. ते पाहायचे होते. शिवाय मंदार खुनी असेल यावर त्याचा

अद्यापही विश्वास बसत नव्हता, किंबहुना त्याला ते पचवणं ही जड जात होते. म्हणुनच या बाबीचा पडताळा लावण्यासाठी तो पुन्हा तिकडे जात होता.

बारमधील वॉशरूमच्या दरवाज्याबाहेर पोहोचताच आरीफला आत कुणाच्यातरी उपस्थितीची चाहुल लागली. वॉश बेसिनच्या नळातून निघणाऱ्या पाण्याचा आवाज तिथल्या शांततेवर मात करू पाहत होता. आरीफने सावध होत दरवाजा उघडला. समोर मंदारच आपला चेहरा धुत होता. त्याने मागे वळून पाहीले. आरीफला पाहताच थोड रीलॅक्स होत त्याने पुन्हा आरश्यात पाहत आपले काम सुरू ठेवले.

थोडावेळ त्यांच्यात काहीच संभाषण झाले नाही. सन्नाट्याच्या धुक्यात विरलेली ती एक-दोन मिनिटे जीवघेणी ठरावीत अश्याप्रकारची होती. तेवढ्या कालावधीत आरीफने तिथलं शक्य तितकं सारं न्याहाळण्याचा प्रयत्न केला. आणि तिथल्या एकएक गोष्टींना छेदत त्याची बारीक नजर शेवटी खाली ठेवलेल्या मंदारच्या त्या मळकट निळया अमेरीकन टुरीस्टरवर पडली.

मंदारने आपली कॅप काढून त्या सॅकवर ठेवली होती. सॅकची मधली झिप् अर्धवट उघडलेलीच होती. पण त्या कॅपने त्यावर आच्छादनाचे रूप घेऊन फतकल मांडले होते.

काय करावे... एक चान्स् आहे.. ती कॅप बाजूला करून आत काही आक्षेपार्ह आहे की नाही ते पाहायचा.. पण कसे.. मंदार काय विचार करेल.. तो खुनी नसलाच

पाहीजे पण आपण त्याच्यावर शंका घेतोय हे पाहून त्याला कसे वाटेल..? किंवा जर खरेच तो खुनी असेल तर आपल्या या हरकतीने पिसळून उठला तर...?

आरीफ बारकाईने विचार करत पुढे होऊ लागला. आणि एकक्षण मागचापुढचा विचार न करता त्याने खाली वाकत ती कॅप उचलून आपल्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला. मंदार झटकन त्याच्याकडे वळाला आणि अर्धवट उघडलेल्या त्या सॅकच्या मधल्या कप्प्यात असलेल्या नोटांवर दोघांची नजर एकसाथ जाऊन विसावली.

“मंदारभायऽऽऽ....?” आरीफने दीर्घ श्वास घेऊन मंदारकडे पाहत एकाच शब्दात आपला प्रश्न विचारला. त्याचे डोळे विस्मयजनक अवस्थेत मोठाले झाले होते. जणू कल्पनेतही त्याला मंदार दोषी असल्याचे वाटले नसावे असेच काहीसे..

मंदार गप्प होता. त्याची नजर आरीफच्या नजरेपासून हटत दुसरीकडे जाऊन विसावली होती.

“ये मौसम के ही पैसे है ना.. मंदारभाय..” आरीफ अजूनही त्याच्यावर नजर रोखून होता.

“हा..” मंदारने शांतपणे उत्तर दिले.

“क्यूं.. मंदार..? यकीन नहीं होता के तूने ये सब किया होगा..” आरीफ पिसाटासारखा मंदारच्या कॉलरपर्यंत येऊन पोहोचला होता.

“एक मिनिटं ... ये सब मतलब..” मंदारने आरीफला आवरत विचारले. खरंतर आरीफ मंदारच्या तोडीचा नव्हताच. पण तरीही मंदार त्याला काही इजा करण्याच्या मूड मध्ये दिसत नव्हता.

“तू कहना क्या चाहता है, आरीफ..?” मंदार त्याच्यापासून नजर चोरत म्हणाला.

“यही के जिसका पता हम लगाने की कोशिश में थे.. वो तू है.. हा.. मौसम को तूनेही मारा है.. और इस बात का सबूत है.. ये पैसे... तू यहा पे आया था तब तेरे पास इतने पैसे नहीं थे.. तूने पैसों के लिये मौसम को मारा...” आरीफ तोंडात येईल ते भडाभडा बोलत होता.

आतापर्यंत जो आपल्या सोबत असल्याचं नाटक करत होता तोच खरा खुनी असावा, या विचारानेच आरीफच्या तळपायाची आग मस्तकात गेली होती. त्याच्या कल्पनेच्या अगदी विरूद्ध हे सर्व घडत होते, आणि म्हणूनच त्याचा पारा भलताच चढला होता.

“आरीफ, मैं मानता हुं ये मौसम के पैसे मैंने ही लिये.. पर मौसम को मैंने नहीं मारा..” मंदार आरीफला विश्वासात घेत सांगत होता.

“उस शाम किसी भी गलत इरादे से मैंने मौसम को नहीं बुलाया था.. मौसम मेरे कमरे में आई थी.. और उसके बाद मैंने उससे थोडीबहुत पुछताछ की थी.. मुझे लगा था, के वो भी उन सब लोगों को शामील हैं.. बस् इतनी सी बात थी.. पर मौसम

के कहने के अंदाज से मैं समझ गया के वो सिर्फ एक मोहरा थी.. इनफॅक्ट वो सारी बातों से अंजान थी.. दॅट्स इट्... इसके अलावा और कुछ नहीं था हमारे बीच.."

"फिर उसके पैसे तुम्हारे पास कैसे आये मंदारऽऽ..." आरीफ पुन्हा ओरडत विचारू लागला.

"वो पैसे मैंने पहले से ही मौसम के बॅग में देखे थे.. वहा से भागते वक्त मैंने सोचा, उसका खुन होने के बाद मैं अगर उन पैसों को ले लेता तो किसीका क्या नुकसान होता.. वैसे भी अंजान शहर में अगर मुझे छुपकर कुछ पता लगाना है, तो मेरे पास पैसों का होना जरूरी था.. अब तु ही सोच जब मैंने तुझे पैसे दिये तभी तो तुने मुझे इन लोगों की इन्फॉर्मेशन दी.." मंदारने सफाईदारपणे आरीफला समजावले.

"फिर भी मंदार.. अगर खुन तुमने नहीं किया था, तो तुम वहा से भागे क्यूं थे.. और नसीर का खुन..? तुम्हारा इस वक्त यहा पर होना.. ये सब यही बयान कर रहें है के कहीं न कहीं तुम शक के दायरे आ रहे हो... मुझे अब पुलिस को बीच में लाना ही होगा.. जो सच होगा वो बाहर आ ही जायेगा..." आरीफने बोलता बोलता आपला फोन बाहेर काढला आणि तो पोलिसांना फोन करू लागला.

पण त्याचा फोन लागण्याअगोदरच पोलिसांच्या जीपचा सायरन ऐकू येऊ लागला. यावेळी खरोखरच पोलिसांना कुणीतरी बोलावून घेतले होते.

पोलिसांच्या जीपचा सायरन ऐकून काहीश्या सुखावलेल्या आरीफच्या चेहऱ्यावरची खळी सेकंद-दोन सेकंदच टिकली आणि वॉशरूमच्या दरवाज्यातून वेगाने येणाऱ्या चाकूने त्याच्या उजव्या खांद्याचा वेध घेतला..

“या अल्लाह्....” आरीफच्या मुखातून शब्द बाहेर आले.

“आरीफ्ऽऽ.. त्याला सावरण्यासाठी मंदार पुढे आला.. घाव फारसा खोलवर नव्हता पण आरीफ तितकासा सशक्त नसल्याने घाबरूनच मूर्छित होऊ लागला. त्याच्या डोळयांसमोर त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात असलेला मंदार दिसत होता.

मंदार दरवाज्यापाशी धावला पण दरवाज्यातली ती व्यक्ती सुसाट पळत सुटली. मंदारजवळ पर्याय नव्हता.. त्याच्या मागून जाणे परवडणारे नव्हते. आरीफ जखमी होता आणि त्याला वाचवणे आद्यकर्तव्य होते. शिवाय पळालेल्या व्यक्तीबद्दल आता मंदारला थोडासा अंदाज आलाच होता.. म्हणूनच मंदार पुन्हा मागे फिरला.

मंदार खरेतर तिथं नसीरच्या खुनासंबंधी काही पुरावे मिळतील या आशेने तिथं आला असावा. पण नसीरची ती अवस्था पाहून त्यालाही बहुधा चेहऱ्यावर पाणी मारण्याची गरज भासली. आणि आता त्यात भर म्हणून आरीफही जखमी होता.

मंदार पुन्हा आरीफजवळ आला. आरीफला उठवण्याच्या प्रयत्नात असलेला मंदार त्याला उचलून बाहेर कॉरीडॉरपर्यंत घेऊन आला. बारच्या मुख्य बाजूकडून बाहेर निघण्याचं मनाशी नक्की करत मंदार आरीफला उचलून पुढे आला. तिथून निघताना आपली अमेरीकन टुरीस्टर घ्यायला तो विसरला नाही, पण हा त्या सॅकची

झिप लावणं मात्र त्याला त्या गडबडीत सुचलं नाही. तिथून खाली जिना उतरून जाण्याअगोदर त्याने पोलिसांचा अंदाज घेण्यासाठी आरीफला खाली जमिनीवर ठेवले आणि समोरच्या खिडकीपाशी जाऊन तो खाली पाहू लागला. खिडकी संपूर्णतः काचेची असून टाईल्सपासून माणूसभर उंचीची होती.

खाली नजर टाकताच त्याला तिथं पोलिस जीप दिसली. आणि तिच्यापाशी उभ्या असलेल्या एका कॉन्स्टेबलाला न्याहाळत त्याला कश्याप्रकारे चकमा द्यायचा याचा मनात ओबडधोबड आराखडा मंदारने तयार केला. एकंदरीत आरीफला वाचवायचे असेच काहीसे त्याच्या मनात होते. का.. ते त्यालाच माहीत.. .. कदाचित सध्यातरी त्याला आरीफसारख्या खबऱ्याची गरज होती. कारण काही असो पण उद्देश मात्र एकच होता की आरीफचा जीव वाचवायचाय.

*********************************

मनू मेहजबीनला बाहेर सुखरूप खाली घेऊन आली. आणि पुन्हा आत जाण्यासाठी म्हणून वळाली. वर बारचं प्रवेशद्वार ओलांडल्यावर तिनं वॉशरूमकडे लगबगीने प्रस्थान केले. मघाच्या गोंधळामुळे जवळपास बार रिकामा झाला होता. धावपळीत असलेल्या तिथल्या एका वेटरला तिने वॉशरूमकडे जाण्याचा मार्ग विचारला. त्या बिचाऱ्यानेही घाईगडबडीत हाताने इशारा केला आणि तो बारच्या

प्रवेशद्वारातूनच एक्झिट करत तिथून बाहेर पडला. मनूच्या मागोमाग पोलिसही वर वॉशरूमकडे पोहचत होते.

वॉशरूमचे उघडे दार दिसताच झटकन आत घुसणाऱ्या मनूला काहीतरी जाणवले म्हणून ती जितक्या वेगाने आत वॉशरूममध्ये शिरली तितक्याच वेगाने बाहेर येऊन तिने बाहेरील कॉरीडॉरच्या दुसऱ्या टोकाला पाहीले. आणि तिला खिडकीतून बाहेर पाहणारा मंदार दिसला. त्याच्या पाठीवर अडकवलेल्या बॅगमधले पैसे आणि खाली जमिनीवर चाकू लागून पडलेला आरीफ दिसताच मनू चवताळून उठली. आणि शक्य तितक्या जोरात धावत ती मंदारजवळ पोहोचली. मागून येणाऱ्या चाहूलीनं मंदारच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. मनूच्या टपाऽटप वाजणाऱ्या शूजचा आवाज त्याच्या कानी पडताच तो मागे फिरून पाहण्यासाठी वळाला. मंदारवर त्वेषाने धावून जाणाऱ्या मनूने मंदारची हालचाल तत्परतेने ओळखली आणि त्यानं पूर्णपणे वळून पाहण्याआधीच तिने हवेत स्वतःला झोकून आपल्या लाथांचा आधार घेत त्याच्यावर हल्ला केला. आघात ऐनवक्ताला झाला आणि मंदारचा तोल जाऊन तो काचेवर आदळला. क्षणात त्याच्या शरीरानं खिडकीच्या काचांना ठिकठिकाणी तडे गेले. काचांच्या तुकड्यांपासून डोळे शाबूत राहावेत म्हणून आपसुकच मंदारच्या डोळयांच्या पापण्या मिटल्या गेल्या. त्यातून स्वतःला सावरत कसाबसा मंदार गडबडत डोकं हलवत थोडासा पुढे सरकावा की मनूने पुन्हा संधी साधत उजव्या लाथेने त्याच्यावर प्रहार केला. यावेळी मंदारला सावरण्याचा वेळच नाही मिळाला. आणि तो पुन्हा काचांवर ढासळला.. अगोदरच

तडा गेलेल्या त्या खिडकीच्या काचा त्या धक्क्यानं पूर्णपणे निखळल्या आणि त्यातून तोल जाऊन बाहेर निघालेला मंदार सरळ पहील्या मजल्यावरून खाली पडत नेमका पोलिस जीपच्या बोनेटवर जाऊन पडला.

'धडाडऽडम्म्ऽऽ...'

एकच आवाज झाला. जीपला खेटून उभ्या असलेला कॉन्स्टेबलदेखील त्या हादऱ्याने दचकून गेला. वर बारमध्ये नक्की काय तमाशा चालू आहे ते पाहण्यासाठी खाली उभी असलेली दोन-चार टाळकी धावतच पुढे झाली. मंदार बराचसा घायाळ झाला होता. शरीरावर ठिकठिकाणी काचांचे बारीक वार होते. बोनेटवर आसपासही काचा विखुरलेल्या होत्या. नशिब म्हणून डायरेक्ट जमिनीवर न येता जीपच्या बोनेटवर पडल्याने हात-पाय शाबूत होते. पण त्याला फारशी हालचाल करता येणे शक्य होत नव्हते. तरीही मनातला दृढनिश्चय म्हणा की आणखी काही आपली अशी अवस्था करणारा कोण हे पाहण्यासाठी त्याने अलगद मान वर केली.

वर खिडकीपाशी मनू एक पाय पुढे करून आणि कंबरेवर हात ठेवून उभी होती. तिला पाहताच त्याला कळून चुकलं की विनाकारण मनूने त्याला अशी शिक्षा दिलीय. सालीऽऽ ही भवानी नको तिथे टपकली.. त्याच्या मनात साहजिकच असं आलं. तिच्या मागोमाग आलेल्या दोन पोलिसांपैकी एकानं वरूनच खालच्या कॉन्स्टेबलला फर्मान सोडलं.

"शेलार, उचलून जीपमध्ये घाल रे त्यालाऽऽ.."

'साल्यांनो.. जखमी आहे म्हणून.. न्हायतर एकेकाला धडा शिकवला असता आज...' मंदार मनातच बोलत होता. नाहीतरी सध्या त्याला तोंड उघडणंही अवघड जात होतं.

त्यानं मान तिरकस करत त्याला खाली उतरवण्यासाठी आलेल्या कॉन्स्टेबलला पाहीलं. कॉन्स्टेबल शेलारनेही त्याला आधार देत खाली आणलं आणि आत बसवण्यासाठी घेऊन जाऊ लागला.

वरती इन्स्पेक्टरने आरीफ जिवंत असल्याचे स्पष्ट करत ताबडतोब बाहेरच्या मेन रोडवर अॅम्ब्यूलसला यायला सांगितले, आणि आपल्या सोबतच्या दोन कॉन्स्टेबलला त्यांनी आरीफला तिकडे घेऊन जाण्याच्या सुचना दिल्या.

मनूच्या धाडसाचं कौतुक करत इन्स्पेक्टरने तिचं तिथं येण्याचं कारणही अलगद विचारले. पण मनूने तितक्याच सफाईने इन्स्पेक्टर साहेबांना काही वेळापूर्वी झालेल्या गडबड गोंधळामुळे आपण इथे आल्याचे सांगितले. त्यामुळे तिच्यावर शंका घेण्याचे कारणही उरले नाही.

मंदार जीपमध्ये मागच्या बाजूला पहूडला होता. कॉन्स्टेबल शेलार बाहेरच उभा होता. जमिनीवर पडलेला कसलासा कागद उचलण्यासाठी म्हणून शेलार खाली वाकला आणि मंदारची नजर समोरच्या गाडीवर गेली.

'राखाडी रंगाची काहीशी लांबट होंडा सिटी...'

मंदारला क्लिक झालं.. त्याला मौसमच्या खुनाची रात्र आठवली. अर्रर्र ही तर तीच गाडी आहे जी मौसमच्या खुनाच्या नंतर आपण झाडीत लपलेलो असताना समोर येऊन थांबली होती..

वाकलेला कॉन्स्टेबल शेलार पुन्हा मध्येच ताठ उभा राहील्याने मंदारला ती कार दिसेनाशी झाली. परीणामी तिच्याजवळ कोण जातेय कोण नाही याचा पत्ता लागु शकत नव्हता. त्यात मंदारला हालचाल करणंही अवघड झालं असल्याकारणाने तो बाजूला वाकूनही पाहू शकत नव्हता.

'च्याऽऽ... मारीऽऽऽ.... कुठून कडमडलंय हे कोण जाणे..' मंदारने मनातच शेलारला शिव्यांची लाखोली वाहिली.

पण मनातली ऊत्सुकता काही त्याला शांत बसून देत नव्हती. वर बारमध्ये गेलेले पोलिस नसीरच्या खुनाची पडताळणी करत असावेत बहुधा, नाहीतर इतक्या वेळात ते खाली असते. कसाबसं कुस बदलण्यासाठी मंदारने आपली उरलीसुरली शक्ती एकत्र केली आणि यावेळी तो सीटवरून खाली पडला. मंदारच्या अंगातून सरसरत वेदनेची कळ आली. पण तिला फारसं लक्षात न घेता तो त्या कारकडेच पाहू लागला.

कॉन्स्टेबल शेलार त्याच्या धडपडण्यानं आत जीपमध्ये लगबगीनं आला.

"एयं.. सुक्काळीच्याऽऽ.. कश्याला मरतयंस इकडून तिकडून..." मंदारला पुन्हा नीट सीटवर आडवं करत शेलार म्हणाला.

शेलार बाकी हट्टाकटटा तरूण होता, आणि त्याच्या भाषेच्या लहजावरून तो पक्का गावठी वाटत होता. जीपमधून बाहेर आल्यावर यावेळी शेलार दुसऱ्या बाजूला थोडा अंतरावर येऊन उभा राहीला.

हुश्श्... आता मंदारला समोरचे दृश्य विनाअडथळा दिसत होते.

मंदारने त्या कारवर नजर फिरवली. कारची समोरची बाजू त्याच्या अगदी समोरच होती. जवळपास पंचवीसतीस फुटांचं अंतर असावं मंदार आणि त्या कारच्या मधलं. बारकाईनं न्याहाळत असताना मंदारची नजर त्या कारच्या नंबर प्लेटवर गेली. आणि त्या नंबर प्लेटवरचा नंबर पाहून मंदारला अक्षरशः धक्काच बसला.

“MH05-CA-3156”

‘whaatऽऽऽऽऽऽ......’ नकळत मंदार मनातच ओरडला. त्या नंबर प्लेटवरचे ‘थ्री वन् फाईव्ह् सीक्स्’ त्याच्या डोळयांसमोर नाचत होते. हा कोड तोच होता जो डिग्रीने मंदारला इकडे बोलावताना सांगितला होता. शिवाय आरीफनेही रेल्वे फलाटावर हाच कोड पुटपुटला होता.

‘अरेऽऽ... पण ते सर्व जाऊ दे भो***ऽऽ... मंदारऽऽ.. डॅम्.. इट्ऽऽऽ.... तुझ्यासारखा मूर्ख माणूस मी आजपर्यंत कुठे पाहीला नाही... तू तो नंबर विसरू कसा शकलास... हा तोच आहे.. त्याने तुला सुरूवातीपासूनच हींट दिली होती. पण तु अतिशहाणपणामुळे तिकडे दुर्लक्ष केलेस... शीट्ऽऽ... भिकार्.. लक्षणं आहेत ही

तुझी...’ मंदार डोळे मोठे करून आणि दात एकमेकांवर आपटत स्वतःलाच मनात शिव्या घालत होता.

समोरच्या कारमधून थोडी हालचाल जाणवली. मंदार निरखून तिकडे पाहू लागला.

ड्रायव्हरसीटच्या बाजूचा डोअर उघडला गेला आणि पठाणीमधला एक धिप्पाड माणूस बाहेर पडला. तो मंदारकडे रोखून पाहत होता. पण मंदारची नजर अजून शांत नव्हती. काही क्षणांत उजव्या बाजूचाही डोअर उघडला गेला. त्यातून स्वतःचे केस ठिकठाक करत विक्रम रुबाबात बाहेर निघाला. तो मंदारकडे पाहत गालातल्या गालात हसत होता.

मंदारने कारचा नंबर पाहील्यापाहील्याच ते ओळखले होते, हा सर्व विक्रमचाच डाव होता. अतिशय थंड डोक्याने विक्रमने मंदारला पुरते फसवले होते. आणि ते ही हींट देऊन, मंदार त्याच्या हींट्स ओळखू शकला नाही. ती कार मंदारने याअगोदरही पाहीली होती. विक्रमच्या कारचा नंबर त्याला तोंडपाठ होता. पण तो नंबर आपल्याला सांगितलेल्या कोडशी मॅच होतोय हे त्याला सुरूवातीला लक्षात आले नाही. आणि आता वेळ निघून गेली होती.

इतक्यात वरून इन्स्पेक्टर, त्यांच्या सोबतचा एक कॉन्स्टेबल आणि मनू बाहेर आले. इतर दोन कॉन्स्टेबल अगोदरच आरीफला घेऊन मागच्या बाजूच्या मुख्य रस्त्याला गेले होते. ॲम्ब्यूलस तिथंच मुख्य रस्त्यावर बोलावून घेतली होती.

इन्स्पेक्टर साहेब जीपच्या मागे येऊन मंदारला न्याहाळू लागले.

“काय पैलवान, दोन खुन आणि एक हाल्फ मर्डर्... कसं वाटतंय आता.. आता बाराच्या भावात गेलास म्हणून समज..”

मंदारनं यावर काहीच प्रतिसाद दिला नाही, तो इन्स्पेक्टरपासून नजर फिरवून विक्रमकडे शुन्य भावाने पाहत होता. मनूनेही मंदारसमोर जाणे पसंद केले नाही. तिचं लक्ष विक्रमकडे गेले. विक्रम शांतपणे मंदारला पाहत पुन्हा रुबाबात गाडीत बसला. इरफान भाई देखील ड्रायव्हींग सीटवर बसला. गाडीचा दरवाजा बंद होण्याचा आवाज लांबूनही मंदारला स्पष्ट ऐकू आला. आणि रिव्हर्स गिअर टाकून जाणाऱ्या विक्रमच्या गाडीकडे मंदार हताशतेने पाहू लागला.

# डॉमिनंट भाग दहा

पोलिसांच्या जीप निघाली आणि थंडगार वाऱ्याच्या झुळकीमुळे अगोदरच घायाळ झालेला मंदार थकून आपले सर्वांग सैल सोडून भूतकाळ आठवू लागला.

विक्रमचे त्याच्या गावात येणं, त्याच्याशी झालेली दोस्ती.. विक्रमची श्रीमंती आणि रूबाब यांनी तर मंदारवर सुरुवातीपासूनच भुरळ घातली होती. त्यात समाजसेवेच्या नावाखाली असलेले विक्रमचे काळेधंदे मंदारला माहीत पडले होते. शिवाय गावोगावी स्त्रीयांच्यासाठी चालवण्यात येणाऱ्या एन् जी ओ ला मिळणाऱ्या पैश्यात विक्रमचा हिस्सा ठरलेला असायचा. या सर्व बाबींचा जाब मंदारने विक्रमसमोर बेधडकपणे विचारला होता. मुळात निडर असलेला मंदार म्हणजे विक्रमसाठी एक आयतीच संधी होती. त्याने शांत डोक्याने मंदारला पैसा दाखवत आपल्या बाजूने वळवून घेतले होते. मग काय तिथून पुढे मंदार जणू विक्रमचा उजवा हातच बनला होता.

अवघ्या वर्षभरात फक्त कोल्हापूर आणि आसपासची पंचक्रोशीच नव्हे , तर मंदार विक्रमसोबत काम करत करत पुण्यापर्यंत पोहोचला होता. आणि हळूहळू

विक्रमचा उजवा हात असलेला मंदार त्याचा जिगरी दोस्त झाला होता. विक्रम मंदारच्या चलाख आणि तल्लख बुध्दीवर जाम खुश होता. एन जी ओ च्या नावाने भल्याभल्या दानविरांकडून मंदार आर्थिक मदत मिळवत असे, त्याची एखाद्याला आपलंसं करून घेण्याची पद्धत, आकर्षक देहबोली, एखादी योजना समोरच्या व्यक्तीला समजावताना त्याची पडणारी छाप या बाबी तर विक्रमसाठी जमेच्या होत्याच. शिवाय त्याच्या अंगातली ताकदही ऐनवक्ताला कामी येण्यासारखी होती. आणि म्हणूनच आपल्या फायद्यासाठी म्हणून का होईना विक्रमने मंदारला दोस्त बनवले होते.

मंदारसोबत मुंबईमध्ये सुद्धा आपला बिझनेस वाढवायचे विक्रमच्या मनात होते. पण ऐनवेळेस हिश्श्यावरून झालेल्या वादातून त्या दोघांत कमालीचे वैमनस्य निर्माण झाले आणि सर्वकाही फिसकटले. मंदारच्या मते तो करत असलेले काम आणि त्या बदल्यात त्याला मिळणारा मोबदला फार कमी होता.

आपण सगळी मेहनत करून माल मिळवायचा आणि वरून विक्रम आपल्याला त्याच मालातले परसेन्टेज देणार... व्हॉट् इज् दी लॉजिक इन दिस्..

मंदारने विक्रमला याबाबत विचारत निम्मी पार्टनरशीप मागितली. विक्रमने तेव्हा शांत डोक्याने विचार करत त्याचा प्रस्ताव धुडकावून लावला होता. खरेतर विक्रमने त्याला पन्नास टक्के दिलेही असते पण मंदारसारखा माणूस पुढे जाऊन त्याला महागात पडला असता. विक्रमने मंदारला समजावण्याचा पूर्ण प्रयत्न करून

पाहीला. पण मंदार त्याच्या जागी योग्य होता. वास्तविक पाहता विक्रम मंदारला फक्त कॉन्टॅक्ट्स् आणून द्यायचा पण बाकी सगळी कामं तर मंदारच करायचा.

विक्रमने दिलेला नकार मंदारच्या जिव्हारी लागला होता. विक्रमसारखी लाईफस्टाईल त्याला कसेही करून हवीच होती. पण एकंदरीत आता ते शक्य नव्हते. म्हणूनच 'मी नाही तर तो पण नाही' या मनुष्यस्वभावाप्रमाणे मंदारने विक्रमचे कारनामे प्रथम स्वतःच्या गावात उघडकीस आणले, शिवाय गावातल्या महीलांसोबतचे विक्रमचे वर्तन चुकीचे असल्याच्या खबरी गावभर पसरवत त्याने विक्रमला बदनाम करून सोडले. त्याचाच परिणाम म्हणून एक दिवस चवताळलेल्या गावकऱ्यांकडून विक्रमला बेदम चोप पडला होता. विक्रम त्यामुळेच मंदारवर जाम संतापला होता.

एवढेच करून मंदार थांबला नाही, तर त्याने त्याला माहीत असलेल्या विक्रमच्या सर्व जागा, त्याचा कच्चाचिठ्ठा बाहेर काढत पोलिसांना दिला. परीणामी ठिकठिकाणच्या पोलिस ठाण्यात विक्रमवर विविध गुन्हे दाखल झाले होते. विक्रमने एवढ्या वर्षात जमा केलेल्या संपत्ती आणि इज्जतीवर मंदारमुळेच पाणी पडले होते. मनात मंदारबद्दल प्रचंड राग असूनही विक्रमने मंदारविरूद्ध कुणासमोरही 'ब्र' काढला नव्हता.

पोलिसांची जीप गचका देऊन थांबली तसा मंदार भानावर आला. मागे बसलेल्या दोन हवालदारांनी मंदारला आधार देत बाहेर काढले. मंदार अजूनही पळून जाण्याच्या स्थितीत नव्हता. त्याने समोर नजर फिरवली आणि पाहतो तर समोर

सरकारी इस्पितळ होते. इन्स्पेक्टरने मागे येत हवालदारांना मंदारला आत घेऊन येण्याच्या सुचना दिल्या. मंदार त्या दोघांच्या आधाराने हळूहळू आत जात होता. पडणाऱ्या एकेका पाऊलासोबत त्याची नजर सभोवतालच्या हरएक गोष्टी न्याहाळत होती. बाहेर पडण्याचे कोणकोणते मार्ग असू शकतात वा कोणकोणते अडथळे पार करावे लागतील यावर मंदारच्या डोक्यात विचार सुरू होते.

पुढे गेलेल्या इन्सपेक्टरने सर्व तजवीज केल्याच्या आविर्भावात हवालदारांना पुढील बाबींची माहीती दिली. आणि काही वेळातच मंदार इस्पितळाच्या एका खोलीत बेडवर पहुडला होता. बाहेर पाळत ठेवण्यासाठी म्हणून तेच दोन हवालदार होते ज्यांनी त्याला तिथे आणले होते. इन्स्पेक्टर साहेब सगळी फॉर्मॅलिटी पूर्ण करून निघून गेले. मंदारला उपचाराची आवश्यकता होतीच. अंगात ठिकठिकाणी घुसलेल्या काचा आणि इतक्या वरून पडल्यामुळे लागलेला मार व त्याच्या वेदना त्रासदायक होत्या. पण त्या अवस्थेतही मंदारची नजर आणि डोकं ताळ्यावर राहून आपले काम चोख बजावत होते. एकंदरीत इस्पितळात आत प्रवेश केल्यापासून ते त्या बेडवर येईपर्यंतच्या प्रत्येक गोष्टीवर मंदारने बारीक ऑब्झरवेशन केले होते. आणि एक-दोन दिवसांत बरे झाल्यावर तिथून बाहेर पडण्याचा मार्ग कसा काढायचा यावरच त्याचा मेंदू आपली शक्ती खर्च करत होता. शिवाय बेडवर पडल्या पडल्या दुसरे काही कामही तर नव्हते.

**********************************

मंदारला घेऊन पोलिस गेले तसे मनू बारपासून घरी जाण्यासाठी निघाली. पोलिसांकडून तिने आरीफला घेऊन गेलेल्या ॲम्ब्यूलस आणि हॉस्पिटलचीही माहीती घेतली होती. दुसऱ्या दिवशी त्याला भेटायला जायचे मनाशी ठरवून मनू मुख्य रस्त्यावर आली आणि ऑटो रिक्षाची वाट पाहू लागली. तितक्यात तिथं विक्रमची कार येऊन तिच्यासमोर थांबली.

“काय मग.. तुझा गुन्हेगार पोलिसांच्या हवाली झाला ना..” विक्रमने कारची काच खाली करत मनूला हसत विचारले.

“हो.. पण अजून मन शांत नाही आतून... हे सगळं कश्यासाठी आणि का..? तेच मला कळालं नाही अजून...” मनू उत्तरली.

“सोड गं ते.. आता काय त्याच गोष्टीवर पुन्हा विचार करायचा.. तुझा गुन्हेगार भेटला बास्स्.. मग अजून काय हवेय.. येशील का माझ्यासोबत.. हम्म्.. ॲज अ फ्रेंड विचारतोय हा.. नाहीतर तु पुन्हा तुटून पडायचीस माझ्यावर...” विक्रम घाबरण्यासारखं करत म्हणाला.

“तुझ्यासोबत.. कश्यासाठी.. आय् मीन्.. तु अजूनही अनोळखी आहेस मला.. मग फ्रेंडशीप कसली... आणि कश्यावरून तुझ्यासोबत जाणं माझ्यासाठी सेफ राहील..” मनू त्याच्या कारच्या विंडोवर हात ठेवत विचारू लागली.

विक्रमला खरेतर मनू आवडली होती. आणि त्यासाठीच तिच्यासोबत मैत्री करण्याचा त्याचा विचार होता. पण डायरेक्ट तसं काही बोलणं त्याला ठिक वाटलं नसावं.

“आणि तुझ्या मनातली अशांतता मी दूर करू शकलो तर...” विक्रम काहीसा विचार करत म्हणाला.

मनू त्याच्या उत्तरावर रागानं लाल झाली, तिची बॉडीलॅंग्वेजही झटक्यात बदलली. विक्रमने ते ओळखले. मनू काही उलटून बोलणार इतक्यात तिला शांत करत विक्रम म्हणाला..

“हेय... आय् मीन् टू सेय.. की तु मघाशी म्हणालीस ना.. की अजून मन शांत नाही आतून.. म्हणून तुला मंदारविषयी सर्व माहीती मी सांगू शकतो.. असं म्हणायचं होतं मला...” विक्रमने अतिशय चलाखीने मनूवर डाव टाकला.

विक्रमच्या तश्या खुलाश्यानं मनूही एकक्षण विचार करू लागली. आणि त्याला नाही म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

“चल मग.. पण रात्री मला घरी ड्रॉप करावं लागेल..आणि बेटर यू थिंक अगेन्... काही चुकीचं करण्याचा प्रयत्न झाला.. तर मी जीव द्यायला आणि घ्यायलाही कमी करणार नाही...” मनू विक्रमसोबत जायला तयार तर झाली पण तिनं अगोदरच त्याला वॉर्नही केलं.

“तशी वेळही येणार नाही मॅडम... चला बसा, आपल्यासाठी मी स्वतः ड्रायव्हींग करतो...” विक्रमने असं बोलत इरफान भाईला खुणावले. इरफान भाई आणि चंदू कारमधून उतरले. आणि मनूला सोबत घेऊन विक्रम निघून गेला.

रस्त्यावर अंधार पसरलाच होता. मागून येणाऱ्या धावत्या रिक्षाला हात करत चंदूने थांबण्याचा इशारा दिला. काहीश्या वेगात असलेली ती रिक्षा थोडी पुढे जाऊन थांबली. रिक्षावाल्याशी जाण्याचं ठिकाण निश्चित करत चंदू आणि भाई रिक्षात बसले. रिक्षा पुन्हा सुरू होत वेगाने पुढे धावू लागली आणि मागून कुणीतरी पुकारत असल्याचा भास झाला. थोडं आणखी पुढे गेल्यावर भाईला पुन्हा त्याच्या नावानं जोरात पुकारल्याचा आवाज आला आणि भायने मागच्या बाजूला बाहेर डोकावत पाहीलं.

डिग्री मागे रस्त्यावर असहाय्य अवस्थेत दोन्ही हात उंचावत हलवत उभा होता. प्रथमदर्शनी तर त्याची कुणाशीतरी मारामारी झाल्याचे भासत होते. भायने तत्काळ रिक्षा थांबवायला सांगितले. रिक्षा पूर्णपणे थांबण्याची वाट न बघताच भाय आणि चंदू त्यातून खाली उतरत मागे डिग्रीच्या दिशेने धावले. मागून रिक्षावाला त्यांच्या नावाने ओरडू लागला पण तिकडे लक्ष देण्याची तसदी भाय आणि चंदू दोघांनीही घेतली नाही.

डिग्रीने भायला उतरताना पाहीले. इरफान भाई त्याच्याकडे धावतच येत होता. चंदूही डिग्रीकडे पाहत धावत होता. डिग्री हळूहळू खाली वाकत जमिनीवर कोसळला आणि त्याच्या पाठीत घुसलेला सुरा इरफान भाई आणि चंदूला दिसला.

खाली पडल्यावर डिग्रीने एकक्षण मान वर करून त्यांना पाहीले आणि भाईला पुकारत पुकारत त्याने शेवटचा श्वास घेत डोळे उघडेच ठेवत प्राण सोडला.

डिग्रीजवळ पोहोचताच भाईने त्याला हलवून पाहीले, त्याच्या अंगावरच्या जखमा तो तपासू लागला. चंदूही झाल्या प्रकारानं मनातून घाबरला होता. तरीही भाय सोबत असल्याने थोडंफार हायसं वाटत होतं. चंदू आसपास पाहू लागला, कुणी पळताना दिसतयं का.. वा कुणी डिग्रीचा खुन होताना पाहीलंय का.. पण छ्या... नुकतेच तिथे पोलिस येऊन गेले होते. म्हणून आसपास कुणीच दिसत नव्हतं. सगळे चोरचकार, उच्चके, खबरी अगोदरच तिथून पांगले होते.

"भाय्... अगर मंदार को पुलिस ले गई.. तो डिग्री को किसने...." चंदूच्या प्रश्नात साफ चिंता दिसत होती.

त्याच्या प्रश्नानं भायचा चेहराही काहीसा चिंताग्रस्त झाला. भायनं लगेच सावरत विक्रमला फोन केला आणि सविस्तर वृत्त कळवले. मंदारशिवाय हे कोण करू शकत होतं. आता प्रश्न खरोखरच गंभीर होत चालला होता.

*********************************

भायने सांगितलेल्या न्यूजने विक्रमलाही धक्का दिला. आता हा कोण नविन दुश्मन आला आणि त्याचा डिग्रीला मारण्याचा काय उद्देश असावा. गाडी चालवत विक्रम विचार करू लागला आणि त्याला कळाले की बाजूच्या सीटवर मनू त्याच्याकडेच पाहत होती.

“डिग्रीचा खुन झालाय आताच.. तिथंच.. त्याच बारजवळ...” विक्रम मनूला म्हणाला.

“काय.. कसं शक्य आहे हे... एक मिनिट.. म्हणजे मंदार खुनी नाहीयं तर.. हो ना... तु कार मागे फिरव...” मनूलाही तो धक्का पचवणं काहीसं अवघड जात होतं.

“अगं.. हो... काल्म् डाऊन्... डिग्री म्हणजे कुणी जवळचा सख्खा वगैरे नाही हा माझा... आणि गाडी मागे फिरवणं मुर्खपणाचं ठरेल.. ऑलरेडी तिथं क्राईम प्लेस् आहे आणि त्यात आणखी एक खुन.. इट्स नॉट अ जोक्..” विक्रम थोडा जोर देत म्हणाला.

“हम्म्.. आय थिंक यु आर् राईट्... बट्... खुनी कोणीतरी दुसरा नक्कीच असण्याची शक्यता नाकारता येत नाही...” मनू म्हणाली.

अश्या प्रसंगीही विक्रमच्या थंड डोक्याने विचार करण्याच्या खुबीचे मनूला कुतुहल वाटले.

“शक्य नाही... मौसमला आणि नसीरला मंदारनेच मारलेय.. हा.. डिग्रीचा खुन कुणी जून्या वैरातून केला असू शकतो..” विक्रम शांतपणे म्हणाला.

“तू असा कसा रे.... एकदा पडताळून पाहू तरी शकतो आपण.. जर हा तोच खुनी असेल आणि मंदार दोषी नसेल तर्....” मनू आता विक्रमवर वैतागली.

त्यांची कार कल्याणमधल्या खडकपाड्यातील विक्रम राहत असलेल्या टॉवरखाली येऊन थांबली. गाडी पार्कींगकडे वळवत विक्रम म्हणाला...

“चल तुला जे ऐकायचे आहे ते सर्व सांगतो...”

मनू विक्रमसोबत त्याच्या फ्लॅटवर जाऊ लागली. लिफ्टमध्ये दोघांनीही चकार शब्ददेखिल काढला नाही. काही क्षणांतच मनू विक्रमसोबत त्याच्या घरी सोफ्यावर विराजमान होती. विक्रमही तिच्यापासून काही अंतरावर असलेल्या चेअरवर शांत बसला होता.

विक्रमने सांगायला सुरूवात केली...

चार वर्षांपूर्वी मंदारने दगा दिल्यानंतर विक्रम गपचूप कोल्हापूरहुन निसटून मुंबईला रवाना झाला होता. पूर्वी जमा केलेला पैसा, बिझनेस सगळं मंदारमुळेच मातीत मिळालं होतं आणि मग आपले थोडेफार कॉन्टॅक्ट्स् आणि स्वतःच्या कुशाग्र बुद्धीचा वापर करत त्याने चार वर्षांतच ठाणे परीसरात विविध प्रकारच्या दोन नंबरच्या धंद्यात आपले बस्तान बसवले. पण यावेळी तो प्रत्येक धंद्यात

गुमनाम राहीला. मिळणाऱ्या सर्व मिळकतीचा कारभार पाहण्यासाठी त्यानं सुरूवातीच्या काळातली आणि विश्वासातली माणसं ठेवली होती. अशी माणसं जी स्वतः त्याला प्रत्यक्ष न भेटताही त्याच्यापर्यंत सगळा माल पोहोचता करायची.

ती मोजकीच माणसं वगळता इनफॅक्ट सध्यस्थितीला त्याच्या स्वतःच्या एखाद्या धंद्यातला कोणताही व्यक्ती प्रत्यक्ष विक्रमला भेटला नव्हता. तशी एकप्रकारची चैनच विक्रमने बनवून ठेवली होती. मंदार प्रकरणापासून धडा घेतच त्यानं खबरदारी म्हणून तसं केलं होतं. शिवाय कुठल्याही कारणाने जर त्याचं नाव लीक् झालं असतं तर अगोदरच्या गुन्ह्यांचा शोध घेत पोलिस त्याच्यापर्यंत लगेचच पोहचू शकत होते. म्हणूनच विक्रम ताकही फुंकून प्यायल्यागत सदैव चौकस असायचा.

मंदारलाही तो विसरला नव्हता. म्हणून मंदारसमोरही त्याचं नाव पुन्हा कधी जाणं सोईचं नव्हतं. मंदारचा वचपा काढायचाच असा चंगच जणू विक्रमने बांधला होता. तो अगोदरही तसं स्पष्ट करू शकला असता. जेव्हा मंदारने त्याची गुपितं उघडली होती तेव्हा मंदारवरही प्रत्यारोप करण्याचा चान्स् विक्रमकडे होता. पण नाही, विक्रम अगोदरच सांगितल्याप्रमाणे सायलेंट किलर प्रवृत्तीचा माणूस होता. त्याला मंदारला एखाद्या मोठ्या प्रकरणात गुंतवायचे होते. म्हणूच त्याने चार वर्षे वाट पाहीली. पुन्हा स्वतःचा एक बेस् निर्माण केला. आणि मंदारला जाळयात ओढण्यासाठी त्याने हळूहळू फासा बनवायला सुरूवात केली.

मंदार अगोदरपासूनच डिटेक्टीव्हगिरीचा शौकीन असल्याचे विक्रमला ठाऊक होते.

“मला माहीत होते.. तो मूर्ख जाहीरात वाचून एका पायावर इकडे यायला तयार होईल ते.. म्हणे डिटेक्टीव्ह... साधी चौकशी केली नाही नेटवर.. वा विचारही केला नाही की इथली जाहीरात कोल्हापूरमधल्या त्या फडतुसड्या गावातल्या भिक्कार सलून बाहेर कुणी का लावेल.. त्याला नाहीतरी दुसऱ्याच्या चहाड्या करण्याची सवयच होती. आणि सलून शिवाय अश्या रीकाम्या लोकांना गावातल्या खबरी कुठून मिळणार.. मग तो तिथंच सलूनजवळ पडून असण्याचा माझा अंदाजही खरा ठरला...”

मनू लक्षपूर्वक विक्रमचे बोलणे ऐकत होती. विक्रमने जे काही घडवून आणले ते खरोखरच वाखाणण्याजोगे होते.

“या कामासाठी मी माणसंही भाड्याची निवडली. अशी माणसं ज्यांचा माझ्याशी प्रत्यक्ष असा काही संबंध असणार नव्हता... शिवाय मला एकदम प्रोफेशनल टाईप माणसं नको होती, मला थोड्याफार चुका करणारी आणि मंदारला ‘क्लू’ देऊ शकत असलेलीच माणसं हवी होती.. एका दमात सावजाची शिकार करण्यात काय मजा.. त्याला खेळवून खेळवून मारण्यातच खरा आनंद मिळतो. शिवाय त्याला थोडी डिटेक्टीव्हगिरी करण्याची संधीही मला द्यायची होती. माझ्या अंदाजाप्रमाणे मंदारही काही प्रोफेशनल डिटेक्टीव्ह नव्हता म्हणूनच त्याची मजा घेत त्याला अडकवणं मला आवडलं.. आणि म्हणून मी इरफान भाईला आमंत्रण दिलं, त्याची

माणसं नाही त्या वेळी बऱ्याचदा चुकलीत.. पण तरीही तो ठोंब्या ओळखू शकला नाही.. की हे सगळे त्याला अडकवण्यासाठी चालू आहे.. हाऽहाहाऽऽऽ...” विक्रम बोलता बोलता मंदारच्या मूर्खपणावर हसत सुटला.

मनू अजूनही मध्ये काहीही न बोलता ऐकत होती.

“त्याने माझे सर्व गुपित बाहेर तर काढलेच.. पण मी न केलेल्या गुन्ह्याबद्दलही मला शिक्षा मिळाली.. मी कधीच कुणा बाईशी लगट करण्याचा प्रयत्न केला नाही, पण तरीही मला सगळ्या गावकऱ्यांनी मिळून मारले.. खुप मारले... काय करणार ना... मी एकटा... चुपचाप मार सहन केला.. पण विचार मनाशी पक्का करतच... सुड तर मी घेणारच.. काहीही करून... कसंही... माझ्यावर उगारलेला एक एक हात मी लक्षात ठेवला...”

“माझं नाव त्याने स्त्रीयांसोबत जोडले म्हणूनच त्याचं नाव मी किन्नराच्या सोबत जोडण्याचा प्लॅन केला आणि पहा.. आज तो प्लॅन सक्सेसफुल झालाय... उलट आतातर त्याच्यावर त्या मौसमच्या हत्येचा गुन्हाही दाखल झालाय.. न्यूजपेपर, टिव्ही सगळीकडे त्याची बदनामी झालीय.. शिवाय गावात आता त्याला तोंड दाखवायचीही शरम येईल असंच काहीसं त्याच्या गावात वातावरण आहे..”

विक्रमने मंदारबद्दल मनूला सर्वकाही सांगितले. मनूनेही त्याला मध्ये कोठेही न थांबवता ऐकून घेतले. खरंतर मौसमला या प्रकरणात गुंतवण्यात विक्रमच कारणीभूत होता. म्हणूनच मनूच्या मनात आता त्याच्याबद्दल प्रचंड चीड निर्माण

झाली होती. पण तिनं तसं काही चेहऱ्यावर येऊ दिलं नाही. विक्रम शातीर खिलाडी होता. आणि त्याच्यासाठी स्पेशल अशी वेगळी खेळी करण्याची गरज होती. विक्रम असो वा मंदार दोघेही कायद्याचे गुन्हेगार होतेच कारण दोघांनीही भूतकाळात गुन्हे केलेच होते अथवा सध्याही करत होते. मनू गंभीर मुद्रेत विचारमंथन करत होती.

"मनू, मी मंदारप्रमाणेच माझ्याबद्दलही तुला सगळं सांगितलंय.. काही म्हणजे काही लपवून नाही ठेवलं.. मी माझ्यावरचे गुन्हे तुझ्यासमोर फेटाळू शकलो असतो. पण मी एक अन् एक गोष्ट तुझ्यासमोर उघड केली.. यामागे खरंतर तसं कारणही आहे.. ते मात्र मी तुला आता नाही सांगू शकत.." विक्रमच्या चेहऱ्यावर समाधानकारक भाव होते.

मनूने ताबडतोब त्याच्या बोलण्यातला भाव ओळखला पण तिने त्याबद्दल खोदून विचारण्याचे टाळले. पण काहीश्या संभ्रमावस्थेतच तिने त्याला विचारले.

"पण विक्रम.. यावरून मंदार मौसमचा खुनी असेल, हे सिद्ध कुठे होतेय...?"

"मनूऽऽ.. मंदारची एवढी पाठराखण का.. तो क्रिमिनल होता आणि आहे.. तुला माझ्यापेक्षा तो जवळचा वाटतो का.." विक्रम बोलून गेला खरं, पण मग काहीसा शरमला.

"प्रश्न पाठराखण करण्याचा नाहीच मुळी विक्रम.. मला फायनली ट्रूथ पर्यंत पोहोचायचे आहे.. आणि जरी तो क्रिमिनल होता किंवा असला तरी तूही तर आहेसच

की.. आणि त्याला गुन्हे करायला तुच शिकवलंस, नाही का..?” मनू रोखठोक त्याच्या डोळयांत डोळे घालून विचारले.

तिच्यापासून आपली नजर फिरवत विक्रमने गप्पच राहणे पसंद केले.

“सध्यातरी मला मंदार अथवा तू दोघेही जवळचे नाहीत, मला थोडी वाट पाहावी लागेल..” मनूने विक्रमच्या मघाच्या प्रश्नाचे उत्तर चलाखीने आता दिले होते.

“टेक् युअर टाईम् बेबी... तुला कळलेच आहे की मला काय विचारायचे होते तर मी तुला अडवणार नाही.. तुझा जो काही निर्णय होईल मला मान्य असेल.. मग आता पुढे काय...?” विक्रमने शांतपणे तिला विचारले.

“पुढचं जाऊ दे.. आता मला सॉलीड भूक लागलीयं.. मला ड्रॉप कर चल आणि वाटेत काही डिनरची काही व्यवस्था करणार आहेस की नाही तू.. की उपाशीच जाऊ...” मनूने वैतागल्याची ॲक्टींग करत म्हटले.

“ॲट् युअर सर्व्हिस् मॅम्....” विक्रमने क्षणाचाही विलंब न करता टी पॉय वर ठेवलेल्या कारच्या किल्ल्या उचलून बोटांत गरागरा फिरवत रेडी झाला.

काही वेळातच मनू आणि विक्रम तिथल्याच एका रेस्टॉरंटमध्ये डिनर करत बसले होते.

# डॉमिनंट भाग अकरा

दुसऱ्या दिवशी उन्हं पडायच्या आतच मनूची स्वारी आरीफला भेटण्यासाठी तो ज्या हॉस्पिटलमध्ये होता तिकडे वळाली. काल रात्री मोठ्या मुश्किलीने तिने विक्रमला आपल्या निवासाच्या जागेपासून दुर थांबवत माघारी जाण्यास सांगितले होते. जेणेकरून त्याला आपले घर नक्की कुठे आहे ते सहजासहजी सापडू नये, असा उद्देश तिच्या मनात होता. आणि त्यात ती यशस्वीही झाली होती. विक्रम तिच्यासमोर डिसेंट राहण्याचा पूर्ण प्रयत्न करत होता, हे मनूने चांगलेच ओळखले होते. म्हणूनच तो तिचा पाठलाग करेल असे तिला जराही वाटत नव्हते. तरीही खबरदारी म्हणून रात्री घरी पोहोचेपर्यंत ठराविक अंतराने ती मागे वळून वळून पाहत होती.

आरीफला शोधून मनू त्याच्या रूममध्ये गेली. बाहेर असलेल्या हवालदाराने तिला ओळखले होते, त्यामुळेच त्याने तिला आत जाण्यापासून आणि आरीफला भेटण्यापासून रोखले नाही.

मनूला पाहताच आरीफ उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला पण मनूनेच त्याला तसं करण्यापासून परावृत्त केले. तब्येत वगैरे विचारण्याची फॉर्मॅलिटी पूर्ण होत त्यांच्यात मूळ विषयावर चर्चा रंगू लागली.

“आरीफ, हमने गलत इन्सान पे भरोसा रखा..” मनूने विषयाला हात घातला.

“मतलब, कहीं तुम्हारा इशारा मंदार की ओर तो नहीं...” आरीफने मनूला विचारले.

“हा... आरीफ.. हमने उसे इनोसंट समझा था.. पर वो शातीर खिलाडी निकला.. तुम यकीन नहीं करोगे पर दीदी का खुन उसने ही किया है... और आगे की गलती मेरी थी.. मुझे तुम्हे उसके साथ नहीं छोडना चाहीये था...” मनूच्या चेहऱ्यावर पश्चात्ताप साफ दिसून येत होता.

“मनू.. मौसम का खुन... मंदार ने... ये तुम किस बिनाह पर कह रहीं हो...” आरीफने थोडं आश्चर्य व्यक्त करत विचारले.

“तो और कौन कर सकता है... आरीफ.. उसने तुम्हें मारने की कोशिश की.. क्या ये वजह काफी नहीं..” मनू त्वेषात म्हणाली.

पण तिचं बोलणं मध्येच खोडत आरीफ बोलू लागला.

“नहीं.. नहीं... मंदारने मुझपर हमला नहीं किया... और इसिलिये मैं सौ टका कह सकता हुं के मौसम को भी उसने नहीं मारा..”

“क्या...” मनू अक्षरशः किंचाळलीच.

खरंच आता आश्चर्य व्यक्त करण्याची पाळी तिचीच होती.

“मगर ये कैसे हो सकता है.. मैंने खुद अपनी आंखो से मंदार को तुम्हें जखमी हालत में नीचे जमिन पर रखतें देखा था.. और मौसम के पैसे वो भी तो उसी हरामी के पास थे.. आरीफ ठिक से याद करों.. कल क्या हुआ था... वो मंदार ही था ना.. जिसने तुम्हारी पीठ पर वार किया..”

मनूच्या इतक्या कॉन्फिडन्टली बोलण्याने आरीफही एकक्षण विचार करू लागला. खरंच काल नेमकं काय झालं होतं.. घडलेल्या एकेका घटनाक्रमाला तो जोडत जोडत बोलू लागला. मनू शांतपणे तो सांगत असलेला घटनाक्रम आपल्या डोळ्यासमोर चित्ररूपात आणू लागली.

“एक मिनीट मनू, कल.. मैं बाथरूम में जैसे ही गया.. मैंने देखा.. मंदार वहा वॉशबेसिन इस्तेमाल कर रहा था.. फिर.. (पुन्हा काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करत) हा... मेरी नजर उसकी बॅग पर गई.. जैसा के तुमने फोन पर बताया था.. मैंने मौसम के पैसो को मंदार के पास ही पाया.. उसके बाद... हमारे बीच थोडीबहूत बातचीत हुई.. फिर..(डोक्याला जोर देत) लेकीन मनू, उसकी एक भी हरकत से ऐसा नहीं लगा

के वो मुझे मारनेवाला था… बकायदा वो पैसे देखकर मैं उसपर झपटा, पर फिर भी उसने मुझपर हाथ नहीं उठाया..”

“कुछ तो बात होगी आरीफ, वरना मंदार चुप नहीं रहता.. उसमें भी जरूर उसकी कोई साजिश होगी..” मनू अजूनही मंदारविषयी काहीशी साशंक होती.

“वैसा लग तो नहीं रहा था..” आरीफ.

“पैसो के बारें में क्या कहा उसने.. कैसे आये उसके पास मौसम के पैसे..” मनूने विचारले.

“उसने बताया जो कुछ उस रात हुआ था…” असे म्हणत आरीफने त्याचे आणि मंदारचे कालचे संभाषण मनूला पूर्णपणे सांगितले. मंदार आणि मौसमची भेट, एकाएकी झालेला मौसमचा खुन, मंदारचं तिथून पळून जाणे, जाताना मौसमचे पैसे घेणे हे सर्व आरीफने जसे मंदारकडून ऐकले होते, त्याने तसेच्या तसे मनूच्या कानावर घातले.

“और एक बात मनू… हमारे बीच बातें चल ही रहीं थी… के अचानक किसीने पीछेसे मुझपर हमला किया.. मैं उस शक्स को तो देख नहीं पाया.. पर इतना पक्का के मंदार मेरे सामने था.. वो मुझे बचाने की कोशिश में था.. हा.. बेहोश होने से पहले मैंने देखा था मंदार मुझे बचाने की कोशिश में था.. हा मनू.. मंदार खुनी नहीं हो सकता..” आरीफच्या मनात आता कोणताही संदेह नव्हता त्याला जणू काही हरवलेली वस्तू मिळाल्यासारखं मनातून वाटत होतं.

पण त्याच्या तश्या खुलाश्यानं मनूचा साफ अपेक्षाभंग झाला होता. आता तिच्या डोळयासमोरून आरीफ सांगत असलेल्या किस्स्याचं चित्र नव्हतं.. ते केव्हाच हटलं होतं.. आता मनूच्या डोळयासमोर वेगळंच चित्र होतं.. काचेची खिडकी... तिला रेलून काहीसा अवघडलेल्या स्थितीत उभा असलेला एक माणूस.. आणि त्याला लाथ मारण्याच्या पावित्र्यात असलेली त्याच्या समोरची मुलगी.. बघता बघता त्या मुलीने तिच्या समोरच्या इसमाला लाथ मारलीच.. अगोदरच अवघडलेला तो.. त्या धक्क्यानं खिडकीच्या काचा छेदत खाली जाऊन आदळला... हो आता त्याचा चेहरा काहीसा स्पष्ट दिसू लागला होता.. मंदार.. हो.. मंदारच होता तो.. वर खिडकीत पाहावं.. तर...

"अह्हआअ..हह्.."

मनू स्वतःला भ्रमात त्या खिडकीत पाहून दचकतच भानावर आली. तिच्या चेहऱ्यावर पश्चात्ताप स्पष्ट दिसून येत होता. शिट्.. हे काय भलतेच होऊन बसले माझ्याकडून.. मंदारला मीच खाली ढकलले होते.. कदाचित तो आरीफला वाचवण्याचा प्रयत्न करत असेल.. मी खरे काय आणि खोटे काय याची चाचपणीदेखिल न करता त्याला शिक्षा दिली. तो जर खुनी नाही तर... किंवा तो खऱ्या गुन्हेगाराच्या मागावर असेल तर केवळ माझ्यामुळे आता तो ते ही करू शकत नाही. एकतर तो जखमी आहे आणि त्यात पोलिसांच्या ताब्यात.. त्याचं आता बाहेर पडणं खुपच अवघड आहे...

“मनू, क्या हुआ... क्या सोच रही हो...?” आरीफ तिच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहत विचारू लागला.

“आरीफ, लगता है मुझसे बहुत बडी गलती हुई है.. शायद मुझे मंदार के साथ ऐसा नहीं करना चाहीये था..” मनूच्या आवाजात खेद होता.

“क्या.. ऐसा क्या किया तुमने..?” आरीफ जाणून घेण्यास ऊत्सुक होता.

मनूने आरीफला विक्रम, मंदार यांचे पूर्वेतिहास तसेच इरफान भाय आणि त्याची माणसं, सध्यस्थितीत विक्रम आणि मंदार यांचं वैमनस्य आणि काल आरीफ बेशुद्ध झाल्यानंतरचा प्रकार या सगळयाचा वृत्तांत सांगितला. त्या विषयावर बराच वेळ त्यांच्यात चर्चा झाली पण अजूनही ते दोघे कुठल्याच निष्कर्षापर्यंत पोहचले नव्हते.

“मुझे लगता है आरीफ, मंदार बेवजह अब बूरी तरह से फंस गया है.. और इसकी जिम्मेदार मैं हुं...” मनू खंत करत उद्गारली.

“हम्मम्... एक बात तो पक्की हैं.. मंदार पुलिस के साथ होने के बावजूद डिग्री का खुन होता है मतलब मुझे लगता है कोई मंदार और विक्रम के बीच की दुश्मनी को आपसी फायदे के लिये इस्तेमाल कर रहा है.. या फिर ये भी हो सकता है के ये सब विक्रम ने करवाया हो.. मनू.. ये गुत्थी सुलझाना बहुत ही मुश्किल लग रहा है.. और मेरे खयाल से हमें मंदार की जरूरत है..” आरीफ मनात येईल तसं बोलून मोकळा झाला.

“हा पर कैसे..? पुलिसने उसको कहा रखा है किसे पता..” मनू वैतागली होती.

“थोडा रिस्क उठाना पडेगा.. मैं जानता हुं मंदार कहा है..” आरीफ म्हणाला.

“क्याऽऽ....?” मनू हर्षाने ओरडलीच.

“हा... मंदार इसी हॉस्पिटल में यहीं कोनेवाले कमरें में है... बकायदा वो जखमी है तो उसकी निगरानी सिर्फ एकही हवालदार कर रहा है.. पर खबर मिली है के वो एक-दो दिन में थोडा तंदुरुस्त हो जायेगा.. तब शायद उसपर पहरा बढ सकता है..” आरीफ मुळातच खबरी असल्याकारणाने त्याने अगोदरच सगळी माहीती काढून ठेवली होती.

“यु आर् टु गुड् आरीफभाई...” मनू त्याच्या हुशारीवर खुश होत म्हणाली.

“खबरे निकालनीही पडती है.. अपना तो काम ही पहले से यही है..” आरीफ स्वतःलाच शाबासकी देण्याच्या भावात म्हणाला.

पण आताच लगोलग हालचाल करणे सोईचे झाले नसते. मंदारला रिकव्हर होण्यासाठी थोडा वेळ देणे आवश्यक होते. आणि त्याचदृष्टीने नीट विचार करून पुढे पावले टाकण्याचा मनूने निश्चय केला.

**बराच काथ्याकूट केल्यावर शेवटी मनूच्या सुपीक डोक्यात आयडीया आली आणि ती आरीफला सांगून मोकळीही झाली. आरीफलाही तिचे म्हणणे पटले आणि त्याने त्या अनुषंगाने तिला साथ देण्याचे कबुल केले.**

****************************************

**दोन दिवसांनंतर....**

इस्पितळातल्या आपल्या खोलीत काहीसा स्वस्थ होऊन बेडवर पडलेला मंदार निवांत वर्तमानपत्र वाचत बसला होता. बाहेर त्याच्यावर पहारा ठेवून असलेले दोन हवालदारही आपापसांत गप्पा मारण्यात व्यस्त होते. दुपारची लंचनंतरची वेळ असल्याने हॉस्पिटलमध्ये फारशी वर्दळ नव्हती. आणि कामावर असलेला कर्मचारी वर्गही सुस्तावलेल्या चालीने कामे करत होता. घड्याळात दुपारच्या तीनचा ठोका पडला आणि तितक्यात आरीफच्या रूममधून त्याच्या मोठमोठ्याने विव्हळण्याचा आवाज ऐकू येऊ लागला.

क्षणात तिथले वातावरणच बदलले. आरीफच्या बाहेर त्याच्या सुरक्षेसाठी तैनात केलेला हवालदार लगबगीने आत जाण्यासाठी उठला पण रूमचा डोअर आतून बंद असल्याने त्याला आत प्रवेश करता आला नाही. जोरजोरात दार ठोठावूनही आतून दार उघडले जात नव्हते. तिथूनच ये-जा करणारे कर्मचारी काय झालेय ते पाहण्यासाठी जमा होऊ लागले. आतून आरीफच्या ओरडण्याचा आवाज जास्तच मोठा होत चालल्यामुळे त्याच्या रूमच्या बाहेर संभ्रमाची परीस्थिती निर्माण झाली होती.

तिथे वाढत चाललेली गर्दी पाहता मंदारवर नजर ठेवून असलेले दोन्ही हवालदार सहज प्रतिक्रिया म्हणून आरीफच्या रूमकडे धावत सुटले. जाताना खबरदारी म्हणून त्यातल्या एका हवालदाराने बाहेरून कडी लावली आणि आतमध्ये मंदार एकटाच राहीला. नाही म्हणायला मंदारलाही बाहेरील परीस्थितीचा थोडासा अंदाज आलाच होता. काहीतरी गडबड झाली आहे आणि आपल्यावर पाळतीला असलेला पोलिस सध्या दरवाज्याच्या बाहेर नाही आहेत हे त्याने ओळखले. धडपडत उठत मंदारने दरवाज्यात येऊन कानोसा घेतला. आरीफच्या ओरडण्याचा अस्पष्टसा आवाज अजूनही बाहेरून ऐकू येत होता.

मंदारने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करून पाहीला. पण नाही... दरवाजाला बाहेरून कडी असल्याने तो उघडू शकला नाही. संधी चालून आली होती.. हीच वेळ होती पळण्याची.. बाहेर पडण्याचा अन्य मार्ग शोधण्यासाठी मंदार मागे आला. खिडकीपाशी जाऊन त्याने पडताळा करून पाहीला. खाली जमिनीपर्यंतचे

अंतर खुप होते. थोडंस उन्नीस-बीस झालं तर पुन्हा हातपाय मोडले असते. यावेळी ती रीस्क मंदार घेऊ शकत नव्हता. काय करू आन् काय नको.. मंदार याच विवंचनेत होता. अन् शेवटी त्याने फायनल केलेच.. दरवाज्यासमोर दहा पाऊल मागे येत त्याने आक्रमक पवित्रा घेतला. दरवाजा तोडून बाहेर पडण्याचे तायाने मनाशी नक्की केले होते. अश्यावेळी जर त्या आवाजाने बाहेरील हवालदार जरी सावध झाले तर त्यांनाही दरवाज्यासारखंच तोडण्याचा धाडसी निर्णय मंदारनं घेतला.

आपली पोझिशन पक्की करत मंदार दरवाज्यावर स्वतःला झोकून देण्यास जाणारच होता की, त्याला दरवाज्यावर काहीशी हालचाल जाणवली. आपल्या पाळतीवर असलेले पोलिस पुन्हा आले की काय.. मनात एकक्षण असा विचार करत मंदार खट्टू झाला पण पुढच्याच क्षणी दरवाज्याची बाहेरून लावलेली कडी सरकली आणि दरवाजा उघडला गेला.

**डोळयांवर जाड भिंगाच्या गडद काळया रंगाच्या फ्रेमचा चष्मा लावलेली नर्सच्या पोशाखातील ती व्यक्ती पाहून मंदारला आश्चर्य वाटले. तिला एका फटक्यात बाजूला फेकण्यात त्याला फारसे कष्ट पडले नसते. पण तिची कमनीय फिगर आणि त्या चष्म्याच्या आतले तिचे गुझबेरीच्या आकाराचे डोळे त्याला अस्वस्थ करू लागले. शिवाय त्या डोळयात त्याला काहीतरी ओळखीचे असल्याचे जाणवत असल्याने तो प्रहार करायला पुढे जाऊ शकला नाही.**

“चल निघ लवकर...” तिनं लपवून आणलेला टी-शर्ट त्याच्याकडे फेकत जवळजवळ त्याला ऑर्डरच दिली.

मंदारनेही मग डोक्याला जास्त त्रास न देता पटापट हॉस्पिटलचा शर्ट उतरवून तो टी-शर्ट परीधान केला. आणि तिच्या मागून तो शक्य तितक्या लवकर बाहेर पडला.

आरीफच्या रूमजवळून पास होताना अगदी मंदारच्या मनात पकडले जाण्याचा लवलेशही नव्हता. त्याला माहीत होते जरी ते तीनही हवालदार मिळून त्याच्या अंगावर आले असते तरी त्या तिघांना तो पुरून उरला असता. मंदार अगदी बिनधास्त हत्तीसारखा त्यांच्या मागून पास होत हॉस्पिटलच्या बाहेर आला.

तोपर्यंत आरीफच्या रूमच्या बाहेर असलेले तीनही हवालदार जीव खाऊन दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करत होते. शेवटी चार-पाच निष्फळ प्रयत्नांनंतर कसेबसे त्यांना यश आले आणि ते आत घुसले.

आतमधले दृश्य पाहताच त्या तीन्ही हवालदारांना आश्चर्याचा धक्काच बसला. ज्या कारणाने आरीफ मघापासून ओरडत होता, ते कारण समजल्यावर त्यांची स्थिती आरीफला खाऊ की गिळू अशीच झाली होती. इतक्या वेळापासून आत काय घडतेय हे जाणून घेण्यास ऊत्सुक असलेली बाहेरची गर्दी हास्यकल्लोळात तिथून पांगू लागली.

काहीतरी भयानक नाट्य आतमध्ये बघायला मिळेल या आशेने जमा झालेल्या काही जणांचा पुरता हिरमोड झाला होता.

आरीफ सेफ जागेवर उभा असल्यासारखा त्याच्या बेडवर उभा राहून जंगलात एकटाच फिरत असलेल्या सिंहासारख्या फरशीवर फिरणाऱ्या झुरळाला हाकलण्यासाठी बेंबीच्या देठापासून ओरडत होता. आणि त्याच्यावर उद्भवलेल्या त्या जीवघेण्या प्रसंगातून वाचण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते.

वैतागलेल्या एका हवालदाराने हातातल्या दंडूक्याने एकाच फटक्यात त्याच्या आवाक्याच्या क्षेत्रात आलेल्या त्या झुरळाचा आणि पर्यायाने आरीफचाही खेळ खल्लास केला. त्या आवाजाने आरीफ शांत झाला आणि चेहऱ्यावर सौम्यभाव आणत त्याने त्या हवालदाराला 'थॅन्क्स' म्हटले.

"पागल कहीं का..." दुसऱ्या हवालदारानं आरीफकडे पाहत नारीजीचा सुर ओढला.

इतक्यात झुरळाला मारण्यासाठी खाली वाकलेला हवालदार तडकन उठून आपल्या सहकाऱ्याला घाईघाईने ओरडत म्हणाला...

"तो एकटाच आहेऽऽ... चल लौकरऽ..."

त्यानं तसं बोलताच हीट ऑफ दी मोमंट तिघेही कॉन्स्टेबल मंदारच्या रूमकडे धावले. पळणाऱ्या त्या तिघांकडे कुत्सित हास्यभऱ्या नजरेनं पाहत आरीफ शांतपणे रूममधून बाहेर पडून हॉस्पिटलच्या मुख्य एक्झिटकडे कुच करू लागला.

मंदारच्या रूमचा उघडा दरवाजा पुरेसा बोलून गेला होता. पण तरीही काहीशी अंधुक आशा मनात ठेवून पोलिसांनी मंदारच्या रूममध्ये प्रवेश केला. मंदार पळून गेल्याच्या शंकेने त्या तिन्ही हवालदारांच्या तोंडचे पाणीही पळाले.

“सायब्... कच्चा खाईल...” एकजण म्हणाला.

“कुणीतरी मदत केल्याबिगर हे शक्य नाही...” दुसरा म्हणाला.

“आता करायचं काय पण...?” पुन्हा पहीला हवालदार म्हणाला.

तिसरा हवालदार आतापर्यंत शांत होता. त्याची ड्यूटी आरीफच्या रूमबाहेर होती. त्याच्या डोक्यात काहीशी वळवळ होतच होती. काही संदर्भ एकमेकांशी जुळवून त्याने तर्क मांडला.

> **“आरीफच्या रूममधून आवाज येतो.. सगळयांचं ध्यान तो आकर्षित करून घेतो. दरवाजा आतून बंद असल्याने तो तोडावा तर लागणारच होता. त्या कामात आपण तिघांना एकत्र यावच लागणार होतं. आपण तिघेही तिकडे असलो की मग मंदारचं पळून जाणं सोपं झालं असणार. आणि आता पुन्हा आपण मंदारच्या खोलीत आलोय... ते पण..**

**तिघेही.. म्हणजे.. याचाच अर्थ.. आता आरीफपण... त्याच्याऽऽ माय्लाऽऽ भोऽऽऽ...."**

तिघे कॉन्स्टेबल पुन्हा आरीफच्या खोलीत धावतच आले. पण तिसऱ्या हवालदाराने मांडलेला तर्क अगदी तंतोतंत खरा ठरला होता. आरीफ कधीच हॉस्पिटलच्या बाहेर पडला होता.

**सोबत असलेली नर्स दुसरी कोणी नसून मनू असल्याचे मंदारने ओळखले. तिनेहि झाल्याप्रकाराची त्याच्याकडे माफी मागितली. ठरल्याप्रमाणे त्यांच्या मागोमाग काही वेळातच आरीफही येऊन त्यांना भेटला. तिथून निघत त्यांनी नेहमीच्या ठिकाणी जाण्याचे टाळत जवळपासचा एक लॉज राहण्यासाठी निवडला.**

****************************************

डिग्रीचा खुन झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी सायंकाळी मेहजबीन मनूच्या घरी तिला भेटण्यासाठी म्हणून चालली होती. अंधार पाहुन मुद्दामच तिने ही वेळ निवडली होती. तशी कल्पना देण्यासाठी तिने मनूला फोन केला.

“हॅलो... मनू.. उस शाम को जो खुन हुआ था..”

“हा.. दीदी..”

“मैंने उस आदमी को देखा था... उस वक्त मैं वहीं पर थी..”

“क्याऽऽ...” मनू ओरडलीच.

“हा.. मैं उस आदमी को ठिक से नहीं जानती हुं पर तुम लोगो के साथ मैंने उसे पहले भी देखा हैं...”

“ऐसा कैसे हो सकता है दीदी... और आप मुझे दो दिन बाद ये सब बता रही है...”

“मैं वही समझाने आ रही हुं.. खुन करते वक्त उस आदमी ने भी मुझे देखा था.. इसिलिये मैं वहा सें भाग गई थी.. दो दिन छुपने के बाद आज तुमसे मिलने तुम्हारे घर पहुंच रही हुं.... मेरी जान खतरें में है.. तुम घर पर ही हो ना..?” मेहजबीनने घाबरतच विचारले.

मनू, आरीफ आणि मंदार आजच नव्या ठिकाणी लॉजवर येऊन थांबले होते. पुढे काय करायचे याच प्रश्नाचे उत्तर शोधताना आता मेहजबीनच्या रूपात थोडाफार क्लू मिळाला होता. मनूने मेहजबीनला भेटण्याचे ठरवले, त्यात रिस्क जरूर होती पण मेहजबीनकडून मिळणारी माहीतीही तितकीच अत्यावश्यक होती.

“नहीं.. लेकीन फिक्र मत करो, मैं बस आधे घंटे में वहा पर पहुंच जाऊंगी..“ मनूने मेहजबीनला उत्तर दिले आणि फोन ठेवला.

मनूच्या घरी जाण्याच्यासंदर्भात त्या तिघांमध्ये सल्लामसलत झाले. एकट्याने गेल्यास धोका होता, पोलिसांपासूनही आणि जो कोणी खुनी होता त्याच्यापासूनही. म्हणूनच तिघांनी जायचे ठरले फक्त आरीफ आणि मंदार मागे राहून आवश्यकता वाटली तरच पुढे येतील अन्यथा मनू मेहजबीनला एकटीच भेटेल असा प्लॅन निश्चित झाला.

तिकडे मेहजबीन अंधारात वाट काढत एक एक गल्ली पाठी टाकत मनूच्या घरी येऊन पोहोचली. थोडावेळ ती घराच्या बाहेरच घुटमळत थांबून राहीली. दरवाजा निरखून पाहता तिला दिसले की मनूचे घराला कुलूप वगैरे नव्हते. म्हणजेच तो उघडा होता. काय करू आत जाऊ की नको या विचारचक्रात मेहजबीन होती. तसे मनूचे घर इतर वस्तीपाहून थोडे बाजूला असल्याने फारशी वर्दळ नव्हती पण बाहेर थांबायचे म्हटले तर कुणीतरी पाहण्याची भिती होती. आणि जर तो खुनी आपल्या मागावर असेल तर मग... नको.. या कल्पनेनेच मेहजबीनच्या अंगावर काटा आला. आणि तिने मनूच्या घरात जाऊन थांबण्याचा निर्णय घेतला.

पण तिच्या नशिबात काही वेगळेच लिहीले होते.

आत जाऊन मेहजबीनने सुरक्षिततेच्या दृष्टीने दार आतून बंद केले आणि मागे वळली. समोरच्या भिंतीला लागून असलेल्या सोफ्यावर बसायला म्हणून ती जात असताना तीची नजर उजव्या बाजूला चमकत असलेल्या एका वस्तूवर गेली. त्या अंधारातही बाहेरून येणाऱ्या पुसटश्या प्रकाशाने चमचमत असलेल्या त्या चाकूचे प्रतिबिंब तिला शोकेसच्या आरश्यात दिसत होते. तो चाकू हातात आलटत पालटत असलेली व्यक्ती पाहताच मेहजबीनच्या अंगावर सर्रकन् काटा आला, काळजात धस्स् झाले.. ज्या संकटापासून लपत छपत ती इथं सुरक्षित जागेपर्यंत आली होती त्याच संकटाने तिला याच सुरक्षित जागी गाठले होते.

“त्..त्..तुम्म्... यहां... कैसे...” घाबरलेल्या कापऱ्या आवाजात तिनं आरश्यातच पाहत विचारलं. तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते.. अंगातलं त्राणचं जणू गळून पडले होते आणि त्या व्यक्तीकडे वळून पाहण्याचेही धाडस तिच्यात नव्हते.

“मैं तो किसी और वजहसे आया था... पर क्या करें.. तु खुद हलाल होने यहां आ ही गई...”

मेहजबीन त्याच्या या वाक्यानं अजूनच हादरली. तिला खरंतर काय करावे तेच सुचत नव्हते. प्रतिकार करावा की पळावं या द्विधा मनःस्थितीत ती होती. माणसाचं नेहमी असंच होतं, एखाद्या गोष्टीबाबत मनात संभ्रम असेल तर ती गोष्टीस कधीच फलत्व प्राप्त होत नाही.

ती व्यक्ती जसजशी जवळ येऊ लागली तसे मेहजबीनचेही तेच झाले पळू की नको या मनातल्या विचारचक्रातच ती घाफरून दरवाज्याकडे लडखडलेल्या पावलांनी धावली आणि त्याने जीव खाऊन मारलेल्या चाकूने तिच्या पाठीत खोलवर घुसत आपले काम फत्ते केले. तिच्या ओरडण्याचा आवाज फारसा लांब जाऊ शकला नाही. आणि थोडावेळ तडफडून मेहजबीनची हालचाल कायमची बंद झाली.

मागून आलेल्या त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर क्रूर भाव होते. एखाद्या विकृताप्रमाणे विक्षिप्त हसत तिच्या मृत शरीराला लाथाडत तो दाराची कडी उघडून बाहेर पडला.

# डॉमिनंट भाग बारा

काहीश्या सामसूम झालेल्या त्या वस्तीच्या बाहेर रोडवर मनूने बाईक थांबवली. आरीफ आणि मंदार चटकन उतरले आणि तिथल्याच एका गल्लीत घुसले. मनू बाईक स्टार्ट करून पुढच्या रस्त्याने तिच्या घराकडे वळली. ठरवल्याप्रमाणे तिला एकटीलाच पुढे जायचे होते. आणि वेळ पडल्यासच आरीफ आणि मंदार समोर येणार होते.

काही क्षणांतच मनूने मुख्य वस्तीपासून थोड्या बाजूला असलेल्या आपल्या घराजवळ बाईक साईडला लावली आणि ती घराचा दरवाजा उघडण्यासाठी म्हणून पुढे गेली. तिकडे आरीफ आणि मंदार देखिल मनूची घराबाहेरील हालचाल दिसू शकेल अश्या अंतरावर येऊन थांबले होते.

“क्या कहते हो मंदार भाय... कौन रहेगा इस सब के पीछे...” आरीफने दबक्या आवाजात मंदारला विचारले.

“ह्मम... कोई शातीर खिलाडी ही रहेगा..” मंदार आवाजात गुढपणा दाखवत म्हणाला. त्याच्या नजरेत एकप्रकारची विशिष्ठ चमक आली होती. कदाचित त्याला या अगोदरच हिंट मिळाली होती. पण तरीही मंदार गप्पच होता. का कुणास ठाऊक.. पण त्याने अजून तरी मनू वा आरीफ कुणाला काहीच सांगितले नव्हते.

मनू ने उघडा दरवाजा पाहताच तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. दोन पावलं आत जाताच तिने रक्ताच्या थारोळयात पडलेल्या मेहजबीनला पाहीले आणि मनू तिथंच थबकली. तिच्या चेहऱ्यावर थोडे का होईना पण भितीचे सावट उमटलेच होते. एकवार आसपास संपूर्ण बारकाईने नजर फिरवत तिने घरातल्या एकेका गोष्टीचा आढावा घेतला. कुठेच काही तोडफोड वगैरे नव्हती. खुनी खुपच चलाख आणि तिच्या घरासंबंधी संपूर्ण माहीती असलेला होता. शिवाय मेहजबीनने सांगितल्याप्रमाणे त्याला अगोदरही तिने आपल्यासोबत पाहीले होते.

मनू हळूहळू मागे एकएक पाऊल टाकत घराबाहेर आली. अजूनही तिच्या हालचालीत कमालीचा तणाव जाणवत होता. जणू तिला त्या प्रसंगात काय करावे हे सुचत नव्हते. समोर खुप मोठा प्रश्न उभा ठाकला होता आणि जेवढे त्याच्या उत्तराजवळ जाण्याचा मनू प्रयत्न करत होती तेवढाच तो प्रश्न अधिक किचकट होत चालला होता.

“मंदार भाय.. मामला ठिक नहीं लग रहा है...” मनूला उलट्या पावली मागे येताना पाहत आरीफ सावध होत म्हणाला.

मंदारनेही त्याच्या इशाऱ्याने सावध पवित्रा घेतला आणि तो हळूहळु मनूच्या दिशेने निघाला. त्याच्या मागोमाग आरीफही निघाला.

मागून आलेल्या चाहुलीने मनूने मागे वळून पाहीले. मंदारला पाहत तिने काहीच प्रतिक्रिया न देता पुन्हा नजर वळवत उघड्या दारातून आत पाहू लागली.

काहीतरी बिनसल्याची जाणीव मंदारला झाली आणि समोर थोडं पुढे येताच त्याला खाली पडलेली मेहजबीन दिसली. आरीफही तितक्यात जवळ आलाच होता. ते दृश्य पाहून त्याचा तर भितीने थरकापच उडाला.

“य....ये क्या... कैस्से... हो गया...” थरथरत्या आवाजात आरीफ पुटपुटला. डोळे फाडून तो नजारा पाहताना त्याच्या दृश्यपटलावर येणाऱ्या संकटाच्या असंख्य शक्यता स्पष्ट दिसत होत्या. मनूही अजून स्तब्ध उभी होती. परंतु मंदार मात्र शांत होता. जणू जे झाले त्याने त्याच्यावर काहीच फरक पडला नव्हता वा त्याच्यासाठी ही गोष्ट फारशी लक्षात घेण्यासारखी नसावी.

“ये यहा पर आनेवाली है, ये बात उस तक कैसे पहुंची..” मनूने आरीफकडे पाहत विचारले.

“पता नहीं.. पर सवाल ये है के वो है कौन... आखिर चाहता क्या है...” आरीफने संभ्रमावस्थेतच उत्तर दिले.

“मनू...” मंदारने तोंड उघडले. मनूकडे पाहत त्याने एक दिर्घ श्वास घेतला आणि बोलू लागला.

“कदाचित तो तुझ्यासाठी इथं आला असावा.. (खाली मेहजबीनकडे पाहत) हीच्यासाठी नाही.. पण ती आयत्या मिळालेल्या संधीप्रमाणे त्याला समोर दिसली आणि त्याच्या कचाट्यात सापडली..” मंदार म्हणाला.

“व्हॉट् डू यू मीन्.. माझ्यासाठी...” मनू रागाने मंदारकडे पाहत त्वेषात बोलून थांबली, मंदारने तिच्याकडे पाहत मानेला तीस अंशात हलवत भुवया एकदा ऊंचावून खाली घेतल्या, त्याचे ओठही त्याच क्षणी एकमेकांवर दाबले होते.

त्या हावभावांनी मनूच्या डोक्यात प्रकाश पडला.

“ओह्.. हो.. हो... माझ्यासाठी... इतका साधा विचार माझ्या मनात पूर्वीच का आला नाही.. एकच तर व्यक्ती राहीली होती जी इतक्या दिवसांत समोर आली नव्हती. त्याच्याबद्दल तर मी विसरूनच गेले होते. तरीच त्याला माझे घर माहीत होते.. तो पहील्यापासूनच दीदीला ओळखत होता..” मनू भरभर एकेक आठवत बोलत होती.

मंदार गांभिर्याने तिचं म्हणणं ऐकत होता. तर आरीफ अजूनही कोडं न उलगडल्यासारखा प्रश्नार्थक नजरेने लक्षपूर्वक मनूकडे पाहत होता.

“तो दीदीला ओळखत असल्याने आणि दिदीला कामानिमित्ताने भेटण्यासाठी तो बऱ्याचदा घरी यायचा. एकदा संध्याकाळी मी बाहेरून घरी आली तेव्हा नेमका दीदीने त्याच्या कानाखाली मारल्याचे मी पाहीले होते. शिवाय त्यावेळी दीदीने माझ्या नावाचा उल्लेखही केला होता. म्हणजेच त्यावेळी त्याने माझ्याबद्दल तिच्याकडे विषय काढला असणार. मी दीदीला विचारलेही होते त्याबद्दल पण तिने नेहमीच मला सांगायचे टाळले. शिवाय त्या दिवसापासून तो पुन्हा कधी घरी आला नव्हता. पण दीदीला काही काम सांगायचे असल्यास तो फोन करून बाहेर भेटायचा.

हरामी साला.. तो नक्कीच तो प्रसंग विसरला नसणार.. त्यासाठीच त्याने मौसम दीदीला मारण्याचा प्लॅन आखला असणार. आणि आता तो त्याचा मूळ उद्देश सफल करण्यासाठी माझ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे.. ओह् माय्... इतकी प्लॅनिंग त्याच्यासारखा भुक्कड गुंड करू शकतो विश्वासच नाही बसत.”

“मदन...” आरीफ एकदम क्लिक झाल्यासारखा ओरडला.

“हो... मदनच.. या गेममध्ये त्याच्याशिवाय अजून तरी कुणी खुनी असेल असं वाटत नाही..” मनू आत्मविश्वासाने म्हणाली.

मंदारलाही काहीतरी बोलायचे होते पण त्याने ते टाळले. मनूच्या घारीसारख्या नजरेतून मंदारची ती अवस्था सुटली नाही. मनूने सुरूवातीपासून सर्व आठवायला सुरूवात केली.

‘मौसमचा खुन.. मंदारच्या रूममध्ये.. मदन आणि मंदार दोघांचं तिथं असणं.. मंदारचं तिचे पैसे घेऊन पळून जाणं.. नसीरचा खुन.. तो झाला तेव्हाही मंदारची आणि मदनची तिथं उपस्थिती होती.. मंदारला पोलिस पकडून नेतात.. त्यानंतर डिग्रीचा खुन.. कदाचित डिग्रीला अगोदरच्या खुनाचं रहस्य कळालं असावं. म्हणून त्याचाही खुन.. पण यात मंदार सहभागी नव्हताच.. शिवाय मेहजबीनचा खुन्.. यातही मंदार सहभागी नाही.. कारण तो तर आमच्यासोबतच आहे.. एक मिनिट्.. काहीतरी गल्लत होत आहे.. मनू डोक्याला जोर लावून विचार करू लागली..

‘त्या रूममध्ये मौसमच्या बॅगेतले पैसे असे डायरेक्ट मंदार चेक करूच शकत नव्हता. मौसम पैश्याची बॅग समोर ठेवून मंदारच्या नजरेआड जाऊच शकत नव्हती. म्हणजेच मौसमच्या बॅगेत रोकड असल्याचे अगोदरच मंदारला माहीत होते. आणि मौसमला जखमी केल्याशिवाय त्यांना हात लावणं मंदारला जमलंच नसतं.. याशिवाय मदन एकटा खुनी असेल तर नसीरचा खुन ज्यापद्धतीने झालाय, तर त्याची हाडं तोडण्याइतपत ताकद मदनकडे तर नक्कीच नाही. म्हणजेच नसीरच्या खुनामागे मदनशिवाय आणखी कुणीतरी असणारच.. आणि तो व्यक्ती मंदारच असू शकतो. कारण साफ आहे, मदन सुरा काढल्याशिवाय काम करणार नाही. आणि मंदार आपल्या ताकदीच्या गर्वात राहून कोणतेही हत्यार वापरणार नाही.. येस्स्.. असंच असू शकतं.. खुनी एक नाही, तर दोन आहेत.. मदन आणि त्याला साथ देणारा मंदार..’

‘आता राहीली फायद्याची गोष्ट.. तर मदनला मी हवीय.. पण मंदार.. त्याला काय हवं असेल.. फक्त पैश्यासाठी तो हे करेल असे वाटत नाही.. मंदार.. मंदार... ओह्हह.... विक्रम.. विक्रमच.. मंदारला विक्रमपर्यंत पोहोचणं अवघड जात असणार.. म्हणूच मदन त्याला या कामात मदत करू शकत होता. विक्रमला मारून त्याच्या सर्व धंद्यावर मंदार कंट्रोल घेऊ शकत होता. आणि स्वतःला विक्रमजवळ जाणं शक्य नाही म्हटद्यावर तो मदनला इरफान भायच्या संबंधातून विक्रमपर्यंत पोहोचवणार आणि विक्रम संपला की आपसुकच मंदारचा बदला आणि विक्रमचा पैसा.. दोन्ही टारगेट पूर्ण झालेच असते.’

मनू आपल्याच मनात संबंधित प्रकरणाची उकल करत होती. चित्र आता हळूहळु क्लिअर होत चालले होते.

“पण त्यात त्याच्या मित्रांचीही हत्या म्हणजेच मला वाटतेय त्याचा उद्देश फक्त मी नाही.. अजूनही काहीतरी आहे..” मनूने मंदारकडे पाहत अंदाज वर्तवला. आणि ती मंदारच्या उत्तराची प्रतिक्षा करू लागली.

“अ..अह्... हा.. हो..हो.. अजून काहीतरी नक्कीच असणार त्याच्या मनात..” मंदार पहील्यांदाच क्लीन बोल्ड झाला होता.

आणि त्याला गुगली टाकणारी मनू गालात क्षणभरच हसली आणि पुढच्या डिलीव्हरीसाठी सज्जदेखिल झाली. आरीफसाठी ते सर्व बाऊन्सरच होते, म्हणून तो फक्त वेट ॲन्ड वॉच भुमिका निभावत होता.

“आपल्याला इथुन लवकर निघायला हवं.. दुपारच्या प्रकरणानंतर पोलिस आपला शोध घेण्यासाठी इथं कधीही पोहचू शकतात..” मंदारने सावरत वेळ मारून नेली.

“हा मनू.. हमें जल्द से जल्द वापस अपनी नयी जगह जाना चाहीये..” आरीफनेही मंदारच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

“निकलना तो हमें है ही आरीफ भाय.. वो भी जल्द से जल्द.. पर अब किसी और जगह जाना होगा हमें..” मनू आवाजातून गुढता दर्शवीत म्हणाली.

“किसी और जगह..?” आरीफने पटकन प्रश्न केला.

“आता दुसरीकडे कुठे जायचं आहे..?” मंदारनेही आश्चर्य व्यक्त करत तोच प्रश्न विचारला.

“चला.. बसा मागे..” मनू बाईकला किक् मारत एवढेच म्हणाली आणि तिने बाईक स्टार्ट केली.

आरीफ मंदारकडे पाहत मनूच्या मागे बसला. मंदारही त्याच्यापाठी विराजला आणि सायलेन्सरचा फट्फट् आवाज करत बाईक सुसाट निघाली.

मुख्य रस्त्यावरून बाईक भरधाव हाकताना मनूची नजर मध्येच मिररमधल्या मंदारच्या चेहऱ्यावर जात होती. मंदारचे मात्र विशेष तिकडे ध्यान नव्हते. त्याच्या मनात वेगळेच काहीतरी शिजत असल्यासारखे चालू होते. आणि मनू तेच टिपण्याचा प्रयत्न करत होती. मध्ये बसलेला आरीफ मात्र बाईकच्या स्पीडबरोबर समोरून उलट्या बाजूने बोचणाऱ्या वाऱ्याशी जपून वागत होता. कानात सूऽऽ... सूऽऽ... करत लागणारा तो वारा देखिल त्याला अस्वस्थ करत होता. कुणाचं काय.. तर कुणाचं काय... आरीफचं नशिब चांगलं की तो मध्ये बसला होता. पण एक नक्की त्या तिघांच्याही डोक्यात सद्यपरिस्थितीत भिन्न भिन्न विचारचक्र दौडत होती.

**मनूला अचानक काय गवलसलेय, ती आपल्याला नेमके कुठे घेऊन जात आहे या प्रश्नात आरीफ अडकला होता. तर मंदार त्याच्याही पुढे जाऊन निर्माण होणाऱ्या शक्यतांवर रीॲक्ट कसं करायचं याचा अंदाज बांधत होता. मनू काहीशी निश्चल होती, कदाचित तिने मनात बांधलेले ठोकताळे तंतोतत जुळणार होते.**

**********************************

मेहजबीनला मारल्यानंतर मदन तिथून तडक निघाला. खरेतर त्याचा मनूच्या घरी येण्याचा उद्देश निराळाच होता. पण मेहजबीनच्या तिथे असण्याने तसेच डिग्रीचा खुन झालेला तिने पाहीलेला असल्याने तिला संपवून टाकणे त्याला त्यावेळी सोईचे वाटले.

मनूशी जवळीक साधण्यासाठी आता मदनच्या रस्त्यात कुणीही आडवे येणारे राहीले नव्हते, एक व्यक्ती सोडून. हो... मदनने त्या रात्री मनू आणि विक्रमला सोबत जाताना पाहीले होते. विक्रम मनूच्या प्रेमात पडला असणार यात शंकाच नव्हती. विक्रमला मारल्यावर मनू आपल्या हातातून जाण्याचा धोका तर टळेलच

शिवाय विक्रमचे धंदे, पैसा यांकडे जाणारा मंदारचा रस्ता साफ होईल. एका दगडात दोन पक्षी मारण्याचा मदनचा डाव चालला होता.

मदनच्या डोळयासमोर विक्रमचा चेहरा आठवताच मदन रागाने लाल होऊ लागला. मनू त्याच्या कारमध्ये बसतानाचा प्रसंगही लगोलग डोळयांसमोर तरळल्याने नकळत तो दातओठ खाऊ लागला. मदनचा त्यावेळचा चेहरा पाहून कुणीही त्याला सायको म्हणूनच ओळखू शकले असते.

विक्रमला संपवायचे बास्स्.... बाकी काही माहीत नाही. पण साला तावडीत येईल तरी कसा.. त्याचा ठिकाणा तर इरफान भाय शिवाय कुणाला माहीत नसनार. आणि इरफान भायला आपला गेम कळल्यावर तो मला सोडणार नाही. न्हाय.. न्हाय.. न्हाय.. मदन्या.. ह्याच्या मधली वाट शोधावीच लागेल. कसं..

मदनच्या आत दडलेला विकृत सैतान पुन्हा जागा होऊ पाहत होता. डोळे गरगर फिरवत त्यानं आपला उजवा हात कपाळावरून घासत खाली दाढीपर्यंत आणला आणि दाढी खाजवू लागला. अचानक त्यानं हालचाल थांबवली आणि त्या विकृत चेहऱ्यावर छद्मी हास्य पसरलं. होय.. त्याला मधली वाट गवसली होती. चटकन् पॅन्टच्या खिश्यातून मोबाईल बाहेर काढत त्याने इरफान भायला फोन लावला. एक रींग वाजेपर्यंतचा अवकाशही त्याला स्वस्थ बसून देत नव्हता. तिकडून इरफान भाईने फोन उचलला.

“हॅलो... भाय..” मदन उताविळ होऊन बोलू लागला पण भायने त्याला मध्येच टोकले.

“रूक्.. है किधर तू... डिग्री और तू साथ में थे, तो उसको किसने मारा..?” भायने विचारले.

“भाय.. उस शाम डिग्री का खुन होते हुये मैंने देखा था.. इसिलिये दो दिन से मैं उस खुनी की खबरें निकालने में लगा हुं...” मदनने अतिशय साळसूदपणे इरफान भायची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

“तू फोन कर के बता नहीं सकता था क्या ये..? और खुद का फोन भी बंद है..” भाय ओरडला.

“भाय फोन बंद पडा था.. जैसे चालू हुआ मैंने आपको फोन किया है.. सुनो भाय.. विक्रम की जान को खतरा है.. उसके घर पे ही उसपे हमला होनेवाला है..” मदनने इरफान भायवर जाळे टाकायला सुरूवात केली होती.

“क्याऽऽ.. तुझे कैसे पता.. और विक्रम को तू कबसे जानने लगा..” भायने आश्चर्य व्यक्त करत विचारले.

“भाय वो सब बताने का टाईम नहीं है.. फिलहाल आप ये समझ लो के खुनी की अगली चाल मैं जान चुका हुं.. और अब विक्रम की बारी हैं..” मदनने शक्य तसं भायला गुंडाळण्याचा प्रयत्न केला.

“ये कैसे हो सकता... एक्.. एक.. मिनिटं.. मदन.. तू पता समझ ले और मुझे वही पे जल्द से जल्द मिल..” असं म्हणत बावचळलेल्या भायने मदनला विक्रमच्या फ्लॅटचा पत्ता सांगितला.

विक्रम शक्यतो गुमनाम राहत असल्याने त्याचा पत्ता फारसा कोणाला माहीत नव्हता. फक्त या केस मध्ये गुंतलेला मुख्य व्यक्ती म्हणजे भाय आणि दुसरी व्यक्ती म्हणजे मनू ज्यांना विक्रमने आपला फ्लॅट दाखवला होता. बाकी विक्रमच्या खास माणसांनाच तेवढी तिकडची माहीती होती. शिवाय विक्रमने अगदी सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कुणी बॉडीगार्ड ठेवला नव्हता. त्याला पहील्यासारखी चुक करून पुन्हा दुसरा मंदार जन्माला घालायचाच नव्हता.

मदनने विक्रमचा पत्ता जसा भायने सांगितला तशी घोकंपट्टी करत आपली पाऊले तिकडे वळवली सुद्धा.. तिकडून इरफान भायही चंदूला घेऊन विक्रमच्या घरी जाण्यास निघण्याची तयारी करू लागला. इरफान भायने बाहेर पडून आपली गाडी स्टार्ट केली. त्याने फर्स्ट गिअर टाकून क्लच सोडला आणि गाडी काहीशीच जागेवरून हलली पण पुढच्याच क्षणाला त्याला कच्चकरून ब्रेक मारावा लागला. समोरून आलेल्या पोलिसांच्या गाडीकडे अचंबित होत पाहत इरफान भायने चंदूकडे पाहीले. चंदू ही पोलिसांना पाहून तितकाच संभ्रमावस्थेतच होता.

आता काय.. या विचारात असतानाच समोरून एक इन्सपेक्टर आणि दोन कॉन्स्टेबल खाली उतरले. इरफान भायही खाली उतरला. चौकशीचे कारण देत पोलिसांनी इरफान भाय आणि चंदूला थांबण्यास सांगितले. नाईलाज होता..

हताशतेने इरफान भाय त्यांना घेऊन पुन्हा घरात आला. मदनने जबरदस्त खेळी करत इरफान भाय कडून विक्रमचा पत्ता ही मिळवला आणि भाय तिकडे पोहोचणार नाही याचीही तजवीज करून ठेवली होती.

काही वेळातच मदन विक्रमच्या फ्लॅटच्या दरवाज्यावर होता. एकवार आसपासच्या सर्व कोपऱ्यात नजर फिरवत त्याने काम झाल्यावर तिथून गपगुमान बाहेर पडण्याचा मार्ग पडताळला. हुश्श.. आता त्याने सावध पवित्रा घेत सुरा बाहेर काढला आणि बाहेर दरवाज्यापासून काहीस अंतर ठेवून बेल वाजवली.

आतून विक्रमने प्रतिक्रिया द्यायला काहीसा वेळ घेतला म्हणून मदनने पुन्हा बेल वाजवली.

यावेळी आतून दरवाज्याजवळ काहीशी हालचाल जाणवली. मदनला माहीत होते, विक्रम बाहेर कोण आहे याची चाचपणी केल्याशिवाय दरवाजा उघडणार नाही. म्हणूनच त्याने चेहरा शक्य तितका नॉर्मल ठेवत हातातला सुरा पाठीमागे लपवला.

आतमधून विक्रमने बाहेर मदनला पाहीले. मदन इरफान भाईचा माणूस असल्याचे त्याला माहीत होते. पण हा माझ्या घरापर्यंत कसा पोहचू शकतो याच गोष्टीचे त्याला नवल वाटत होते. कदाचित त्याला इरफान भायने काही महत्वपूर्ण कामासाठी पाठवले असावे, पण डोअर उघडल्याशिवाय ते जाणणे शक्य नव्हते.

म्हणूनच नाईलाजाने विक्रमने आतला दरवाजा उघडला, सेफ्टी डोअर अजूनही आतून बंदच होता.

“काय्.. रे... काय काम आहे...?” विक्रमने त्रासिक भावात विचारले.

“विक्रम भाय.... इरफान भायने पाठवलेय... खुनी कोन आहे, हे त्यांना माहीत पडलेय.. आणि तुमच्या जीवाला धोका आहे म्हणून त्यांनी मला इथे पाठवलेय..” मदन गडबडीत असल्यासारखे धडाधड बोलून मोकळा झाला.

“व्हॉट्... म्.. माझ्या जीवाला धोका.. कोण आहे खुनी... मंदारच असणार... (बोलत बोलत विक्रम सेफ्टी डोअर उघडत मागे फिरला.. आणि एकक्षण विचार करत) ...पण ही बातमी इरफान भाय मला फोनवर देखिल सांगू शकला असता..”

विक्रम पुन्हा मदनकडे वळण्यासाठी फिरला पण तोपर्यंत भस्सकन त्याच्या पोटात सुरा घुसला होता. मदनच्या चेहऱ्यावर पुन्हा विकृतीची छाया पसरली होती, त्याचे डोळे लालसर झाले होते. विक्रम पोटाजवळ होणारी वेदना सहन करत अजून शांतच होता. एक छोटीशी हालचाल आणि त्यापुढे होणारा वेदनादायक त्रास त्याला अनुभवायचा नव्हता. पण मदनला ते पाहवलं नाही. त्याने विक्रमच्या पोटात घुसवलेला सुरा निर्दयीपणे बाहेर काढत पुन्हा घुसवला. एक्.... दोन्.... तीन्... चार्..... पाच्... सपासप विक्रमच्या पोटात वार झाले आणि भडाभड रक्त बाहेर येऊ लागले. विक्रम हतबल होऊन ते वार झेलत होता. त्याच्या अंगात त्राणच उरले नव्हते ना प्रतिकार करण्याचे ना ओरडण्याचे..

त्या रक्ताचे काही शिंतोडे मदनच्या शर्टावरही उडाले. त्याची पर्वा न करता मदन दरवाज्याजवळ जाऊन उभा राहीला. तिथून तो बाहेरील आणि आतील दोन्ही ठिकाणी वॉच ठेवू लागला. विक्रम काहीकाळ तडफडला आणि त्याने प्राण सोडला. मदनने एकदा त्याच्याकडे पाहत मान हलवली आणि तिथून बाहेरच्या दिशेने प्रस्थान केले. जाताना विक्रमच्या फ्लॅटचा दरवाजा आणि सेफ्टी डोअर बाहेरून बंद करायला तो विसरला नाही.

**********************************

मनूची बाईक खडकपाड्यातल्या रस्त्याकडे वळत काही वेळातच विक्रम राहत असलेल्या बिल्डींगच्या पार्किंग मध्ये जाऊन थांबली. बाईक तिथं पार्क करत मनू समोरच्या लिफ्टकडे वळाली, मागोमाग आरीफ आणि मंदारही आले. थोड्याच वेळात ते तिघे विक्रमच्या फ्लॅटच्या बाहेर होते. तिथे त्याचा दरवाजा बाहेरून बंद होता. मनूने इकडेतिकडे पाहत तो उघडला.

आतले दृश्य पाहण्यासारखे नव्हतेच.. तिने जितक्या तत्परतेने तो दरवाजा उघडला होता तितक्याच वेगात तो बाहेरून घट्ट बंद करून घेतला. एक अवकाश ती दरवाज्याची कडी तशीच हातात घट्ट धरून उभी राहीली आणि तिने आपले डोळे बंद

करून घेतले. तिच्या मागे असलेले मंदार आणि आरीफ 'ती नक्की काय करतेय' याचाच अंदाज घेत होते. तिथं त्या क्षणाला काहीसा सन्नाटा पसरला होता.

आतमधला प्रसंग ओळखून फुशारकी मारण्यासाठी आणि न राहवून ती शांतता भंग करण्याच्या उद्देशाने का होईना मंदार बोलता झाला.

"काय मनू.. इथे येण्याचे कारण तु आम्हांला अगोदरही सांगू शकली असतीस.. पण तु तसे केले नाहीस.. कदाचित तुला वाटले असावे.. खुनी आमच्यापैकी कुणी असू शकतो.. हो.. ना...?.. बॅडलक... तो तुझ्यापेक्षा फास्टर आणि स्मार्ट निघाला..." मंदारने मनूला टोमणा मारला.

मनूला खरंतर तो टोमणा जिव्हारी लागला होता. पण तिनं शांत राहणं पसंत केलं. ज्याअर्थी मंदार बोलून पुढचं मोकळा झाला याच अर्थ आतमध्ये काय झालेय याचा त्याला अंदाज आला असणार. मनू अजूनही डोळे मिटून दरवाज्याकडे तोंड करून आरीफ आणि मंदारला पाठमोरी होती. आज पहील्यांदाच ती त्या खुनी व्यक्तीच्या जवळ पोहचली होती. तो हातातून निसटला होता तरी एक बाब समाधानाची होती की आता मनू त्याच्या चाली ओळखु लागली होती. तिने जसा विचार केला अगदी तसेच घडले आणि यापुढे जर त्या खुनी व्यक्तीला पकडायचे असेल तर त्याच्या चाली बदलणे अत्यावश्यक होते.

माणूस जेव्हा प्लॅनप्रमाणे चाली खेळतो तेव्हा तो समोरील बाबी मनात गृहीत ठेवूनच प्लॅन करतो. पण जर का त्या बाबींमध्ये अल्पसा जरी बदल झाला तर माणसाला पूर्ण प्लॅन बदलावा लागतो.

मनूने मनोमन विचार पक्का केला. आणि मागे वळून तिने मंदारकडे पाहीले. मंदारला तिच्याकडून रोष अपेक्षित होता. पण तिच्या नजरेत त्याला त्याच्याविषयी प्रेम दिसू लागले होते. अगदी तसेच जसे त्या दिवशी दोघे घरात एकटेच असताना दिसत होते. त्या दिवशी त्या वेळेस मंदारच्या वडीलांचा फोन आला आणि पुढे काहीच घडू शकले नाही. मंदार तिच्या डोळयांत स्वतःचा चेहरा अभिमानाने पाहत होता. आरीफने मात्र त्या दोघांकडे पाहुन दुसरीकडे वळवली.

“मंदार.. तु भेटल्याच्या दिवसापासूनच मला तुझ्यामध्ये एक वेगळाच स्पार्क जाणवला होता. काय.. माहीत नाही पण तु सोबत असताना मला माझ्या सुरक्षिततेची चिंताच वाटत नाही.. मला माफ कर.. खरंतर इथं येण्यासंबंधी मला तुला सांगायला हवं होतं. किंवा तशी पूर्वकल्पना द्यायला हवी होती..” मनू अतिशय शांत आणि प्रेमळ आवाजात बोलत होती.

मंदारच काय आरीफही तिचं असं रूप पहील्यांदाच अनुभवत होता.

“जे झालं ते विसरून जा.. आता पुढे काय करायचं ते ठरवू..” मंदार स्वतःशीच खुश होत म्हणाला.

“पुढे काय... मी विचार केलाय.. बस्स्.. झालं आता हे.. सगळं शोधणं.. बास्स्.. एकदम्.. आता आपण लग्न करायचं..” मनूने मंदारचा हात हातात घेत बोलत त्याच्या खांद्यावर आपले डोकं ठेवलं..

खल्लास्सस्.. मंदार अक्षरशः आतून पाघळला.. मनू आपल्या इतक्या जवळ येऊन लग्नाचा विषय काढते याहुन दुसरा आनंद तो काय..

“म.. मनू.. आर्.. यु.. शुअर्...” मंदारने कसंबसं विचारले.

“ऑफकोर्स.. आय्.. ॲम्.. यु.. डम्बो...” मनू प्रेमाने त्याच्या गळयात पडली.

मंदार त्या घडीला उल्हासित होऊन तो प्रेमळ क्षण उपभोगू लागला. तेव्हा त्याने बाकी साऱ्या बाबींना फाट्यावर मारत मनूला मिठी मारली. खुन.. डिटेक्टीव्हगिरी.. विक्रम.. सारंसारं.. सगळया गोष्टींचा त्याला विसर पडला.

वरच्या मजल्याच्या पायऱ्यांवर दबा धरून बसलेला मदन हे सर्व ऐकत होता. तो दिसत नसला तरी त्याची सावली समोरच्या भिंतीवर स्पष्ट पडत होती. त्या भिंतीला सामोरी असल्याने मनूला ती सावली केव्हाचीच दिसली होती. म्हणूनच तर तिने पुढचा तर्क लावत मंदारला जाळयात ओढले होते.

“तुम लोग यहीं पर प्रेमलीला शुरू करलो.. मैं अंदर जाकर बैठता हुं..” आरीफने वैतागत म्हटले आणि तो विक्रमच्या फ्लॅटचा दरवाजा उघडून आत जाऊ

लागला. आत शिरल्यावर तिथं विक्रमचा मृतदेह पाहून तो घाबरून मागं फिरणारच होता की मनू आणि मंदारही आत आले. ते आत येताच आरीफला जरा हायसं वाटलं.

“आरीफ.. तुम यहीं ठहरो.. हम जरा अंदर जाकर कुछ सबूत मिलता है तो ढुंड लेते है..” मनूने मंदारला आत बेडरूमच्या दिशेने खुणवत बाहेर आवाज ऐकायला जाईल इतक्या मोठ्याने आरीफला सांगितले.

“हा.. मै सब समझता हुं.. तुम लोग सबुत के बहाने क्या करने जा रहे हो.. मैं भी टॉयलेट में थोडा हलका होने जाता हुं...” आरीफने तितक्याच मोठ्याने ओरडत मनूला सांगितले. खरंतर आता त्याला मनूचा राग आला होता. पण तो डायरेक्टली तिच्यावर काढू शकत नव्हता.

मंदार पुढे होऊन बेडरूमच्या दिशेने जायला निघाला. आरीफ तितक्यात दरवाजा बंद करण्यासाठी त्या दिशेने वळाला पण मनूने मंदारच्या नकळत बोटांनीच आरीफला इशारा करत थांबवले. आरीफ चक्रावला आणि थांबला. मनूने आपला अंगठा आणि तर्जनी वापरत आरीफला पुढची खुण म्हणून हवेत काही नंबर काढून दाखवले. आरीफला चटकन् ते नंबर उमगले.. त्याने स्वतःचा अंगठा उंचावून तिला प्रतिक्रिया दिली. आरीफ आता समजून चुकला की मनू मघापासून नाटक करत होती. दरवाजा उघडाच ठेवत मनू बेडरूमच्या दिशेने आणि आरीफ टॉयलेटकडे वळाले.

बेडरूममध्ये प्रवेश करताना मनूला मंदारच्या मनातील उतावीळपणाचा अंदाज येत होता. मनू सारखं डॅशिंग कॅरेक्टर असं बाईल नखऱ्यात त्याच्यासमोर येणं

म्हणजे एकप्रकारचा चमत्कारच होता. आणि त्याचाच मनसोक्त आनंद लुटण्यासाठी मंदार तयार झाला होता.

तो मनोमन विचार करू लागला.. ‘खरंच एखादी कडक स्वभावाची बाई जेव्हा बेडवरच्या त्या क्षणांत मधाळ बनते तेव्हा तिच्या सहवासातील व्यक्तीलाही त्याचं अप्रूप वाटतंच. आणि मग त्या प्रणयाचा आनंदही द्विगुणीत होऊन जातो. मिळमिळीत आणि सौम्यभावाच्या स्त्रीया तितकंस सौख्य देऊ शकत नाहीत.’

मंदार आपल्याच विचारांत मनूला वरून खाली न्याहाळू लागला. आणि ती लाजेनं त्याच्या समोरून हटत मागे येऊन उभी राहीली. तिचा हात हातात घेत मंदार पुढची क्रिया करावयास जाणार इतक्यात त्याला मागे बेडरूमच्या दरवाज्यात कुणाचीतरी चाहूल लागली. मागे वळून पाहावे तोच...

“गद्दार... हरामखोर.. शेवटी पलटलास ना...” बेडरूमच्या दरवाज्यात चवताळलेला मदन होता.

त्याला पाहताच मंदारची भंबेरी उडाली पण मनूने मागे सरकत सावध पवित्रा घेतला.

मंदारने एकवार मनूकडे पाहीले.. आणि मदनकडे पाहत बोलू लागला..

“तू... तू इथं कसा..” मंदार.

“मी इथून गेलोच नव्हतो.. भिक्कार**...” मदन शिव्या मंदारला घालत मनूकडे पाहू लागला. “या.. या.. हरामीसोबत तू झोपायला तयार झालीस्... अग् यानंच तर मौसमला...”

मदन आपलं वाक्य पूर्ण करेपर्यंत मंदार त्याच्यावर तुटून पडला. दोघांमध्ये तुंबळ मारामारी सुरू झाली. पण पाचएक मिनिटांतच मंदार मदनवर भारी पडू लागला. पुढच्या क्षणी खाली पडलेल्या मदनवर मंदार वरून लाथांचा प्रहार करत होता. मदनने मार खात खात आपला उजवा हात सफाईने पॅन्टच्या खिश्यापर्यंत पोहचवला होता. शेवटचा घाव म्हणून मंदार त्याला जीव खाऊन लाथ मारायच्या प्रयत्नात असतानाच सप्प्.. करून मदनने त्याच्या पोटावर धावता वार केला.

वार फारसा खोलवर गेला नव्हता पण मंदारला एक पाऊल मागे जाण्यास मदनने प्रवृत्त केले होते. तसाच मंदारच्या पोटात लाथ घालून मदनने उठण्याचा प्रयत्न केला. पोटाजवळून येणाऱ्या रक्ताने पिसाळलेला मंदार पुन्हा मदनवर हल्ला करण्यासाठी सरसावला पण यावेळी मदन सावध होता. त्याने मंदारचा ठोसा चुकवत खाली वाकत मंदारच्या पायावर त्याच सुऱ्याने वार केला. मंदार सावरेपर्यंत पुन्हा मदनने त्याच्या डाव्या हातावर सुरा फिरवला.

मदनचा उद्देश एकच होता.. त्याला मंदारच्या शरीरावर जिथे भेटेल तिथे वार करून त्याला जखमी करायचे होते. कारण मंदारच्या ताकदीपुढे फारकाळ आपण तग धरून राहू शकत नाही हे मदनला चांगलेच माहीत होते. सरतेशेवटी मदनने केलेले लहानसहान पाचसहा वार मंदारला गुडघ्यावर बसवण्यास यशस्वी ठरले.

आता सुत्र मदनच्या हातात होती, आणि पुढचा वार मंदारच्या मानेवरच होणार होता पण तितक्यात मनूने मदनवर झेप घेतली.

इतकावेळ मनूने दूर राहणेच पसंद केले होते. पण आता एका क्षणाचा विलंब झाला असता तर आणखी एक खुन तिथे झाला असता. म्हणूनच न राहवून ती मध्ये पडली. आरीफदेखिल मघापासून सगळा प्रकार बेडरूमच्या दरवाज्यात उभा राहून पाहत होता. पण आत जाण्याची हिम्मत त्याच्यात नव्हती.

त्या अनपेक्षित हल्ल्याने मदन हडबडला आणि भेलकांडत जाऊन बाजूला पडला. त्या गडबडीत त्याचा सुराही त्याच्यापासून दूर होऊन मंदारच्या पुढ्यात पडला. मनूने मोर्चा सांभाळत मदनला मारण्यास सुरूवात केली. मदनला वर उठण्याची संधीही ती देत नव्हती. तिकडून मंदारनेही कसंबसं सावरत उठून समोर पडलेला सुरा उचलला. जखमी अवस्थेत त्यानं अंगातली सारी ताकद पणाला लावली आणि तो मदनला मारण्यासाठी धावला. मंदारने मदनवर वार करायला सुरा हवेत उचललाच होता पण मनूने त्वेषात उठत मंदारच्या पोटावर मुसंडी मारली.

आता खरंतर मंदारला हा धक्का पचवणं अवघड झालं होतं. मनू मंदारवरही तुटून पडली आणि जमेल तितक्या ताकदीनं तिने त्याला खाली पाडून वरून बुक्क्यांचा मार देऊ लागली. मंदार अगोदरच जबर जखमी होता त्यामुळे तो फारसा प्रतिकार करू शकत नव्हता. पण तो हार मानायला तयार नव्हता. मनूवर त्याने हात उचण्याचे प्रयत्न करून पाहीले, पण त्याच्या हालचालीत आता वेग नव्हता. आणि

त्याचाच फायदा घेत मनू मंदारचा प्रत्येक वार चुकवत त्याला त्या बदल्यात ठोसा लगावत होती.

चांगले दहाबारा मजबूत प्रहार मंदारच्या तोंडावर झाल्यावर मंदार हळूहळू प्रतिसाद देण्याचा थांबला. पण तोपर्यंत तिकडे मदन उठला होता आणि तो मनूच्या अंगावर धावून जायला सज्ज झाला होता. मदनने आसपास पाहीले.. जवळच त्याचा सुरा पडला होता. त्याने वेळ न दवडता सुरा उचलला आणि मनूच्या पाठीत भोकसणारच होता की आरीफने दरवाज्यातून जोरात ओरडत मनूला साद घातली.

मदनच्या हातातला सुरा वर हवेत उंचावून पुन्हा खाली येणारच होता की आरीफच्या इशाऱ्याने सावध झालेली मनू चपळाईने बाजूला झाली. पण वार तर झालाच.. मदनच्या हातातला सुरा वेगाने मंदारच्या छातीत घुसला.. आणि त्याच वेगात मदनने तो सुरा पुन्हा बाहेर काढला. त्याचसरशी मंदारच्या रक्ताचे शिंतोडे बाजूला पडलेल्या मनूच्या चेहऱ्यावर उडाले.

मदनचा चेहरा पुन्हा सायको किलर सारखाच भासत होता. तो रक्ताने माखलेला सुरा तसाच आपल्या दाढीवरून एकदा उजवीकडे तर एकदा डावीकडे फिरवत मदन डोळे मोठे करून मनूकडे पाहत बोलू लागला.

“तुला मारण्याची मनापासून इच्छा नाही.. पण तु आज जो उत्पाद माजवलायस.. त्यावरून एक निश्चित आहे.. तू कधीच माझी होऊ शकत नाहीस..

हा.. पण मरतानाही मी तुझं रक्त या भड*च्या रक्तात मिसळू देणार नाही.. तुझी कुठलीच गोष्ट माझ्याशिवाय कुणालाच मिळणार नाही... कुणालाच नाही..."

इतक्या जवळून प्रत्यक्ष खुन होताना पाहणं, हा मनूला अकस्मात् जाणवलेला धक्का होता. आणि त्यात मदनचं विकृतासारखं बोलणं आणि त्याचा तो किळसवाणा चेहरा यांमुळे तिची अवस्था आता काहीशी भेदरल्यासारखी झाली होती. पण तरीही मनातल्या कुठल्यातरी एका कोपऱ्यातून तिला शेवटच्या क्षणापर्यंत झुंजण्यासाठी आवाज ऐकू आला.

मदनने तिला मारण्यासाठी पुन्हा सुरा हवेत नेऊ लागला. खाली पडलेल्या मनूला बचावाचा कोणताच मार्ग दिसत नव्हता. तिने हात फिरवत बेडखाली चापचून पाहीले. तिथे काहीच हाती लागले नाही, पुन्हा काही भेटतंय का या उद्देशाने शक्य तितकं हात लांबवत तिने अंदाज घेतला. आणि तिला लाकडाचे काहीतरी सापडलेच. मदनचा उंचावलेला हात खाली येतच होता की आरीफने बाहेरून धावत येत टी-पॉयची ग्लास् त्याच्या डोक्यात घातली.

छळ्..ळं..छळ्..ळं करत त्या काचेचे तुकडे विखुरण्याच्या आतच मनूच्या हातातल्या लाकडी फळकुटण्याने मदनच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूचा वेध घेतला. क्षणाचीही उसंत न घेता एकामागोमाग एक दणके भेटताच मदन हत्यारं गाळल्याप्रमाणं गलितगात्र झाला. तो आरीफच्या पहील्याच घावात गार झाला होता.. त्यात मनूने घातलेला दुसरा घाव तो सहन करूच शकला नाही.

त्याच क्षणाला पोलिसही तिथं हजर झाले. मनूने बेडरूममध्ये येण्याच्या आधीच आरीफला इशारा करून पोलिसांना तिथं बोलावण्यास सांगितले होते. मनू झटक्यात तिथून उठून बेडवर शांत बसली. कॉन्स्टेबल शेलार पुढे येऊन मदनला घट्ट पकडून उभं करू लागले. मदन त्यांचा आधार घेत धडपडत उभा राहीला. मनूने मंदारकडे पाहीले. अजूनही तो जिवंत होता. मनूने त्याला लगबगीने उठवून बेडला टेकवत बसवले. मंदारने छातीवर हात ठेवत मोठ्या कष्टाने मनूकडे पाहत विचारले..

“तुला कसे माहीत झाले..”

“सगळया प्रश्नांची उत्तरं भेटतील.. कसं हायं.. आपल्याकडं बराच टाईम आहे.. म्हंजी तू जिवंत हाईस तोपर्यंत..” कॉन्स्टेबल शेलार मंदारला म्हणाले. पुढे त्यांनी पुष्टी जोडत इन्स्पेक्टरकडे पाहीले आणि बोलू लागले..

“सायब, मी सांगतो ह्यास्नी हीथंच तडफडू दे.. सगळं प्रकरण हीथंच जाणून घेऊ.. चार खुन केल्याती.. ह्या हरामजाद्यांनी.. कश्याला फुका आता स्टेशनाच्या आणि कोर्टाच्या पायऱ्या झिजवा.. ते बी ह्यांच्यापायी..”

“आयडीया अगदी उत्तम आहे.. चला मग करा सुरूवात दोघांनी.. मौसमच्या खुनापासून..” इन्सपेक्टरनेही तुटक आवाजात कॉन्स्टेबल शेलारच्या म्हणण्याला दुजोरा दिला. तसेच त्यांनी दुसऱ्या हवालदाराला रेकॉर्डर सुरू करण्याचा इशारा दिला.

मौसमचे नाव ऐकताच मनूच्या डोळयात पाणी तरळले. मंदार आणि मदनची नजरानजर झाली. मनू आपल्याला मिळणार नाही हे नक्की झाल्यावर मदनने बचावाचा प्रयत्नही केला नाही तो भडाभडा बोलू लागला.

“भायकडून आम्हांला विक्रमच्या प्लॅनबद्दल कळाले होते. खरंतर विक्रमने जोर देत किन्नरच पाहीजे असं सांगितलं होतं. किन्नर म्हटलं की माझ्यापुढं फक्त मौसमच यायची. कारणच तसं होतं.. मला मनूशी लग्न करायचं होतं पण मौसम सदानकदा आडवी यायची. विक्रमच्या प्लॅनमध्ये कुणाचा खुन न करण्याची ताकीद होती. पण मी विचार केला जर का प्लॅन थोडासा वाकवला किंवा एखादी चाल एक्स्ट्रा खेळली तर एका दगडात दोन पक्षी मरतील.. मौसम मंदारला भेटण्याअगोदरच मी मंदारला गाठलं. आणि मौसमला अर्धमेलं करण्यासाठी पैसे देऊ केले...”

“तेव्हा हा हरामखोर मला म्हणाला की पन्नास हजार रूपये मिळतील, ते ही फक्त तिला फटकवायचे.. मला काय मग.. तशीही ती मला फसवणाऱ्यांसोबत मिळाली होती.. मी त्या रात्री तिला जमेल तसं उपभोगलं आणि ती दमल्यावर तोंड दाबून दोन-चार तडाख्यांत तीचा प्रतिकार मोडून काढला. पण नंतर यानं रूममध्ये येऊन तीचा खुन केला. हा.. म्हणजे आमच्यात थोडीफार झटापट झाली पण ती फक्त याच्या मित्रांना दाखवण्यापुरती होती..” मंदार म्हणाला.

“तिचा खुन मला माझ्याच हाताने करायचा होता.. अगोदर मी बरेचसे हाल्फ मर्डर केले होते.. पण खुन करण्याची ती माझी पहीलीच वेळ होती. म्हणूनच

मी मंदारला तिच्याच पैश्यांचं आमिष दिलं. आणि तिला मरणाच्या उंबरठ्यावर आणून सोडायला सांगितलं. मंदारने आपलं काम चोख केलं. आम्ही तिथं गेलो तेव्हा मौसम निपचित पडून राहिली होती. मग सुरू झालेल्या गडबडगोंधळाचा फायदा उचलत मी मौसमच्या पाठीत चाकू मारला. मनू आणि माझ्यामध्ये येणारा काटा मी मंदारच्या मदतीने कायमचा दूर केला...”

“मग मंदार तिथून पळून का गेला.. खुन त्यानं केला नव्हता तर...” इन्सपेक्टरने विचारले.

“त्याला मी पैसे उचलून पळायला अगोदरच सांगितले होते.. त्याला मी पहीलेच म्हटलेले की तुला नाही त्या केसमध्ये अडकवण्याचा प्लॅन आहे.. तू इथून नीघ बाकीचं मी सांभाळून घेतो.. पण हा चू**.. डिटेक्टीव्ह बनायला गेला.. याच्यामागं कोण आहे ते शोधायचा प्रयत्न करू लागला..” मदन रागाने मंदारकडे पाहत म्हणाला.

“माझ्यावर मौसमच्या खुनाचा आळ आल्याचं मला काहीच टेन्शन नव्हते, मला फक्त हे सर्व कोण घडवून आणतेय याचाच छडा लावायचा होता..” छातीतल्या कळा सोसत मंदार कसाबसा बोलला.

“हा.. लावलास ना छडा मग्.. साला नाही त्या पंचायती करत मग एकेकाला गोष्टी कळत गेल्या.. आणि आज आपण असे आहोत..” मदन जवळजवळ ओरडलाच.

“अय्.. गपय्.. पुढं सांग.. नसीरचा खुन..” कॉन्स्टेबल शेलार मदनवर डाफरले.

“नसीरने ओळखले होते.. सुरा फेकून मारण्यात मी तरबेज होतो.. बाकी कुणाच्या ध्यानी ही बाब लवकर आली नाही पण नसीरने मला त्याबद्दल विचारले. माझा नाईलाज होता.. मी त्याला मारू शकलो असतो.. पण डिग्री सारखा माझ्यासोबतच असायचा.. म्हणून मी पुन्हा मंदारची मदत घेतली..” मदन शांत होत म्हणाला.

“आरीफला जेव्हा लैला बारची इन्फॉर्मेशन मिळाली आणि आम्ही तिकडे गेलो. त्..तेव्हा रस्त्यात असतानाच मदनचा मला मॅसेज आला होता. नसीरच्या खुनाच्या बदल्यात तो मला आणखी प..न्ना...स हजार देत होता.. मला तसंही या सगळयांना धडा शिकवायचाच होता.. म्हणून मी लगेच तयार झालो... अह्..हह.. नसीरचा खुन मी वेगळया पद्धतीने करायचे ठरवले... ॲह्..ह.. लैला बारमधल्या टॉयलेटमध्ये पडलेले दोन हातभर लांबीचे पाईप त्याची हाडं मोडायला कामी आले..” मंदार खोकत खोकत म्हणाला. त्याचे डोळे हळूहळू जड होऊ लागले होते, पण कमालीच्या झुंजारू वृत्तीमूळे मंदार अजूनही तग धरून होता.

“फिर डिग्री को क्युं मारा..” आरीफने कुतुहल दाखवत विचारले.

“मौसमला मारल्यावर खुन करण्यातली मजा मी अनुभवली होती. एखाद्याचा जीव घेताना लागणारे कष्ट आणि जीव घेतल्यानंतर मिळणारं सुख..

आस्सस... वेगळंच थ्रील असतं ते.. हाहा.. नसीरच्या खुनाबद्दल डिग्री माझ्यावर संशय असल्याचं इरफान भायला सांगणार होता. म्हणून त्याला सोडणं पण मला परवडणार नव्हतं.. मंदारलाही पोलिस घेऊन गेले होते. म्हणून मीच डिग्रीच्या मागं मागं गेलो आणि त्याचापण खेळ खल्लास केला..” विकृत मदन चेहऱ्यावर हास्य आणत म्हणाला.

त्याच्याकडे पाहून मनू, कॉन्स्टेबल शेलार आणि आरीफसहीत इन्स्पेक्टरलाही त्याची घृणा वाटू लागली. कॉन्स्टेबल शेलारने तर पुढे सरसावत फाट्कन् मदनच्या कानसुडात लगावून दिली. पण त्याचा मदनवर काही परीणाम झाला नाही.. तो हसत सुटला.. आणि हसत हसत पुढे बोलू लागला..

“आणि त्यात ती रां*... हाह्...हाहा... ती मनूच्या घरी भेटली.. च्या.. मायला... मी तर.. हाहहाहह्..... मी तर मनूला लग्नाची मागणी घालायला गेलो होतो.. तर ही बया.. तिथंच भेटली.. डिग्रीच्या खुनाचा पुरावा.. हाहाहा... दोन दिवस तिला शोधलं कुठंच नाही दिसली.. आन्.. नेमकं तिनं मनूच्या घरीच आयतं भेटावं.. केलं मग तिचं पण काम तमाम..” आपलं हसु दाबण्याचा प्रयत्न करत मदनने केलेल्या गुन्ह्यांची कबूली दिली.

“विक्रमने काय केले होते मग्.. तो तर तुमच्या गेममध्ये नव्हताच.. मग त्याचा जीव का घेतलास्..?” इन्स्पेक्टरने विचारले.

मदन त्याच्या प्रश्नाने शांत झाला.

पण मनू बोलू लागली. तिने अगोदरच लावलेला तर्क योग्यच होता.

“ती या दोघांमधली एक डील होती. मदनला मनू भेटावी म्हणून मंदार मदत करेल, तर मंदारला विक्रमशी बदला घेता यावा यासाठी मदन मदत करेल. दोघे या कडीने एकमेकांशी बांधले गेले. पण मंदार मनूच्या प्रेमात पडला आणि शेवटी दोघे एका मनूसाठी आपआपसांत झगडले..” मनूने स्पष्ट केले.

“पण फायदा काय झाला हरामखोर... विनाकारण तुम्ही दोघांनी खुन केलेत.. आणि आता मंदारही इथंच संपणार आहे.. मग बस एकटाच जेलमध्ये पुढचं आयुष्य कसं घालवायचं त्याचा प्लॅन करत..” कॉन्स्टेबल शेलार मदनला ओरडत मंदारकडे पाहू लागले.

पण मंदार... मंदारने केव्हाच डोळे मिटले होते.. कॉन्स्टेबल शेलारने मंदारला हलवण्याचा प्रयत्न करताच तो खाली आडवा झाला. मंदारच्या रूपाने मदनच्या खात्यात आणखी एका खुनाची भर पडली.

“तु सुरूवातीपासूनच ॲक्टींग सुरेख केलीस पण ऐन टाईमिंगवरती तू चूकलास... मदनचे नाव पुढे करण्याच्या प्रयत्नात तू त्याच्यासोबत स्वतःचा सहभागही नकळत माझ्यासमक्ष आणलास..” मनू मंदारच्या मृत शरीराकडे पाहत पुटपुटली.

“साला.. विक्रम तर गेलाच पण मनूच्या प्रेमात पडून त्याची जागा घ्यायला तू जिवंत राहीला नाहीस्.. गद्दार..” मदन आपला राग व्यक्त करू लागला.

“शेलार उचलून जीपमध्ये घाला याला..” इन्स्पेक्टरने आदेश दिला तसं तयारीतच असलेला कॉन्स्टेबल शेलार मदनला बकोटीला घेत नेऊ लागला.

“तुम्हालासुद्धा जबानीसाठी पोलिस स्टेशनला यावं लागेल..” इन्स्पेक्टर मनू आणि आरीफकडे पाहत म्हणाला.

“हा.. हा.. क्यू नहीं..?” आरीफने सहमती दर्शवली.

खाली जाताना आरीफ आणि मनू आपल्याच विचारांत हळूहळू चालत होते.

“मनू.. तुमने पहले से मंदार को पहचान लिया था..?” आरीफने उत्सुकतेने विचारले.

“शुरूवात से नहीं.. पर हा नसीर का खुन हुआ उस वक्त मेरा शक उसपें ही जाकर रूका.. फिर डिग्री का खुन हुआ तो मैं समझ गई के खुनी एक नहीं दो है.. और जैसे के विक्रम और मंदार की दुश्मनी मेरे सामने आई थी.. मुझे इस बात का भी एहसास हो गया था के विक्रम की जान को खतरा है..” मनूने आत्मविश्वासाने सांगितले.

“फिर तुमने विक्रम को बताने की कोशिश क्यूं नहीं की..” आरीफने पुन्हा प्रश्न केला.

“मैं चाहती थी के वो तीनों आपस में लडकर मरें.. और जो आखिर में बचेगा उसे मैं खत्म करूंगी..” मनूचा आवाज बोलता बोलता कठोर होऊ लागला.

"पर.. मदन तो जिंदा है..." आरीफ.

"हम्म्... अभी जिंदा है.. क्या पता अगले पल क्या होगा.." मनूने आरीफचं लक्ष सोसायटीतून बाहेर पडून रस्त्यावर पोलिसांसोबत असलेल्या मदनवर वेधलं.

कॉन्स्टेबल शेलार रस्त्यावरच डाव्या बाजूला मदनला बेड्या चढवून मागे फिरले. मदनला क्षणभर काय चाललेय कळालेच नाही. मागून आलेल्या हॉर्नचा कर्णकर्कश आवाजाच्या दिशेने त्याने पाहण्याचा प्रयत्न केला.. पण तो पूर्णपणे मागे वळण्याआधीच भरधाव वेगाने आलेला ट्रक सुर्रकन.. त्याला उडवून निघून गेला.

कॉन्स्टेबल शेलारने जीपच्या मागे ठेवलेल्या मंदारच्या बॅगेकडे पाहून मनूला स्माईल दिली. मनू आणि आरीफ आले तसेच तिथून बाहेर पडले.

"कुछ भी बोल मनू.. मंदार था ही डॅशिंग.. साला गाव से आकर सबपे भारी पड रहा था.. कई जगह पर उसने जो दिमाग लगाया वो काबील-ऐ-तारीफ था.. बोलू तो एकदम डॉमिनंट.." आरीफने मंदारची स्तुती करत म्हटले.

"हा.. आरीफभाय.. कुछ जगह वो हमपरभी भारी पड गया था.. पर आखिर में जो जीत गया.. वहीं असली डॉमिनंट..."

"तुम्हारे कहने का मतलब.. कहीं मैं तो वो डॉमिनंट नहीं हुं.." आरीफने हसत हसत मनूला पंच मारला.

ते ऐकून मनूही हसु लागली.

दुसऱ्या दिवशी शहरातील मुख्य वर्तमानपत्रांत बातमी आली.

**“पोलिसांनी अटक केलेल्या खतरनाक सायको सिरीअल किलरचा पळून जाताना भरधाव ट्रक खाली येऊन अपघाती मृत्यू..”**

**समाप्त**

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com